Mission : An institute dedicated to spreading the light of education by night.

|| ज्ञानं बलानां बलम् ||

|| ज्ञानं बलानां बलम् ||

## सरस्वती मंदिर संस्थेचे
## सरस्वती मंदिर नाईट कॉलेज ऑफ कॉमर्स अ‍ॅण्ड आर्टस्,

१३५९, शुक्रवार पेठ, श्रीमंत थोरले बाजीराव रस्ता, पुणे - २.
(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा संलग्नता क्रमांक PU/PN / ०९२/१९९२)

# आम्ही सारस्वत

**वार्षिक नियतकालिक**
**२०१६ - २०१७**

**संपादक**
**डॉ. विक्रम जाधव**

Please visit us at our website : www.saraswatimandirnightcollege.org
E-mail id : smncca@rediffmail.com

# आम्ही सारस्वत २०१६ - १७, अंक क्र. ९

**सरस्वती मंदिर नाईट कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड आर्टस्, पुणे - २.**


## प्रकाशक

**प्र प्राचार्य श्रीराम देशमुख**

## कार्यकारी संपादक

**डॉ. विक्रम जाधव**

द प्रेस रजिस्ट्रेशन ॲक्ट नियम क्र. ८, फॉर्म क्र. ४ याप्रमाणे आवश्यक माहिती

| | | |
|---|---|---|
| प्रकाशन स्थळ | : | सरस्वती मंदिर नाईट कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड आर्टस्, पुणे - २.<br>१३५९, शुक्रवार पेठ, श्रीमंत थोरले बाजीराव रस्ता, पुणे - २. |
| प्रकाशन काळ | : | वार्षिक |
| मुद्रकाचे नाव | : | संवाद ट्रेडप्रिंटस्, ५९५ शनिवार पेठ, पुणे - ३० |
| प्रकाशकाचे नाव | : | प्र प्राचार्य श्रीराम देशमुख |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | १३५९, शुक्रवार पेठ, श्रीमंत थोरले बाजीराव रस्ता, पुणे - २. |
| मालकी | : | प्र प्राचार्य, श्रीराम देशमुख, प्रकाशक<br>सरस्वती मंदिर नाईट कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड आर्टस्, पुणे - २. |

(मी प्र प्राचार्य, श्रीराम देशमुख जाहीर करतो की वर दिलेली माहिती माझ्या समजुतीप्रमाणे बरोबर आहे.)

# स्थानिक व्यवस्थापन समिती

सरस्वती मंदिर नाईट कॉलेज ऑफ कॉमर्स अ‍ॅण्ड आर्टस्, पुणे - २

|| ज्ञानं बलानां बलम् ||

| सभासदाचे नाव | पद |
|---|---|
| मा. विनायक आंबेकर | अध्यक्ष |
| मा. विकास काकतकर | सदस्य |
| मा. अशोक मर्चंट | सदस्य |
| मा. दिलीप बोकील | सदस्य |
| मा. प्र प्राचार्य श्रीराम देशमुख | सचिव |
| प्रा. विनय बोडस | शिक्षक सदस्य |
| प्रा. श्याम कांबळे | शिक्षक सदस्य |
| श्री. प्रशांत मालपुरे | शिक्षकेतर सदस्य |

# महाविद्यालयातील प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी

## प्र प्राचार्य श्रीराम देशमुख

### वाणिज्य विभाग
प्रा. विनय बोडस
डॉ. गीता राशीनकर
डॉ. सविता थोरात
प्रा. पद्मनाभ गायकवाड
प्रा. ऐश्वर्या इनामदार
प्रा. नंदिनी भावे

### इंग्रजी विभाग
प्रा. आयोध्या जाधव
प्रा. स्फूर्ती देशपांडे

### मराठी विभाग
डॉ. विक्रम जाधव
डॉ. सुमन जाधव

### अर्थशास्त्र विभाग
प्रा. श्याम कांबळे
प्रा. पियुष जाधव
डॉ. पंकज शिंपी

### राज्यशास्त्र विभाग
प्रा. मंजूषा जोशी

### मानसशास्त्र विभाग
प्रा. जया बदी

### भूगोल विभाग
प्रा. श्रीराम देशमुख

### इतिहास विभाग
डॉ. दीपक वेडे

### संगणक विभाग
प्रा. शिल्पा क्षीरसागर
प्रा. शितल कुलकर्णी

### ग्रंथपाल
प्रा. राजेश अगावणे

### प्रशासकीय कर्मचारी
श्रीमती स्नेहल शेंडे
श्री. रवींद्र साळवे
श्री. प्रशांत मालपुरे
श्री. दुर्गादास पिंपळे

# अनुक्रमणिका


मैत्री ............ विशाल डफळ ............ ०८
माझा आवडता छंद (वाचन) ............ अस्मिता सिंह ............ ०९
महाविद्यालयातील माझा पहिला दिवस ............ वैभव देवघरकर ............ ११
बंदिस्त ............ श्लाका वऱ्हाडकर ............ १२
वैवाहिक जीवनातील वाईट प्रथा ............ तनुजा चरणकर ............ १३
वरदक्षिणा ............ प्रज्ञा कामठे ............ १५
धावा ............ श्लाका वऱ्हाडकर ............ १६
सामाजिक परिवर्तन आणि हुंडा ............ मानसी जरांडे ............ १७
माझ्या दृष्टीतील दहशतवाद ............ तेजस चव्हाण ............ १९
माती ............ उमेश दारवटकर ............ २०
हुंडा प्रथा ही अभिशापः ............ समृद्धी देव ............ २१
पॉवर हाऊस ............ निकिता पवार ............ २२
हुंडा हवाय ............ रुपाली इंगळे ............ २३
आम्ही सावित्रीच्या लेकी ............ निकिता पवार ............ २६
अंधश्रद्धेतून परिवर्तन ............ उमेश दारवटकर ............ २७
विचारातील दहशतवाद ............ श्रीपाद कुलकर्णी ............ २९
आरक्षण ............ रुपाली इंगळे ............ ३०
कॉलेजचे विश्व ............ पुजा देसुरकर ............ ३२
हुंडा योग्य की अयोग्य ............ सिद्धी बोकील ............ ३३
काही आठवणी ............ पुजा देसुरकर ............ ३४
माझे रात्र महाविद्यालय ............ उमेश दारवटकर ............ ३५
गुरुजन ............ शिवम बोरकर ............ ३६
तू ............ श्लाका वऱ्हाडकर ............ ३६

विलीनीकरण ...... श्रीपाद कुलकर्णी ...... ३७

सोनपरी ...... रुपाली इंगळे ...... ४१

नाती हरवत चाललेला समाज ...... विकी कांबळे ...... ४३

नोटाबंदी - योग्य की अयोग्य ...... नितीन मुळे ...... ४५

नोटाबंदी - एक समस्या ...... मंजू कदम ...... ४७

चातकमन ...... उमेश दारवटकर ...... ४९

नाती हरवत चाललेला समाज ...... बबिता रजपूत ...... ५०

आजचे समाजवास्तव ...... प्राची मोरे ...... ५२

वरिष्ठ महाविद्यालयातील माझा पहिला दिवस ...... गणेश थेरडे ...... ५४

ती ...... प्रा. डॉ. गीता राशिनकर ...... ५५

झेप ...... प्रा. डॉ. गीता राशिनकर ...... ५७

राजर्षी शाहू महाराज जीवन व कार्य ...... डॉ. विक्रम जाधव ...... ५८

सखी ...... लक्ष्मी वेळेकर ...... ६५

बोधकथा ...... तुकाराम पुरी ...... ६६

My favourite hobby gardning ...... Samruddhi Vipradas ...... ६७

आई जपतेस मज ...... पुजा देसुरकर ...... ६८

My Hobby ...... Rupali Shinde ...... ६९


**भाग २**


परीभा विभाग अहवाल ...... ७१

समिती अहवाल ...... ७३

ग्रंथालय अहवाल ...... ८३

वाणिज्य विभाग ...... ८४

Dept. Of English ...... ८६

# मैत्री



देव पण न जाणे कोठून कसे नाते जुळवितो. अनोळखी माणसांना ह्रदयात स्थान देतो. ज्यांना आपण कधी ओळखत ही नसतो. पण देव हा त्यांना जीवाचे जिवलग बनवतो. यालाच दुसरे नाव असते मैत्री. म्हणजे एक छोटसं लहान रोप असत. ते जमिनीत पूर्णपणे रुजलेलं असतं. जेवढं वरती दिसत असतं त्याच्यापेक्षा जास्त ते जमिनीत घट्ट रुजलेलं असते. जर आपण त्यांची मुळे शोधण्याचे जर ठरवले तर ते अशक्य आहे. तसचं मैत्रीचं सुद्धा आहे. मैत्री का होते, कुणाशी होते, कुठे होते, कधी होते आणि ती कशी होते हे कुणालाच कळत नाही. पण जेव्हा मैत्री होते तेव्हा मात्र आपण एका वेगळ्याच दुनियेत कुठल्या तरी पक्ष्यांसारखे आकाशात उडत असतो.

मैत्रीमध्ये आपण एका वेगळ्याच दुनियेत वावरत असतो. यामध्ये वेळ, वय, समाज अशा गोष्टीचे आपल्याला बंधन नसतं. मैत्रीत कशाचही बंधन नसतं. ती एक मुक्त पक्ष्यांसारखी आहे जी उंच उंच आकाशात उडून त्या आकाशाला गवसणी घालण्याचा प्रयत्न करत असते. मग ते आकाश म्हणजे कुणीही असू शकतं. मुलगा, मुलगी, आई, वडील, भाऊ, बहीण, प्राणी, पक्षी यापैकी कुणीही असू शकतं.

''मैत्री तुझी आणि माझी, असावी कोमल फुलांसारखी
शेवटपर्यंत सुगंध देणारी''

मैत्री एक हळुवार मिळणारी कोमल संवेदना आहे. तिला शब्दांत बांधून ठेवणं कठिण आहे. जर चुकून बांधण्याचा प्रयत्न केला तर ती एका गुलाबाच्या फुलांतील पाकळ्यासारखी हातातून निसटून जाते. खरचं या नात्याला उगम नाही. ते नातं इतकं घट्ट का होतं काय माहित? अशी कोणती जादू आहे तिच्यामुळे या नात्याची दोरी एवढी घट्ट बांधली जाते.

''मैत्री कशी हळूवार उमलते, उन्हात ही मग सावली सारखी वाटते
अश्रूमध्ये दुःख वाहून नेते, मग दुःखात ही हसू येते''

या ओळीतून मैत्रीची पूर्ण संकल्पना स्पष्ट होते हे आपल्याला समजलं असेलच तरी पण मैत्रीचा उगम कोणापासून झाला असेल, कधी झाला असेल हे एक कधीही न समजणारं कोडं आहे. या प्रश्नाच उत्तर जर शोधण्याचा मी जर प्रयत्न केला तर मला हा जन्म सुद्धा पुरणार नाही. मैत्रीमध्ये आपण सगळे मित्र किंवा मैत्रिणी नेहमीच एकमेकांच्या सहवासात राहण्यासाठी आतुर झालेलो असतो. या आतुरतेमध्ये आपल्या जात-पात, धर्म, श्रीमंत, गरीब अशा गोष्टीची कसलीही पर्वा राहत नाही. त्यामुळे आपण मनमोकळेपणाने मित्राच्या सुरांत सुर देत मैत्रीचे गाण गात सुटतो. यामध्ये आपल्याला शोले चित्रपटातील

'ये दोस्ती हम नहीं तोडेंगे
तोडेंगे दम मगर तेरा साथ ना छोडेंगे'

हे गीत आठवले तर काही हरकत नाही. पण ''ही दोस्ती तुटायची नाय'' हे गीत म्हणताना ते विसरतात की तुटते ती मैत्री कसली. आपण मित्रांपासून दूर गेल्यावर आपल्याला सतत सारखी त्यांची आठवण येत असते आणि आठवण येणं ही साहजिकच आहे. तेव्हा आपल्याला आपल्या मैत्रीतली दृढता समजते. पण जेव्हा ती समजते तेव्हा आपण म्हणू शकतो की, 'आमची मैत्री समजायला वेळ लागेल. पण जेव्हा समजेल तेव्हा वेड लागेल. तेव्हा खऱ्या अर्थाने मित्र म्हणून मिरवण्यास आपण पात्र होताल.

''मैत्री विना सारेच फिके
मग आनंदाचे क्षण ही मुके
म्हणूनच मैत्रीला फुलवायचे
फुलांसारखे जपायचे अनं
त्या सुगंधात जीवन सुगंधी करायचे.''

अशा लौकिक मैत्री बद्दल जर मी लिहत बसतो तर माझे आयुष्य सुद्धा कमी पडेल पण यावर लिहिणं संपणार नाही. या सागराला शब्दा - शब्दांमध्ये बांधण मला काय कुणालाच जमणार नाही. शेवटी त्या देवालाच माहीत की मैत्रीला शब्दांमध्ये बांधण शक्य आहे की अशक्य. पण देवालाही जमेल की नाही यात सुद्धा शंकाच आहे. एवढ्या सुंदर मैत्रीवर माझं मत मांडण्यासाठी मला प्रोत्साहन देणारे प्रवृत्त करणारे माझे सर्व मित्र मैत्रिणी यांचे मी कोटी - कोटी धन्यवाद मानतो.

**विशाल डफळ**
**एफ. वाय. बी. कॉम**

# माझा आवडता छंद (वाचन)



प्रत्येकाला काही न काही छंद असतात. काहींचा व्यासंग असतो. माझं मात्र तसं नाही. लहानपणी वाचण्याचा बाबांच्याकडे येणाऱ्या विद्यार्थ्यांची पुस्तके मी कुतूहलाने वाचत असे. ''सरांचा पहिलीतला अनंता ७ वी, ८ वी ची पुस्तके वाचतो' असं कोणी म्हणाले की मी फुगून जायचो. भले त्या पुस्तकातले काही कळे ना का. तेव्हा पासून जे दिसेल ते हावरटासारखे वाचायचे एवढेच माहिती झाले. भान हरपून वाचणे म्हणजे काय याचा अनुभव तेव्हाच घेतला. आजूबाजूला अंधार पडला म्हणजेच पुस्तकातून डोक बाहेर काढायचो. आजूबाजूला माझ वाचून म्हणजे अळवावरचे पाणी. काय वाचलं हे कोणी विचारल तर सुसंगत सांगता येत नसे.

हळूहळू करमणूक म्हणून वाचणारा मी जिज्ञासा म्हणून वाचू लागलो. विषयांचे वावडे नव्हते. काय वाचतो, हे कळत नव्हते. सर्व प्रकारची मासिके, कादंबऱ्या, कुठेतरी सापडलेली जुनी पुस्तके यांनी माझी क्षुधा भागत नव्हती. मार्मिक, इल्स्ट्रेटेड विकली ही मासिके म्हणे फक्त मोठ्यांसाठीच होती! ती सुद्धा चोरुन वाचली. कोणाच्या घरी गेलो की तिथली पुस्तकांची जागा शोधून काढून, कधी त्या व्यक्तीची परवानगी काढून तर कधी न काढता सुद्धा ती वाचायचो. या वरुन बऱ्याचदा बोलणी खाल्ली होती. भोरला कचरा पेटीत टाकलेली मोडी लिपीतला पत्रांचा गठ्ठा मी जणूकाही इतिहास संशोधक असल्याच्या आविर्भावत घरी आणला होता. हात लावला तर तुकडा पडेल अशी काही पत्रे त्यात होती. थोडाफार वाचण्याचा प्रयत्न करुन ती मी तशीच परत टाकून दिली. तेव्हा त्यांचे मूल्य माहित नव्हते. भोरेश्वराच्या नगारखान्यात सापडलेली प्रौढ शिक्षणाची पुस्तके सुद्धा माझ्या तावडीतून सुटली नाहीत. वाचनालयाचा संबंध अगदी ५ वी, ६ वी पासूनच आला तो आजतागायत कायम आहे. पुढे एकदा तर मी एका वेळी ५ वाचनालयाचा सभासद होतो. नादिष्टपणा म्हणा हव तर. पु. लं.च्या शब्दात ''खाई खाई'' सुटली होती. १० वी नंतर शिकायला पुण्याला आलो. कॉलेजला असताना पुस्तके विकत घ्यायला पैसे नसायचे, मग

रद्दीच्या दुकानातच पुस्तक चाळायचो. पुणे विद्यार्थी गृहाच्या वाचनालयातल्या पुस्तकांमुळे वाचनाला थोडी दिशा येवू लागली. मित्र काय वाचतात याची चर्चा व्हायची. मग चरित्रे, ऐतिहासिक कादंबऱ्या इकडे मोहेरा वळला. अवांतर वाचनही असायचेच. ११ वीत असताना एका मित्राने दिलेली अगाथा ख्रिस्तीच्या 'ए मर्डर ऑन ओरिएण्ट एक्सप्रेस' चा पहिला चॅप्टर डिक्शनही न पाहता वाचता आला याचा मला कोण आनंद झाला होता! इंग्लिश कादंबऱ्या थोडा संदर्भ लावून वाचता येऊ शकतात हे कळल्यावर मग आणखीन एक दालन खुले झाले.

टेल्कोच्या वसतिगृहात रोज रात्री सर्व प्रकारची पिरीओडीकल्स वाचायला मिळू लागली आणि जगात काय चालले आहे याचे ज्ञान मिळू लागले. कंपनीचे वाचनालय तर लगेचच जॉईन केले होते. त्या वेळी या वाचनालयात टेक्निल वसतिगृहात रोज रात्री सर्व प्रकारची आणि अवांतर अशा पुस्तकांची प्रचंड संग्रह होता. गुरुवारच्या सुट्टीत पुण्याला आल्यावर पिक्चर पाहून झाला की डेक्कन जिमखाना, जंगल महाराज रोडवरील दुकाने शोधायचो. आता हातात थोडेसे पैसे असायचे. त्यामुळे सगळ्या ठक्कर बंधूंच्या दुकानातून चांगली जुनी पुस्तके विकत घेता येऊ लागली. संभाजी बागेपाशी एक रशियन पुस्तके विकणारा माणूस बसायचा. त्याच्याकडे प्रचारकी साहित्य आणि इतरही पुस्तके असायची, तिही विकत घ्यायला लागलो. रामचंदन कक्न सरांनी इंग्लिश सुधारण्यासाठी कॉमिक्स वाचा, असा सल्ला दिला होता. त्यामुळे आता पाळी कॉमिक्सची होती. रद्दीची दुकाने शोधणे काही थांबले नव्हते. टिळक रोडच्या ठक्कर कडून मी एक अशी जेम्स बाँडची सर्व सिरीज मनाचा हिय्या करुन घेतली आणि वाचूनही काढली. मुकुंदनगर मध्ये असलेले शलाका ग्रंथालय त्याचे चालकही श्री. भवे हे स्वतः चाहते असल्यामुळे ज्ञान, विज्ञान, ललित आणि मनोरंजनपर साहित्यांनी समृद्ध होते. आपणही त्यांच्यापेक्षा भव्य असे ग्रंथालय काढायचं असे स्वप्न मी तेव्हा पहात असे. कोथरुडला रहायला आल्यावर ह्या ग्रंथालयाचे सभासदत्व सोडावे लागल्याची खंत मला खूप दिवस होती. या सुमारास ग्रंथ जत्रा भरल्याने एकदम पुस्तक विकत घेणे मला शक्य होऊ लागले. पुस्तके विकत घेऊन वाचल्याने लेखकांना साहित्यात नव्याने भर घालणे शक्य होते. जगात वाचकांची संख्या आता कमी होऊ लागली आहे असे म्हणतात. इंटरनेट सर्वर च्या तुलनेत कमी असेल कदाचित पण घटलेली नाही. वाचनाचे महत्त्व कमी होणार नाही. मी सुद्धा आता इतर छंदाकडे जास्त लक्ष देऊ लागल्यामुळे 'खूप दिवसात छान काही वाचलं नाही' असे वाटून हळहळलो असतो.

**अस्मिता सिंह**

**एफ. वाय. बी. कॉम.**

# महाविद्यालयातील माझा पहिला दिवस



बारावीचा निकाल लागल्यानंतर मनातून खूप आनंद होत होता पण थोडीशी कुठेतरी धकधक सुद्धा वाटत होती. कारण आपण आता वरीष्ठ महाविद्यालयात जाणार म्हणजे पुन्हा नवीन चेहेरे, नवीन मित्र मंडळी आणि नवीन शिक्षक व कॉलेजसुद्धा. पण हे सर्व असलं तरी आपल्या जीवनाला एक नवीन वळण मिळणार होतं. म्हणूनच खूप विचार करुन एक चांगलं महाविद्यालय निवडल आणि तिथे प्रवेश घेतला. महाविद्यालय तसं खूप छान होतं. मोठं मैदान, कॅन्टींग सर्व कसं आनंदी वातारण होत ते. आता फक्त कॉलेज सुरु होण्याची वाट पाहत होतो.

महाविद्यालय सुरु होण्यासाठी अजून पंधरा दिवस बाकी होते आणि ते पंधरा दिवस पंधरा वर्षासारखे वाटत होते. ज्युनियर असते वेळी सर्व बोलायचे की कॉलेज जीवन म्हणजे मज्जा, मस्ती असते पण त्याही पलीकडे तेवढाच अभ्यास सुद्धा असतो असे कोणी सांगितलेच नाही. पण शेवटी म्हणतात ना की, 'मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही' ते बरोबरच आहे. कॉलेजला जाण्याआधी सर्व खरेदी झाली होती. शेवटी कॉलेज चालू झालं. कॉलेजचा पहिला दिवस होता तो, आयुष्यात कधीही न विसरण्यासारखं. खरचं खूप छान दिवस होता तो. कॉलेज सकाळी असल्यामुळे सकाळी लवकरचं उठून तयार झालो, म्हणण्यापेक्षा जरा जास्तच तयार झालो कारण कॉलेजला जे जायचं होतं. सर्व कसं एकदम फिल्मी वाटत होतं. शेवटी कॉलेजला जाऊन पोहोचलो. मैदानावरील ती मुलामुलींची गर्दी बघून डोळे मोठे झाले होते. सर्व अनोळखी चेहेरे होते तिथे. काही वेळेसाठी एकट पडल्यासारखं वाटत होतं. भीतीसुद्धा वाटत होती. मी इकडे तिकडे बघतच आतमध्ये गेलो. सगळीकडे आनंदी वातावरण होतं. मुलामुलींमध्ये गप्पा - गोष्टी चालू होत्या. मी सुद्धा त्या मुला - मुलींच्या घोळक्यात शिरलो आणि नकळतच गप्पा आणि त्यांच्याशी मैत्री कधी झाली कळलेच नाही.

खरचं इतकं सोपं जीवन असतं हे तेव्हाच मला कळलं. सर्व कसं जग जिंकल्यासारखं वाटत होतं. असं वाटत होतं की हे सर्व इथंच थांबाव एखाद्या चित्रासारखं आणि सर्व रंगीबेरंगी व्हावे. वेळ पुढे पुढे कशी जात होती कळतच नव्हते. आम्ही सगळेजण वर्गामध्ये जाऊन बसलो. वर्ग आमच्यासाठी नवीनच होते. प्रत्येक तासाला वेगवेगळे सर आणि मॅडम येत होते. असं वाटतचं नव्हतं की हे आपले शिक्षक आहेत. अगदी आमच्यासारखे आमच्यात मिसळून राहात, वागत होते. शिक्षक म्हणण्याऐवजी हे सुद्धा आमचे नवीन मित्रच होते. खरचं खूप छान पहिला दिवस होतो तो महाविद्यालयातला.

देवाला सुद्धा माझं हे एकच मागणं आहे की, देवा तुला जर वेळ मिळाला तर प्लीज तो दिवस माझ्या आयुष्यात पुन्हा येऊ दे, पुन्हा येऊ दे....

**वैभव देवघरकर**

**एफ. वाय. बी. कॉम**

# बंदीस्त

मी पुन्हा बंदीस्त कोशी मी पुन्हा घरट्यात माझ्या
नील नभाची मुक्त सीमा फोंडली डोळ्यात माझ्या।।

नील नभी मी मुक्त केले ओल्या जुन्या हळव्या वरणांना
मुक्तता ओल्या वरणाची सलतसे हृदयात माझ्या।।

जा मला दाऊ नको मुक्त पक्षी विहरणारे
पाखरे ओल्या ऋतूंची मोकळी पिंजऱ्यात माझ्या।।

कौमुदी उध्वस्त झाली पौर्णिमेच्या उनमुक्त चंद्रा
गंधकोशी राहिला तू नेणतया अवसेत माझ्या।।

**श्लाका वऱ्हाडकर**

**टि. वाय. बी. कॉम.**

# वैवाहिक जीवनातील वाईट प्रथा

'हुंडा' ही आजच्या समाजाला लागलेली कीड आहे. त्यामुळे हुंडाबळीची ज्वलंत समस्या समाजापुढे उभी आहे. रोज वृत्तपत्रांत हुंडा बळीची बातमी असते.

तशी भारतीय स्त्री कोणतेही अग्निदिव्य करण्यास तयार असते. सीतेने निष्कलंक चारित्र्य सिद्ध करण्यासाठी, रजपूत स्त्रियांनी आपल्या शीलाच्या रक्षणासाठी तर रमाबाई पेशव्यांसारख्या सतीने स्वतःची आणि पतीची प्रतिष्ठा उंचावण्यासाठी अग्निपरीक्षा दिली; परंतु आज कित्येक निष्पाप नववधूंची केवळ हुंड्यापायी अमानुषपणे हत्या केली जात आहे. हा तर भारतीय संस्कृतीला लागलेला कलंक आहे. आज विसाव्या शतकातदेखील काही पुरुष हुंड्याच्या लालसेने धगधगत्या ज्वालांमध्ये आपल्या पत्नीला ढकलून देतात. विष देऊन तिची हत्या करतात. पाण्यात बुडवितात तर कधी आत्महत्या करण्याजोगी परिस्थिती निर्माण करतात आणि पुन्हा गुडघ्याला बाशिंग बांधून दुसऱ्या बळीची वाट पाहतात. दिल्या घरी सुखी रहाण्याचा मंत्र माहेरकडून नववधूला दिला जातो. पण सर्व हाल सोसून, अश्रू गिळून हसतमुखाने वावरणाऱ्या पत्नीचा साधा जगण्याचा हक्कही सासरकडून नाकारला जातो.

हे सारे कशासाठी, तर श्रीमंतांनी अधिक श्रीमंत होण्यासाठी, मध्यमवर्गीय तरुणांना आपले नाकर्तेपण झाकून वधू पक्षाकडून मिळणाऱ्या हुंड्यातून एखादा फ्लॅट खरेदी करण्यासाठी नाहीतर उद्योगधंदा उभारण्यासाठी अथवा स्वतःचे श्रीमंती चोचले पुरविण्यासाठी. हुंडा हा वरपक्षाची प्रतिष्ठा दर्शवणारा जणू धंदाच झाला आहे. पूर्वीच्या काळी स्त्रीधन आणि वरदक्षिणेच्या रुपात राजेरजवाडे, दासदासी, गोधन, सोने, रुपे, मुलीबरोबर स्वखुषीने तिच्या सासरी पाठवत. वरपक्ष या संपत्तीची भीक मागत नसे. पुढे स्त्रियांवर अनेक बंधने लादली गेली. त्यांना शिक्षणही नाकारले गेले. म्हणून हे स्त्री धन तिच्या उपजीविकेचे साधन झाले. अशिक्षीत, अडाणी, कुरुप मुलीचे न्यूनत्व झाकण्यासाठी आणि मुलगी उजवली नाही तर जन्मभर ती ओझे होऊन राहील या भीतीने वरास संपत्तीची लालूच दाखवली जात असे. हळूहळू हा प्रकार सर्वच मुलींच्या बाबतीत अनिवार्य होऊन बसला. हुंड्याशिवाय लग्न नाही असा वरपक्षाचा आग्रह होऊ लागला. त्या काळातील स्त्री परावलंबी, अशिक्षित असल्याने तो मान्य होऊ लागला. एक प्रथा समाजाला जळूसारखी चिकटली आणि वधूपक्षाचे रक्त शोषू लागली. वरपक्षाकडील वडीलमंडळी हुंड्याचा अट्टहास करु लागली व तरुण त्यापुढे मान झुकवू लागले.

या समस्येवर उपाय म्हणून हुंडाविरोधी अनेक कायदे केले गेले. हुंड्यासाठी बळी घेणाऱ्या व्यक्तीस फाशीसारखी शिक्षाही सुनावली जाऊ शकते असे असून सुद्धा या कायद्यात इतक्या पळवाटा आहेत की, हे गुन्हेगार त्यातून सहजगत्या निसटून जातात. सध्या समाजात अशा गुन्हेगारांचा सुळसुळाट झाला आहे.

याबाबतीत कायदेशीर प्रयत्नांपेक्षा सामाजिक संस्थांनी केलेले सामाजिक जागृतीचे उपाय अधिक प्रभावी ठरतील. या दृष्टिने संपूर्ण समाजाचे विचार परिवर्तन करण्यासाठी काही संघटनांनी हुंडा घेणाऱ्या व देणाऱ्या विरुद्ध सामाजिक बहिष्काराचे हत्यार उपसले. नारी अत्याचारविरोधी मंच व स्त्री - मुक्ती संघटनेसारख्या संघटना 'मुलगी झाली हो' सारखे पथनाट्य दाखवून हुंडाविरोधी जनमत तयार करत आहेत. नाट्य व चित्रपटक्षेत्रातील जागरुक निर्मात्यांनी व दिग्दर्शकांनी हुंडा समस्याप्रधान चित्रपट व नाटके सादर केली. टि. व्ही., रेडिओ या लोकशिक्षणाच्या साधनांद्वारे घातक प्रथेविरुद्ध प्रचार केला जात आहे. अनेक युवक संघटनांतर्फे हुंडा न घेण्याच्या शपथा वाहून त्याप्रमाणे त्याचे वर्तन होत आहे. युवा मंचातर्फे परिचयोत्तर विवाह घडवून आणले जात आहेत.

युवकांच्या याबाबतीत विचारपरिवर्तन होणेही अत्यंत आवश्यक आहे. पत्नी ही क्रय वस्तू नसून ती आपली सहधर्मचारिणी आहे याचे भान तरुणांनी ठेवणे आवश्यक आहे. लग्नसंख्या समानतेच्या पायावर उभी राहिली पाहिजे. तरुणांनी वधूपक्षाकडून हुंडा न घेता स्वकर्तृत्वावर यशाचे शिखर गाठावे. त्यात पत्नीकडून सर्व बाजूंनी साथ मिळणार आहे.

स्त्री सुशिक्षित झाली तर अर्थाजन करुन स्वावलंबी होऊ शकेल. त्यामुळे अविवाहित प्रौढ कुमारिका देखील आईवडिलांना ओझे वाटणार नाहीत. त्या त्यांच्या म्हातारपणी काठीच ठरतील. या दृष्टिने वाटचाल म्हणून आज स्त्री - शिक्षणास प्राधान्य दिले जात आहे.

सुशिक्षित समाज या दुष्ट रुढींच्या विळख्यातून काही प्रमाणात बाहेर पडत आहे. पण जेथे अजूनही अज्ञान, अंधश्रद्धेच्या अंधःकाराचे साम्राज्य पसरलेले आहे तेथे संस्कृतीची पहाट अजूनही उजाडली नाही अशा खेड्यातील समाजाची या दुष्ट रुढींतून सुटका करणे आवश्यक आहे. यासाठी शहरातील युवकांनी खेड्यांत जाऊन विचार जागृतीचे कार्य केले पाहिजे. त्यासाठी सभा - संमेलने, चर्चासत्रे भरवली पाहिजेत व प्रसिद्धी माध्यमांचा जास्तीत जास्त उपयोग करुन घेतला पाहिजे. अन्यथा मुलींच्या गळ्यात बांधले जाणारे मंगळसूत्र हा तिचा गळफास ठरेल.

**तनुजा चरणकर**

**एफ. वाय. बी. कॉम.**

# वरदक्षिणा

'हुंडा' हा शब्द तुम्हा – आम्हांला काही अजिबात नवीन नाही. हुंडा देणे आणि घेणे कायद्याने गुन्हा आहे. तरीसुद्धा मुलाकडील मंडळी मुलीकडील पित्यास सर्रास हुंड्याची मागणी करतात. कर्जबाजारी झालो तरी चालेल. मुलगी सुखात राहील, या आशेने लाखो रुपयांच्या मागणीला मुलीच्या पित्याकडून होकार दिला जातो.

मुलगी जन्माला आली तर त्यांची तोंड मुरडतात. एकीकडे देवीची पूजा करायची, जगदंबा, तुळजाभवानी अशी तिची स्तुती गायची. मुलामुलींच्या लग्नात हुंडा देणे व घेणे ही वाईट प्रथा आजही सुरु आहे. आधीच्या काळी मुली अशिक्षित होत्या व आज परिस्थिती बदललेली आहे. आजची तरुण पिढी सुशिक्षित आहे. त्यात आता खेड्यापाड्यातल्या देखील मुली शिक्षण घेत आहेत. आज आपली पावले जागतिकीकरणाच्या दिशेने पडत आहेत. अशा परिस्थितीत देखील सामाजिक परिवर्तनाकडे आपल्या सर्वांचेच दुर्लक्ष झाले. प्रत्यक्ष जीवनात ग्रात दोन्हीकडचा खर्च, तसेच दागदागिने, भेटवस्तू, मालमत्ता अशा मागण्या वरपक्षाकडून अटीच्या स्वरुपात केल्या जातात. या मागण्या तितक्याच पद्धतीने पूर्ण नाही केल्या तर विवाहित स्त्रियांचा सासरी नवऱ्याकडून किंवा इतर मंडळींकडून छळ केला जातो हे सत्य देखील तितकेच खरे आहे. प्रसंगी तिची तर मारहाण देखील केली जाते. याच त्रासाला कंटाळून स्त्रिया आत्महत्या देखील करतात.

विवाह सोहळ्यात हुंडा देणे किंवा घेणे बंद व्हावे यासाठी शासनाने १९६१ साली हुंडा प्रतिबंधक कायदा आणला. मात्र त्या कायद्याचे अजूनही पालन होत नाही हे स्पष्टपणे दिसून येते. श्रीमंतीचा थाट मिरवण्यासाठी समाजात आजही हुंडा घेणे ही प्रथा कायम आहे. विशेष म्हणजे हुंड्यासाठी छळ यासारख्या गुन्ह्यांत अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये स्त्रियांचे प्रमाण अधिक दिसून येते.

हुंडा पद्धतीविषयी जी मानसिकता समाजात आहे ती बदलणे तरुणांच्या हाती आहे त्यासाठी समाजामध्ये हुंडा विरोधीचे चर्चासत्र, त्याचप्रकारे स्लाईड शो इ. कार्यक्रमांद्वारे जनजागृती घडवून आणणे शक्य आहे आणि यासाठी स्त्रियांनाच लढा द्यायचा आहे.

**प्रज्ञा कामठे**

**एफ. वाय. बी. कॉम.**

# धावा



मी रंगलो समाधीत
तू अंतरी उमलशी राजा
तुजपाशी सारी गुपिते
गुपितांचा गाजावाजा

तुजसाठी रोजच चाले
जगण्याचा आटापिटा
तुजपायी पांडुरंगा
माझ्या मर्तकीच्या या वाटा

जळो जाओ दुःख सारे
सुखे अंतरी जळेल
थंड चंदन जळते
जरा इथे आकळेल

नको डोळ्यात आसवे
आसवात ओघळशी
का रे मला तु जाळतो
का तू माझ्यात जळशी

जळो जावो मरो सारे
असे जळणे तळणे
पुरे झाले बरे आता
असे छळून छळणे

उभी काळसर्पयोगे
पुरे मरण पासंगा
प्राण जाई डोळ्यांतून
आता यावे पांडुरंगा

**श्लाका वऱ्हाडकर**
**टि. वाय. बी. कॉम.**

# सामाजिक परिवर्तन आणि हुंडा



हुंडा..... हुंडा..... हुंडा.....

आज ही संकल्पना काहींना अभिमानाची वाटते, पण हीच संकल्पना काहींचे जीवही मुकवते. काहींच्या... असं म्हणण्यापेक्षा मुलांच्या घरच्यांना अभिमानाची वाटते, पण ज्या मुलीकडून तो घेतला जातो त्या मुलीला मात्र हुंडा बळी दिला जातो. आज शासनाने जरी ह्या प्रथेविरोधी आवाज उठवून कायदे केले असले तरी हे कायदे मात्र कोणतेच लोक पाळतं नाहीत. ह्या सगळ्यात घुसमट होते ती मात्र त्या मुलीची आणि तिच्या घरच्यांची. आज तर हुंडा हा मुलींचे बळी घेण्याचे प्रमुख साधन बनलाय असं म्हणायला काही हरकत नाही. पण काही माध्यमांचा उपयोग करुन हे टाळण्याचे प्रयत्नही चालू आहेत, परंतु लोकं ह्या माध्यमातूंन जे घ्यायचं ते न घेता जे नाही घ्यायचं तेच घेताहेत. समाजात सगळीच कुटुंब हुंडा घेतात हे मात्र तेवढचं खरं आहे.

हुंड्याला कंटाळून काही मुली आत्महत्या करतात तर काहींचे संसार मोडतात. आज समाजात हुंडा ह्या विषयावर तर भरपूरच चर्चा होते, एवढेच नाही तर गाणी ही गायली जातात. परंतु त्याच हुंड्याला प्रतिकार करणाऱ्या त्या मुलीच्या व्यथा मात्र ह्यात कुठेच नसतात. आज कालपरवाच मी प्रसिद्ध अशा एका चॅनेलच्या कार्यक्रमात पाहिले की, 'लग्न ठरवताना मुलीकडून किंवा तिच्या घरच्यांकडून कोणतीही अपेक्षा न करता फक्त मुलगी आणि तिच्या हातात एक श्रीफळ एवढचं देवून लग्न करुन देण्याचे आश्वासन देत होते.' हे पाहिल्यावर खूप बरं वाटलं पण मनात विचारही आला की हे फक्त कार्यक्रमातच होवू शकत का? आपल्या जडणघडणीत हे शक्य नाही का?

खरचं लग्न एक पवित्र बंधन समजले जाते परंतु ह्याच लग्नात हुंडा मागून मुलीचा एक प्रकारचा सौदाच केला जातो. पण हे टाळता येणं शक्यही आहे. हुंडा ही एक समस्या म्हणून बघण्यापेक्षा ती एक आयुष्याला कलाटणी देणारी पायरी म्हणून बघा, जर मुलींनी ह्या प्रथेला विरोध करुन, हुंडाबळी न पडता त्या मुलांना

व त्याच्या घरच्यांना कायद्याच्या कोठडीत नेवून उभं केलं तरच फक्त मुलींना न्याय मिळू शकतो आणि त्याचमुळे आयुष्याला कलाटणीही मिळू शकते.

आजचा समाज बदलू लागला आहे. समाजासोबतच माणसं आणि त्यांचे विचारही बदलू लागले आहेत. जर खरचं विचार बदलतायेत तर ह्या नवीन विचारांनुसार, जर आधीच्या काळात मुलींकडून हुंडा घेण्याची प्रथा होती तर ती आता मुलांकडून घेण्याची व्हायला हवी आणि हुंडाबळी ही मुलांचेच द्यायला हवेत. आता हे विधान जरी हास्यास्पद वाटत असेल तरी त्यात तेवढेच तथ्य आहे. नेहमी मुलींकडूनच का? कधीतरी मुलांकडूनही हुंडा मिळायला हवा. जर हुंड्यावरुन मुलींची किंमत ठरत असेल तर कधीतरी ती मुलांची ही व्हायला हवी. हुंडा न दिल्याने मुलींचे जे आर्थिक, मानसिक व शारीरिक शोषण केले जाते ते कोणीतरी मुलांचेही करायला हवे. आणि जर हे सगळं मुलांकडून घ्यायचचं नसेल तर मुलींकडूनही हे सगळं घ्यायला बंदी हवी. मुलींकडूनही हुंडा बंद केला पाहिजे.

शेवटी हुंडाबळीवर दोन ओळींची प्रतिज्ञा,

मी हुंडा देणार अगर घेणार नाही, जर हुंडा माझ्याकडून किंवा माझ्या कुटुंबीयांकडून दिला अगर घेतला गेला, तर कायद्याने दिलेली शिक्षा आम्हांस मान्य असेल.''

जयहिंद!

**मानसी जरांडे**

**एफ. वाय. बी. कॉम.**

# माझ्या दृष्टीतील - दहशतवाद

'दहशतवाद' या शब्दातच भय वाटतं. जगातली सर्वात वाईट गोष्ट जर काही आहे तर तो 'दहशतवाद' आहे.

२६ नोव्हेंबर २००८ रोजी भारतात, महाराष्ट्र राज्यातील मुंबई शहरात दहा दहशतवादींनी मुंबईत हाहाःकार केला होता. CST वर प्रवासी व सर्वांना ठार मारले. अंधाधुंद गोळीबार करुन निष्पाप लोकांना मृत्यूच्या दारात पाठविले. का मारतात हे समजत नाही. यांना कसला राग व्यक्त करायचा असतो आणि ते निष्पाप लोकांना का मारतात यांना मारुन काय मिळते?

अमेरिकेत सुद्धा कित्येक वेळा हल्ले झालेले आहेत आणि त्यांनी त्या हल्यात सुद्धा नुकसान, निष्पाप लोकांना मारले आहे. यांनी कुणाचा राग, निष्पाप लोकांना बळी पडतात यात मारला जातो तो सर्वसाधारण व्यक्ती.

जगात या हल्ल्यात कार्यरत असलेल्या काही संघटना आहेत. त्या या जगात कार्यरत आहे 'अल-कायदा', 'तालिबान' या मुख्य संघटना या जगात कार्यरत आहेत. ह्या संघटना ज्या मुलांना जगाची जाणीव नसते, जे धर्मप्रेमी असतात त्यांना घेऊन त्यांच्या मनात ते राग निर्माण करतात त्यांना दुसऱ्याविरुद्ध भडकवतात. त्यांना पूर्ण तयारीनिशी हल्ला करायला त्या देशात पाठवितात. त्यांच्या मनात धर्माविरुद्ध खोटे सांगतात, त्यांना सांगतात की या लोकांना मारलं तर त्यांचा देव तुम्हाला जन्नत देणार असे वगैरे अमिष दाखवून त्यांच्याकडून हे काम करुन घेतात.

**तेजस चव्हाण**
**एफ. वाय. बी. कॉम.**



# माती

मातीतील जन्म माझा
मातीच माय – बाप माझा
मातीच माझी जात
मातीच माझा धर्म
मातीतील जन्म माझा........
ना समाजाचे घेणे
मला फक्त समाजाला देणे
जन्मास येऊन या मातीत
जन्मभर रहावे मातीच्या कुशित
मातीतील जन्म माझा........
असंख्य संसार घडतील
खांद्यावरी मातीत खेळतील
ना मला जात व धर्माची भिती
मला फक्त समाजाची भ्रांती
मातीत जन्म माझा........

मातीसाठी जगणार
मातीसाठी लढणार
ना म्हणूनी मातीस का
पोरका मी? मला ती?
मला ती जाग आली!
समोर उभ्या पांढऱ्या भिंती!
मातीत जन्म माझा........
फुलातून सुगंध वाहतो
वाऱ्यावरती तो पांगतो
मातीत तो मिसळतो
मनात माझ्या दरवळतो
मातीत जन्म माझा........


**उमेश दारवटकर**
**एफ. वाय. बी. कॉम.**

# हुंडा प्रथा ही अभिशापः

समाजामध्ये रीतीरिवाज मध्ये हळूहळू प्रथा बनते. समाजामध्ये कोणत्याही संभ्रमात वर्ग द्वारा पुरुष स्त्रीला लग्नात हुंडा मागतो. हुंडा घेण्याची पद्धत अंदाजे पूर्वी अगोदर १९६१ मध्ये झाली. ही पद्धत भारतामध्ये खूप पूर्वीपासून आहे. या कारणामुळे खूप दुर्घटना होतात. हुंड्यामुळे कितीतरी घरं बरबाद झाली आहेत. आत्महत्या पण खूप प्रमाणात झालेल्या आहेत. रोजच्या रोज तेल व रॉकेल टाकून जाळले जात आहे. अशा बातम्या पेपरमध्ये छापून येतात. नवरा व सासूसासरे हे पण स्त्रियांना अशी कामे करण्यास भाग पाडतात व सहभागी असतात. म्हणून हुंडा या प्रथेला मुलीचे बलिदान असेच म्हणावे लागेल. भारतीय समाजात चांगल्या चालीरिती आहेत. या समाजामध्ये आता वाईटपण चालीरिती आल्या आहेत. या चालीरिती मध्ये हुंडा एक वाईट प्रथा आहे. या हुंड्यामध्ये भांडी, कापड, पलंग, सोफा, रेडिओ, मशीन, टि.व्ही., एसी, फ्रीज हजारो रुपये या वस्तू देण्याची प्रथा आहे. या हुंड्यामध्ये मुलीच्या रुपाबरोबरच सात्विकता याची देखील वस्तू म्हणून तुलना करतात व गरजेच्या मानतात. हुंड्यामध्ये मुलीकडून लाखो करोडो रुपये व सोने, चांदी याची मागणी करतात.

स्त्रीला जगात खूप कमी स्थानाचे मानले जाते व पुरुषाला वरच्या स्थानाचे. पूर्वी स्त्री पुरुष समानता असे. या समानाध्ये स्त्री ला वेगळे व पुरुषाला वेगळे असे मानावे लागायचे. स्त्री ही आदिशक्ती आहे. तिच्यामध्ये हजारो देवींचे बळ आहे. स्त्रीचा अपमान, मारहाण, तिला जाळणे, आत्महत्या करायला भाग पाडणे असे नराधम असतात.

हुंडा घेणे आणि देणे कायद्याने गुन्हा आहे. तरी सुद्धा वराकडील मंडळी वधू पित्याकडून सर्रास हुंड्याची मागणी करतात. कर्जबाजारी झाले तरी चालेल. मुलगी सुखात राहील या आशेने लाखो रुपये मागणीला वधू पित्याकडून होकार दिला जातो. हुंडा ही आजच्या समाजाला लागलेली कीड आहे.



उद्देश : हुंडा बळीची वाढती संख्या, पती किंवा पत्नीच्या नातेवाईकांकडून छळ, खून, फौजदारी प्रक्रीया संहिता यामुळे स्त्रीला खूप त्रास होऊ शकतो. याचमुळे भारतात मुलींचे प्रमाण कमी आहे.

लातूर तालुक्यातील भिसेवाघोली या गावात ऐन दुष्काळात 'हुंड्याच्या मागणीला कंटाळून एका मुलीने आत्महत्या केली. १२ वी चे शिक्षण घेतलेल्या या मुलीची लग्नाची लगबग सुरु होती. लग्नासाठी स्थळ येत होती. मात्र प्रत्येकाकडून ४ ते ५ लाखांच्या हुंड्याची विचारणा केली जायची. वडील भिसे हे पिमी एजंट. जेमतेम १ एकर शेती. त्यात दुष्काळामुळे दोन्ही हंगामात पीक पेरुन काहीच उगवले नाही. दुष्काळामुळे घरात १८ वर्षे दारिद्र. पण ती सुखी रहावी म्हणून तिच्या घरात लग्नाची गडबड होती. ही प्रथा बंद झाली पाहिजे. त्यासाठी आपण प्रत्येकाने प्रयत्न केले पाहिजे.


स्त्री ही अबला नाही सबला आहे.....

**समृद्धी देव**

**एफ. वाय. बी. कॉम.**

---

# पॉवर हाऊस



चंद्राचा दिवा आहे आकाशात
ॲटोमॅटीक स्वीच पुरवी प्रकाशास
झिरोचा बल्ब चांदण्यांनी तारे
सतत आकाशी चमचम करे
व्होल्टेज वाढता पौर्णिमेची रात
हळू हळू कशी डिम होते मग
वीज कपातील प्रकाश तो मंद
अमावस्यी केला तर पॉवरच बंद !

**निकिता पवार**

**एफ. वाय. बी. ए.**

# हुंडा हवाय?

आज गावात चर्चेला उधाण आलयं! आणि चर्चेचा विषय आहे सुमनचं लग्न. ''काय रे हणम्मा काय होईल रं? किती ठरला हुंडा? काय माहिती गणपा काय हुतयं? पण मी म्हणतो रामला अजून तीन पोरी हायती. हे विसरुन चालायचं नाही.'' ''हं ते बि खरयं!'' बक काय ठरतयं.

पाहुणे आले मुलीला बघायचा कार्यक्रम पूर्ण झाला. मुलाकडच्यांनी मुलगी पसंत पडली. सगळीकडे आनंदी-आनंद झाला. पण राम पहिल्यापेक्षा जास्त चिंतेत पडला होता. कारण खरं Tension पुढे होतं. हुंड्याचं, बोलीचालीच, रीतीभातीचं! झालं बैठक बसली लग्न ठरवण्यासाठी. खर ती बैठक सुमनच्या लिलावाची होती. तिच्यावर बोली लावली जाणार होती.

मुलाकडचे बोलले, 'हे बघा रामराव जास्त काही नको आम्हाला फक्त पाच तोळे सोनं, एक लाख हुंडा, भांडी-कुंडी आणि रीतीभातीप्रमाणे लग्न करुन द्या. बस इतकचं! हे एका दमात सहज बोलले, पण रामला पुढचे पाच - दहा मिनिटे काहीच सुचलं नाही. सुमनच्या आईने आवाज दिल्यावर ध्यानावर येवून राम कसाबसा बोलला, 'नाही बां. मंडळी मला अनिक तीन पोरी हायती. त्यांची बी लग्न व्हायचीत, मी घरात कमविणारा एकटा, एवढ काय नाही जमायचं माझ्यानी! पुढे गणपा बोलला रामच्या बाजूने, 'हे बघा पाहुणं सुमन दिसायला नक्षत्रावाणी हाय. बी. ए. झालेली हायं, घरची सगळी काम व्यवस्थित करती, स्वयंपाकात सुगरण हाय, शोधून सापडायची नाही अशी पोर.' चटकन मुलाकडच्यांकडून आलेली बाई म्हणजे सुमनची होणोरी सासूबाई बोलली, 'बाईच्या जातीन सुगरणचं असावं, त्यात काय नवल आणि जरी बी. ए. झाली असली तुमची मुलगी तर तिला काय आम्ही नोकरीला धाडणार आहे का? तिला घरचं सांभाळायचय!'

शेवटी कमी - कमी करत शेवटचं तीन तोळे सोनं ६५ हजार हुंडा लग्न, मानपान असं लग्न ठरलं! सुमनला आज पहिल्यांदा मुलगी असल्याचं दुःख झालं होतं. तिचं लग्न ठरलं होतं पण ती खूष नव्हती कारण लग्नाच्या नावाखाली तिला हुंडाबळी दिला जात होता. तिची आई तिला आनंदाने म्हणत होती 'बाई सुमन चांगल्या श्रीमंत घरात जाणार तू आता!' तेवढ्यात तिथे असलेली धाकटी पिंकी म्हणाली, 'आई ते एवढे श्रीमंत आहेत तर मग आपल्याकडे काहुन पैसे मागत होते?' सुमनने पण आईकडे प्रश्नचिन्ह

असलेल्या डोळ्यांनी पाहिलं, तेव्हा तिची आई नजर खाली करुन निघून गेली. त्या प्रश्नाच उत्तर त्या तिघींनाही नाही मिळालं.

राम ने वडिलोपार्जित मिळालेली थोडीफार जमीन होती त्यातली दोन एकर विकून कसबस लग्न उरकलं. भरल्या अंतःकरणाने त्याने सुमनला विदा केलं. राम निवांत झाला. झालं एकदाचं सुमनच लग्न. पण खरा हुंडाबळीचा खेळ तर पुढे चालू होणार होता. लग्नानंतरच्या प्रत्येक पहिल्या सणाला आहेर, मानपान सगळ करायचं होत अजून! तेही यथातिथ्य पार पाडले रामने. पण पहिली दिवाळी फार महत्त्वाची असते. जावयाला सोनं घालावं लागतं असे सुमनच्या सासूने सांगितलं. नाहीतर मुलीला कुठल्याच सणाला माहेरी पाठवणार नाही. परत त्या लाचार बापाने तीही मागणी पूर्ण केली. सुमन सणाला माहेरी आली. परत सासरी गेली. सर्वकाही छान चाललं होतं. सुमन छान संसार करत होती. सासरच्यांना बोलायची एकही संधी देत नव्हती. सगळी कर्तव्य व्यवस्थित पार पाडत होती. खूप वर्ष झाले. तिच्या नवऱ्याच्या मनात गाडी घ्यायचं होतं. त्याने ही इच्छा सुमनला बोलून दाखवली. सुमनला पण आनंद झाला. तिनेही प्रोत्साहन दिलं आणि म्हणाली, 'नक्की घ्या, छान कल्पना आहे.' तो लगेच म्हणाला, 'ठिक आहे मग फोन कर बाबांना आज, विचार काय म्हणतायेत बघ!' सुमन म्हणाली, 'बाबांना काय विचारायचय घ्याकी तुम्ही गाडी ते कशाला नाही म्हणतील.' ती अगदी भोळ्या नजरेने नवऱ्याकडे बघत होती. तिचा नवरा तिला म्हणाला, 'मी त्यांची परवानगी विचारत नाहीये, त्यांना सांग लग्नात जो हुंडा कमी केला आणि सोनं कमी केलं त्याबदल्यात मला आता गाडी हवी आहे.' सुमन आवासून त्याच्याकडे बघत होती. रात्र गेली. दुसऱ्या दिवशी सुमनला सांगण्यात आलं, 'आत्ताच्या आत्ता बॅग भरायची आणि जेंव्हा तुझ्या बापाला गाडी द्यायला जमेल तेंव्हा परत घरी यायचं.'

सुमन गावापर्यंत आली. मनात अजूनही तो एक प्रश्न घोंगावत होता की तिचे सासरचे लोक खरंच श्रीमंत होते? विचारांनी तिचं डोकं बधीर झालं होतं. डोळ्यासमोर गरीब बाप, अजून लहान तीन बहिणी, त्यांचे लग्न, शिक्षण या सर्व गोष्टी दिसत होत्या. आणि पैशाने श्रीमंत असलेल्या व मनाने अगदी गरीब असलेल्या तिच्या सासरच्यांचे चेहेरे! तिने मनाशी ठाम निर्धार केला व तडक शेताकडे गेली आणि बाभळीच्या झाडाला साडी बांधून गळफास घेतला. ती तिच्या सोबत वडलांचा होणारा त्रास व तिच्या आत्महत्तेचे कारण घेवून निघून गेली. कोणालाच तिच्या आत्महत्तेच कारण माहीत नव्हतं. शिवाय सासरच्यांच्या ति आत्महत्या नव्हती तो हुंडाबळी होता ज्याची कल्पना सुमनला लग्न ठरलेल्या दिवसापासूनच होती.

रोज वर्तमानपत्रात एक-दोन तरी हुंडाबळीच्या घटना नक्कीच असतात. त्या वाचतानाही अंगावर काटा येतो. कळत नाही जे लोक स्वतः सुनेला पेटवून वगैरे देतात त्यांना खरचं देवाने ह्रदय दिलयं की नाही. खरचं लोक इतके लालची असतात की त्यांना पैशापुढे एका जिवंत माणसाची किंमत कळत नाही. सुशिक्षित शिकलेली मुलं देखील हुंडा मागतात आश्चर्य वाटतं. खरचं तुमच्यावर मुलांनो इतके वाईट दिवस आलेत की तुम्ही स्वतःच्या लग्नाचा व गरजांचा खर्च बायकोला पूर्ण करायला लावता. ही प्रथा जुनी आहे, तिच आम्ही पुढे पाळतो असही लोक बोलतात. परंतु खरं पाहिलं तर पूर्वीच्या अगदी रामायण - महाभारतापासून बघितलं तर उलट लग्न करण्यासाठी नवऱ्या मुलांना स्वतःला स्वयंवरात सिद्ध करावे लागत होते. इथे उलटच चालू आहे प्रथा परंपरांच्या नावाखाली.

लग्न ही किती सुंदर गोष्ट असते. दोन जिवांचं, दोन कुटुंबाचे मरणोत्तर ऋणानुबंध जुळले जातात. त्यासाठी फक्त सुंदर मन आणि विचार यांचीच गरज असते. पैसा क्षणिक सुख नक्की देतो. पण तेच जर तुम्ही - आम्ही एखाद्या मुलीला हुंडयामध्ये फक्त तिचे संस्कार, कलागुण यांची मागणी केली तर ती मुलगी नक्कीच तुमच आयुष्य कायम सुखी करु शकते. कधीतरी विचार करावा त्या बापाला बिचाऱ्याला स्वतःची मौल्यवान वस्तू मुलगी द्यावी लागते तेही हुंडा देवून.

एकीकडे स्वतःला पुरुष म्हणणाऱ्या या पुरुषप्रधान लोकांना स्त्रीची कुठलीच कमाई वगैरे आवडत नाही. स्त्रीला फक्त रुबाब दाखवतात व त्याच स्त्रियांकडे हुंड्यासाठी तगदा लावतात.

खरचं मित्रांनो, विचार करा, खरचं तुम्हाला हुंड्याची गरज आहे का? आता जरी स्वयंवर ही प्रथा नसली तरी स्वतःला संसाररुपी स्वयंवरात तुमच्या जोडीदाराचे मन जिंकण्यासाठी सिद्ध करा.

हुंडा घेताना नक्की विचार करा कारण पुढे तुम्हालाही मुलगी होईल व तुम्ही तेव्हा एका लाचार बापाच्या भूमिकेत असाल.

**रुपाली इंगळे**

**एफ. वाय. बी. कॉम.**


# आम्ही सावित्रीच्या लेकी......

आम्ही सावित्रीच्या लेकी
जन्मलो तिच्याच स्वप्नांसाठी ......
सावित्री .....
फक्त आमुच्या चिमुकल्या पंखात तुझं बल दे !
लढण्याची ताकद दे !
ध्येयाची आसक्ती दे !
तरच, आम्ही चालवू शकू तुझा वारसा
आणि दाखवून देऊ जगाला की
आम्ही आहोत सावित्रीच्या लेकी ........

सावित्री, मी ही तुला वचन देते,
आम्ही अबला नव्हे तर,
सबला म्हणून जगणार आहोत,
जगाच्या प्रत्येक क्षेत्रात आमच्या कर्तृत्वाने
झळकणार आहोत.
फक्त आणि फक्त,
चांगल्याच गोष्टींसाठी झगडणार आहोत,
कारण, आम्ही आहोत तुझ्याच लेकी,
जन्मलो तुझ्याच स्वप्नांच्या पूर्ततेसाठी !!

**निकिता पवार**
**एफ. वाय. बी. ए.**

# अंधश्रद्धेतून परिवर्तन



दगडाच्या देवापुढे लोळतो
देती मनुष्याचा नर बळी
करती मुक्या पशुचा बळी
आल्या समस्या जीवनामधी
पाऊलो चालती ज्योतिषाच्या दारी
पाडती धोंडा पायावरी
वाण झिझले चक्रामारुनी
शरीर शिणले विचार करुनी
म्हणून ज्ञान घे ज्ञान घे
मनाला ध्यान दे ध्यान दे

दगडाला देव मानूनी रोज नैवेद्य दाखवण्यापेक्षा उपाशी माणसाला दोन घास द्यावे. समाजात विविध जाती धर्माचे विविध पंथाचे लोक राहात असतात. जो तो आपआपले धर्म, जात, रुढी, परंपरा यात अडकलेला आहे. ज्याला त्याला स्वतःच्या धर्म, जात, रुढी, परंपरा याचीच काळजी पडलेली आहे. देशापुढील आर्थिक, सामाजिक, राजकीय संकटे किंवा समस्या सोडविण्यासाठी कोणीही जास्त प्रमाणात विचार करत नाहीत. आज ७५ टक्के समाज हा अंधश्रद्धेमध्ये अडकलेला आहे.

ग्रामीण भागात खूप मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धा मानल्या जातात, व विश्वास ठेवला जातो. देवीच्या मंदिरापुढे अंगात येणारे हातवारे करुन अंगारे, धुपारे देणारे अजून सुद्धा खूप मोठ्या प्रमाणात पाहायला मिळतात. शिक्षणाचा अभाव असल्यामुळे अडाणी लोक यांच्या भूलथापांना बळी पडतात. अशा अंगारे धुपारे देणाऱ्या व्यक्तींनी जर सांगितलेल्या गोष्टी खऱ्या ठरल्या असत्या तर भारत देशाकडून संरक्षण खात्यासाठी दिला जाणारा सैनिक निधी एवढा खर्च करावा लागला नसता.

आज जम्मू काश्मीरसारख्या ठिकाणी हजारोंच्या पटीने सैनिक दिवसरात्र पहारा करत असतात घुसखोरांचा प्रतिकार करत असतात. त्याऐवजी जर अंगारे धुपाऱ्यांनी घुसखोरी करणारे मेले असते तर एवढा संरक्षणावर खर्च करावा लागला नसता.

आज ग्रामीण पासून शहरी दैनंदिन जीवनामध्ये ज्योतिषाकडे खूप मोठ्या प्रमाणात व्यक्ती ज्योतिषभविष्य जाणून घेण्यासाठी जात असतात. लग्न जुळविणे, मुलाचे शिक्षण, नोकरी अशा विविध समस्या घेवून जात असतात. त्यांनी दिलेल्या अंगठी, खडे हातामध्ये घालून व्यक्ती मिरवत असतात. जन्मापासून ते व्यक्तीच्या मृत्यूपर्यंत हे ज्योतिषी व्यक्तीच्या समस्यांच्या निराकरणासाठी खूप मोठ्या प्रमाणात पैशाची लूट करत असतात. ज्योतिषांना जर भविष्य कळले असते तर दुष्काळ पडलाच नसता, घटस्फोट झालेच नसते, भूकंप घडलाच नसता, देशामध्ये कोणतीच सामाजिक, आर्थिक व राजकीय संकटे पडलीच नसती कारण त्यांना सर्वांना आधी समजले असते. त्यांना स्वतःचे भविष्य कळले असते तर त्यांनी हा व्यवसाय केलाच नसता.

निसर्गाने मनुष्याला दोन डोळे दिले आहेत. पण ज्योतिषांनी त्यांची उपमा दुष्ट म्हणून लावली आहे. जर एखाद्याने गाडी किंवा घर घेतले तर मिरच्या, लिंबू, काळीबाहुली बांधली जाते. का? तर कोणाची नजर लागू नये म्हणून हा सर्व अंधश्रद्धांचा प्रकार आहे. आपल्या घरापासून या अंधश्रद्धा दूर केल्या पाहिजेत.

प्रत्येक मनुष्याच्या आयुष्यात जीवन जगत असताना विविध अडचणी, समस्या येत असतात. त्या त्यांनी शांत विचार करुन योग्य पद्धतीने निर्णय घेवून सोडवायच्या असतात. त्यासाठी स्वामी विवेकानंद यांनी ध्यान ही संकल्पना सांगितली आहे.

ध्यानाने एकाग्र झालेला कधीही अशा अंधश्रद्धांच्या व ज्योतिषाच्या मागे जात नाही. हा सर्व मनाचा खेळ असतो. आपले मन हे क्षणभंगूर आहे म्हणून मनावर ताबा मिळविण्यासाठी ध्यानाला जवळ केले पाहिजे व ज्ञानाचे महत्त्व तळागाळातील समाजापर्यंत पोहचविले पाहिजे.

अधं असूनी ज्ञान घेवून रस्ता शोधतील, डोळे असूनी अंधश्रद्धेमुळे

अंध तू होवून रस्ता चुकशील, जागा हो मानसा मनाला ज्ञान दे ध्यान दे

**उमेश दारवटकर**

**एफ. वाय. बी. कॉम.**

# विचारातील दहशतवाद

दहशतवाद हा या जगाला चिकटलेला घाणेरडा रोग आहे. आज सर्वत्र दहशतीचा प्रभाव जास्त प्रमाणात आहे. आज सर्वत्र संस्काराचे वातावरण कमी होत आहे तर चुकीचे वागणे वाढत आहे.

दहशत+वाद ही या शब्दाची शब्दफोड आहे. दहशत म्हणजे दुसऱ्यांना दम देणे किंवा त्यांना शारीरिक, मानसिक दुःख दहशतीच्या स्वरुपात देणे. वाद म्हणजे ज्या व्यक्तीला त्रास होतोय त्या व्यक्तीने काहीही न करता फक्त त्रास सहन करुन घेणे आणि काहीच न बोलणे. दहशतवाद आज वेगवेगळ्या प्रमाणात निर्माण होत आहे. जसे की, वडील घरातील बाकीच्या व्यक्तींवर उगाचच काही कारण नसताना त्यांच्याशी वसकून अथवा दादागिरी करत वागतात. जगात नाती असणे किंवा जगात एकटे असणे या गोष्टी 'दहशतवाद' या शब्दाला पुरेपुर अंगात घुसून दहशत करण्याचे कृत्य करण्यास भाग पडतो.

दहशतवाद हा दोन प्रकारे घडतो. एक म्हणजे कोणाचाच धाक नसणे त्यातच सर्व मोठ्या व्यक्तींचा त्याला पुरेपर आशीर्वाद असणे. येथे नमूद करणारी गोष्ट अशी यामध्ये शालेय विद्यार्थी आघाडीवर आहेत. हेच विद्यार्थी सोसायटी, बससेवा यामध्ये आपली मक्तेदारी दाखवतात. नाहीतर दुसरे मग आपले डोके नको त्या क्षेत्रात वापरुन पोलीस, कायदा यांच्या वहीला नाव रेकॉर्ड करणे नव्हे होणे. या सर्वांपेक्षा देशाच्या सीमेवर जाऊन मरणे हे योग्य. कारण आपल्या आसपासच्या देशातील दहशतवाद आपल्या देशात घुसण्याचे प्रयत्न करतात. हे तिथे होते तर देशात राजकारणी लोक जास्त करतात. मनात इच्छा असेल तरच दहशतवाद संपवता येतो.

**श्रीपाद कुलकर्णी**

**एफ. वाय. बी. कॉम.**

# आरक्षण

चालले होते रस्त्याने वाटेत पृथा भेटली
मी विचारले शाळेतून अर्ध्यातच का परत आलीस?
ति म्हणाली, फी नाही भरली म्हणून बाईंनी हाकलून दिलं.
मनात विचार आला, का आरक्षण नाही माझ्या पृथेला?

पुढे काही दिवसांनी गावाला गेले,
कळलं रामकाका गळफास घेवून मेले!
कारण कळले, होते बुडलेले कर्जात
मनात परत विचार आला का नाही आरक्षण,
माझ्या शेतकरी काकाला?

गावात अजून एक गरीब कुटुंब होतं.
ना जमीन - जुमला काही होतं
कष्ट करुन अर्धी भाकरी खावून झोपणारं गरीब कुटुंब होतं!
मनात विचार आला का नाही आरक्षण त्या
कष्टकरी गरीब कुटुंबाला?

माझी मैत्रिण विद्या फार हुशार होती
उच्च शिक्षणासाठी ना तिजकडे पैसे होते
ना तिच्या जातीला आरक्षण होते!
मनात विचार आला का नाही तिच्या
कलागुणांना आरक्षण?



माझे विचार ऐकून विद्या म्हणाली, खरंय तुझं
ज्यांना आहे आरक्षण आणि ज्यांना हवयं त्या दोघांनाही
नको द्यायला आरक्षण!
तेवढ्यात फुगे विकणारी बाई आली,
तिनं मागितलं पाणी, विद्यानी आणलं पाणी,
आणि तांब्या खाली ठेवला,
तेंव्हा कळलं का देतात त्या जातींना आरक्षण!

माझे दोन मित्र होते एकाच Status होतं
'एक मराठा, लाख मराठा; आणि एकाचं होतं
'एक महार, लाख ठहार' तेव्हा कळलं
हे तर राजकारणाचं आरक्षण!

तुमच्या कला - गुणांना मागा आरक्षण
तुमच्या कष्टाला मागा आरक्षण!
तुमच्या भुकेला मागा आरक्षण
नका मागू जातीला आरक्षण!
सिमेवरती जात - पात विसरुन लढणाऱ्या सैन्याला आणि
आपल्या शेतकरी बापाला मागा आरक्षण,
नका मागू जातीला आरक्षण!

चला संघटीत होवूया आपण,
मागू आपल्या हक्कांना आरक्षण,
नको मागूयात जातीला आरक्षण!

**रुपाली इंगळे**

**एफ. वाय. बी. कॉम.**

# कॉलेजचे विश्व



कॉलेजचे विश्व म्हणजे,
मस्तीत धुंद होण्याचे
की, करीअर घडवण्याचे
तास बंक करण्याचे
की, विषय समजुन घेण्याचे
कॉलेजचे विश्व म्हणजे
बाईक घेऊन फिरण्याचे
की, शिक्षकांचा आदर करण्याचे
पाच-सहा मित्र, मैत्रिणी बनवण्याचे
की, एकच खरी मैत्रिण शोधण्याचे
कॉलेजचे विश्व म्हणजे
कारण नसताना भटकण्याचे
की निसर्ग प्रेम शिकवण्याचे
मोबाईल घेऊन फिरण्याचे
की स्वतःच्या बळावर पैसे कमविण्याचे
आता सांगा तुम्हीच
कॉलेजचे विश्व म्हणजे
एक सुंदर जीवन जगण्याचे
की, जीवन रंगहीन करण्याचे !

**पुजा देसुरकर**
**एफ. वाय. बी. ए.**

# हुंडा - योग्य की अयोग्य

हुंडा..... हा एक असा शब्द आहे की त्यामुळे आज कितीतरी जणींची लग्न होत नाहीत. परंतु हुंडा घेणे किंवा देणे ही गोष्ट खरचं किती योग्य आहे? आज जर मुलगी ही मुलाच्या समान समजली जाते तरीही तिचे लग्न होण्यासाठी हुंडा का दिला जातो? काही वर्षांपूर्वी म्हणजेच १८ व्या आणि १९ व्या शतकात तर स्त्रियांना घराबाहेर पडण्यास बंदी आहे परंतु ते योग्य नाही. याच शतकांमध्ये मुलींचे बालविवाह केले जायचे. त्यांच्या नकळत्या वयातच त्यांची लग्ने लावून त्यांना अशा लोकांच्या हाती दिले जायचे ज्यांना तिने कधी पाहिलेली नाही आणि अशा लोकांमध्ये जाऊन तिचे आयुष्य तडजोड करावे लागायचे.

परंतु माझ्या मते पूर्वीपेक्षा आजचा समाज थोड्या प्रमाणात बदलला आहे असे म्हणावेसे वाटते. कारण आजच्या अस्मिता भर मांडवात लग्न मोडून असा प्रश्न विचारतात की जर लग्नासाठी कुणी हुंडा न घेता माझ्याशी लग्न करण्यास तयार असेल तरच मी हे लग्न करेन. हे अगदी बरोबरच आहे. जर आजची स्त्री ही वैमानिक, डॉक्टर, इंजिनियर, वकील असू शकते तर तिला कोणत्याही प्रकारचा हुंडा देण्याची गरज भासणार नाही.

आजच्या काळात माझ्या ऐकण्यामध्ये काही अशा प्रकारच्याही घटना आहेत जिथे लग्न करण्यासाठी हुंडा देऊन मगच त्यांच्याशी लग्न केले जाते. व माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे मुस्लिम धर्मातील निकाह करतेवेळी मुलांना मेहेर द्यावी लागते.

भारतात हुंडा ही एक पूर्वीपार चालत आलेली प्रथा असून मनुस्मृती मध्ये असा उल्लेख आहे की मुलीच्या लग्नामध्ये देण्याच्या स्वरुपामध्ये धनसंपत्ती, गहू, सोने आदि गोष्टी मुलींना देऊन तिला मुलांना सोपावली जाते. परंतु हे किती प्रमाणात असावे ह्याचा उल्लेख केलेला नाही. जसे जसे काळाचे स्वरुप बदलत गेले तसे मुलांकडील लोक हा स्वतःचा अधिकारच समजू लागली आणि मुलाकडील लोक वर्तमानात जाहिरात देऊन मुलगा व मुलगी ह्या योग्यतचे आहेत वगैरे दिले जाते. त्यांचा पगार किंवा उत्पन्न इतके इतके आहे आणि त्याचा परिवार हा किती उच्च दर्जाचा आहे हे स्पष्ट केले जाते. परंतु हे सर्व वाचून मुलीकडचे जर मुलाकडे गेले तर त्यांचे खरे रुप समोर येते. मुलाकडील लोक घुमवून फिरुन अशा काही

गोष्टी सुरु करतात की ज्याचा अर्थ निश्चित हुंडा हाच असतो आणि जर हा हुंडा देऊन व लग्न झाल्यावरही अजून हुंडा मिळावा म्हणून मुलींना त्रास, वेदना, मारहाण केली जाते. अशा प्रकारे हुंड्यासाठी तिचा बळी घेतला जातो, तिला जाळून मारले जाते किंवा तिचा खून होतो. असे ना अनेक प्रकार रोज वर्तमानपत्रातून आपणास पहावयास मिळतात.

असो.... आपणास अशा प्रकारचे कोणतेही लग्न होताना दिसले तर ते होऊ न देता त्याला विरोध करावा हा त्रास कोणीही सहन करु नये व कोणाला होऊ देऊ नये. व असे झाल्यास तो त्रास सहन करु नये.

**सिद्धी बोकील**

**एफ. वाय. बी. कॉम.**

---

# काही आठवणी

दया, माया माणुसकी
कुठं काय त्यांच्यात उरलं ?
जागोजागी अतिरेक्यांनी
सुरुंगाला पेरलं
एक दिवस नायनाट
होणार ह्या विषारी सापांचा

घडा भरत आलाय
आता त्यांच्या पापांचा
मुजरा त्यांना मानाचा
जिवावर लढले आमुचे वीर
देशासाठी प्राण गमावले
घेऊन तळ हातावर शिर !

**पुजा देसुरकर**

**एफ. वाय. बी. ए.**

# माझे रात्र महाविद्यालय

ही आवडते मज मनापासूनी रात्र शाळा, परिस्थितीशी झगडून, पोटाची आग विझवून
वळती पाय ज्ञान रात्र महाविद्यालय दाराशी

देशातील प्रगती ही ज्ञानावर अवलंबून असते. समाज ज्ञानमय झाला तर देश ज्ञानमय होतो. समाजाची प्रगती होते. समाजातील अनाथ व संघर्ष करणाऱ्यास ज्ञानाचा उपयोग होतो. म्हणून माणसाने आयुष्यभर म्हणजेच मृत्यूच्या शेवटच्या क्षणापर्यंत ज्ञान शिक्षण घेत राहिले पाहिजे.

परिस्थिती संघर्ष यांच्या जोडीला जर ज्ञानाची भर दिली तर समाजातील खूप अडचणी दूर होतील. सरस्वती रात्र महाविद्यालय हे सुद्धा एक खूप मोठे ज्ञान मंदिर आहे. विद्येची देवता म्हणजेच सरस्वती. म्हणून रात्र महाविद्यालय ही एक ज्ञानदेवता आहे. समाजातील विविध जाती धर्मातील तसेच ज्ञानासाठी उपाशी असलेल्यांची भूक या सरस्वती ज्ञान मंदिरात भागवली जाते.

ना वयाचे बंधन, ना जातीचे बंधन, ना धर्माचे बंधन, फक्त ज्ञानाचे बंधन

या रात्र महाविद्यालय या ठिकाणी असलेला प्राध्यापक वर्ग हा आपल्या हृदयापासून समोरच्या विद्यार्थ्याला ज्ञानदानाचे कार्य करत असतात. विद्यार्थ्यांची आवड - निवड लक्षात घेवून रात्र महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग हा विद्यार्थ्याला मार्गदर्शन करत असतो.

माझ्या रात्र महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी वर्गाचे आभार मानावे तेवढे थोडेच वाटतात. कारण रात्र महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग हा रात्री १०.०० पर्यंत दिवसभर कुठे ना कुठे तरी परिस्थितीमुळे नोकरी करुन शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ज्ञानदानाचे व मार्गदर्शनाचे काम करत असतात.

आम्ही आमच्या परिस्थितीचे आभार मानतो कारण त्यामुळे तर आम्हाला या सरस्वती रात्र महाविद्यालयातील ज्ञान मंदिरात ज्ञान घेता आले व ज्ञानवंत, किर्तीवंत अशा गुरुजनांकडून ते ज्ञान आम्हाला मिळाले.

लाभले भाग्य आम्हाशी, ज्ञान घेता आले सरस्वती मंदिराशी
धन्य ते रात्र महाविद्यालयातील गुरुजन, धन्य ते रात्र महाविद्यालय

**उमेश दारवटकर**
**एफ. वाय. बी. कॉम.**

# गुरुजन

.... जगणं म्हणजे काय?
हे तुमच्याकडून शिकावं
.... तुमच्या बोलण्यातून
जीवनाच्या यशाचं रहस्य जाणावं....
खरंच इतकं अनुभव - समृद्ध आहे.
.... तुमच आयुष्य!
तुमचे अनुभवाचे बोल
मला वेळावेळी मार्गदर्शन करतात
या जीवनातील अनंत अडचणींना
सामोरे जायला शिकवतात.
.... तुमचे विचार इतके
प्रगल्भ आहेत की,
त्याचे तेज मला सूर्यासमान वाटते.
म्हणूनच;
तुमचा प्रत्येक शब्द
माझ्यासाठी प्रमाण आहे.
जणू माझं जीवनच आहे....

**शिवम बोरकर**
**एम. कॉम. द्वितीय**

# तू....

रे तुझ्या जीवनाचे गाणे गाणे व्हावे
डोळ्यात सरी अश्रकांच्या मी गाणे गात भिजावे
सोनसळी हास्याने सारे जग उजळावे
ते हिरवे श्रावण रावे उंच उंच लहरावे
कुण्या बंदीशीने का गीत तुला ठरवावे
मुक्त छंद कविता तू मुक्त मुक्त बहरावे
मी व्हावे कस्तूर हरीणी तू माझे मृगजळ व्हावे
तू अंतरमम असताना मी तुझ्यात आणि विसावे
मी अहोरात्रीची सविता तू पूर्ण सूर्य प्रकाशावे
मी अर्धमुर्धेसे जगणे तू पूर्णविरामा यावे
तू विश्वरुप दर्शावे मी पार्थ श्रीकृष्ण व्हावे
तु स्वहस्ते मरावे मी कंस म्हणूनी यावे
मी आणि काय करावे आणि काय लिहावे
तू सोडून तोडून जाणे श्वासातून जगणे जावे

**श्लाका वऱ्हाडकर**
**टि. वाय. बी. कॉम.**

# विलिनीकरण

जेव्हा भारत स्वतंत्र झाला त्यानंतर काही वर्षातच हैद्राबाद, जुनागड संस्थांने विलीन होण्यास सुरुवात झाली. तो एक इतिहास होता. तेंव्हा ते खूप गरजेचे होते. फक्त प्रश्न राहिला तो जम्मू – काश्मिर, अरुणाचल प्रदेशचा. कारण ही दोन राज्ये आज पाकिस्तान आणि चीन या देशांच्या ताब्यात भारताचा काही भाग आहे.

आज सर्व राज्यांनी एकत्रित येऊन काम करण्याची गरज आहे. जसे की सेवा – वस्तू कर (GST) हा सर्व राज्यांमध्ये वेगवेगळ्या टक्क्यांनी आकारला जाणार आहे. जसे की महाराष्ट्र राज्य १० टक्के, गुजरात राज्य १२ टक्के इ. असे न करता सर्वच ठिकाणी एकच कर लावावा जो केंद्र सरकार ठरवेल की जेणेकरुन कोणत्याही राज्याच्या तिजोरीवर ताण पडू नये. हा कर मंजूर होण्यासाठी राज्यसभा व संसद मंत्रिमंडळाचे हवामानानुसार अधिवेशनात विरोधक या पक्या राजकारण्यांनी ते मंजूर करण्यास मदत करावी. खरे तर सत्ताधारी आणि विरोधक यांनी एकत्र येऊन या देशाचा विकास करावा.

सर्व राज्यांचे मुख्यमंत्री हे या देशाचे नागरिक आहेत. हेच २९ घटक राज्यातील मुख्यमंत्र्यांना जर पंतप्रधानांच्या मंत्रिमंडळातील २९ घटक मंत्री म्हणून जर स्थान दिले तर ते एकदम उत्तम होऊल. दोन राज्यांच्या सर्व सेवा जर एकमेकांनी जर ५० टक्के वापरल्या तर त्याचा फायदाच आहे. जसे महाराष्ट्र सरकारची एसटी आणि कर्नाटक सरकारची बससेवा यांचा जर संगम म्हणजेच विलिनीकरण केले तर किती फायदा होईल. त्याने संपूर्ण देशाच्या एकूण उत्पन्नामध्ये फरक पडेल. सर्व राज्यांमध्ये काही ना काही तपास यंत्रणा आहे जी काही त्या राज्यापुरती आणि इतर देशापुरती, देशाच्या सीमेवर जवान गुन्हेगारांच्या सीमेवर पोलिस, अरुणाचल – तिबेट सारख्या भागात त्यांचे वेगळे जवान, पुणे, दौंड आणि इतर ठिकाणी राज्य राखीव पोलिस दल (SRPF) हे सगळे वेगवेगळ्या असणाऱ्याबरोबरच सीआयडी, सीबीआय यांपेक्षा सरळसरळ 'भारतीय सुरक्षा विभाग' जर निर्माण केला तर त्यामध्ये या सर्वांचे विलिनीकरण करा. मग सर्वजण एकच प्रतिज्ञा घेतील (त्यात नौदल, हवाईदल समाविष्ट)

– मी या भारत देशाचा नागरिक आणि भारतीय सुरक्षा विभागाचा अधिकारी या नात्याने मी या देशाच्या प्रत्येक राज्याची प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या संपूर्ण रक्षण करेन. या सुरक्षेचे नुकसान तेच माझे नुकसान.

या देशामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या परिवहन सेवा आहेत. त्यात काही राष्ट्रीय आहेत तर काही प्रादेशिक आहे. त्यांचे विलिनीकरण करुन जर 'भारतीय परिवहन बोर्ड' या नावाचा केंद्रित मान्यता प्राप्त असा विभाग तयार करुन त्या अंतर्गत सर्व परिवहनाच्या गोष्टी आणाव्यात. जसे पुण्यात PMPML, मुंबईला BEST इ. त्यापेक्षा पुण्यात 'पुणे बस बोर्ड' किंवा 'पुणे परिवहन बस बोर्ड' या दोन्हींपैकी जे जमेल ते स्थापन करुन यंत्रणांचे विलिनीकरण करावे. पुण्यात सर्वच ठिकाणी सध्या PMPMl चे डेपो आहेत. काही डेपो हे गावालगत (गावात) आहेत. या सर्वांचा थेट संबंध एक मुख्यालय म्हणून स्वारगेट येथे येतो. त्यापेक्षा त्याच डेपोंच्या पातळीवर त्यांचा त्यांचा त्यांना हवा असलेला विकास करावा आणि दोन 'पुणे परिवहन अथवा बस बोर्ड' विभागाच्या शाखांना एकत्रित विकासासाठी जोडावे. उदा. पुणे बस बोर्डाची अथवा परिवहन बस बोर्डाची सासवड आणि कोथरुड या दोन ठिकाणांच्या शाखा यांना एकमेकांशी जोडा. त्यामुळे दोन ठिकाणांच्या नागरिकांमधील संबंध नव्याने सुरु होण्यास मदत होईल. आज पुण्यात एकदम सुरक्षिततेत पुण्याच्या BRT मार्गातून एसटी जाते. त्यांचेच जर विलिनीकरण या बोर्डात करुन घेतले तर याच शाखांमधून पुणे शहराच्या चहूबाजूंनी जाणाऱ्या रस्त्यांवर प्रवासी वाढण्यास मदत होईल. हा बोर्ड केंद्र सरकार प्रस्तावित करुन संपूर्णपणे वेगळा व राजकारण नसणारा करावा. यामध्ये कोणतीही बाहेरची कंपनी प्रस्ताविक असू नये. काही करुन कोणत्याच राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्याला स्थान देऊ नये. एसटीचे यातच विलिनीकरण करुन या गोष्टी कराव्यात. आत्ताचा पुणे PMPML पासाच्या ऐवजी जे नाव ठरेल ते ठरवून पुणे '–' (ठरवलेले नाव) पास असे करावे. आणि त्या पासावरील वय हे प्रत्येक महिन्याला त्या व्यक्तीला विचारुन लिहावे. त्याचे जे काही पैसे घेतले जातात ते पैसे त्याच बोर्डाच्या शाखेतील प्रत्येक विभागाला थोडे थोडे द्यावेत जेणेकरुन स्वायत्तरित्या पैशांसाठी कोणतीच अडचण राहणार नाही. त्याचबरोबर एसटीचे विलिनीकरण त्यातच असल्याने त्यांच्याच शाखेत त्यांचा एक वेगळा विभाग करुन त्यांचे आणि यांचे एकत्रित उत्पन्न दाखवून (घोटाळ्याविना) महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात यांनी टॅक्स भरला म्हणून अशी योजना (अर्थसंकल्पात Provision as a payment of Dept) समाविष्ट केली पाहिजे. सर्व राज्यांच्या राजधान्या मिळून एक देश या अर्थाने त्यांच्या भाषा, आकाशवाणी, दूरसंचार विभाग, दुभाषिक यांचा एकत्रित विलिनीकरण करुन हीच त्या देशाची तांत्रिकदृष्ट्या एक मदत आणि आरमारांचे जाळे उभारले जाईल. यांचा भारतीय मनोरंजन सेवा (B.E.S.B.) बोर्ड स्थापन करावे.

या देशात भरपूर विघातक गोष्टींवरच बंदी घातली गेली पाहिजे. त्या वस्तूचा धाक मनात खोलवर गेला पाहिजे की कोणत्याच वयातील व्यक्तीने त्याला हात लावता कामा नये. त्यातून फक्त महसूल मिळतो म्हणून हात लावायचा नाही तर ते आज खूप धोकादायक आहे. महाराष्ट्र राज्यासारखे सुरक्षित राज्य

आज कोठेच नाही असे म्हणतो आणि इथेच जास्त अत्याचार होतात. येथे तसे न करता संपूर्ण भारतात 'सामाजिक सुरक्षा बोर्ड' स्थापन करुन आणि तो 'भारतीय सुरक्षा बोर्डाच्या' अंतर्गत स्थापन करुन विकृतरित्या माणसांना, दारुच्या बारवाल्यांना, गुन्हेगारांना शिक्षा देऊन समाजात सुरक्षेचा एक आदर्श तयार करावा.

आज भारत देशात खूप राज्यांचे शिक्षण मंडळ राज्यांचे बोर्ड, विद्यापीठे भरपूर आहेत. आज त्याच सर्वांचे विलिनीकरण करुन 'भारतीय शैक्षणिक बोर्ड' स्थापन करुन यांच्या पातळीवरील सर्व समित्या बरखास्त करुन यांना केंद्रित (under) करावे. यांना कोणत्याही राजकीय पक्षाचा लाभ असू नये. या सर्व स्वायत्त आणि शैक्षणिक प्रवाहाचे घटक म्हणून 'भारतीय शाळा, परीक्षा (SSC & HSC), विद्यापीठ बोर्ड स्थापन करुन याचबरोबर कॅन्टीमेंट बोर्डाच्या शाळांना सुद्धा एकत्रित करुन यांच्या अंतर्गत (भा. शै. बो.) काम करायला लावावे.

भारतीय न्यायव्यवस्था जगात श्रेष्ठ मानली जाते. तिचे देखील विलिनीकरण करुन यांचे कार्टर्स हे एकत्रित विलिनीकरणीत राज्यांना जोडून दोन राज्यांतील पोलीस, न्यायव्यवस्था यांचा समतोल ढासळू न देता यांच्यासाठी 'भारतीय कायदा बोर्ड' असावा. हे चूक नाही. वेगवेगळ्या राज्यांच्या पोलिसांऐवजी भा. सु. वि. तील लोकांना (अधिकाऱ्यांना) एखादा गुन्हेगार हवा असेन (त्या राज्यात आणि अटक झालेल्या राज्यात) तर एकमेकांना मदत करुन त्या गुन्हेगाराला शिक्षा द्यावी.

केंद्र आणि राज्य सरकारांच्या सर्व विभागांतील नोकऱ्यांचा उल्लेख इथे करुन यांचेही विलिनीकरण करावे असे वाटते. आज भारत देशात बेरोजगार भरपूर आहेत त्यांच्या दृष्टीने हा एक फायदा आहे. सर्व विभाग बरखास्त करुन 'भारतीय रोजगार बोर्ड' स्थापन करुन यांना यांच्या शिक्षणानुसार रोजगार देण्यात यावा. जेणेकरुन यांची कुठेही फसवणूक केली जाणार नाही. यांना नोकरी देताना काही स्किल्स वापरले जातात. जसे की, Science, - Enginerring त्यांचे कोर्सेस, Commerce कोर्सेस इ. अशा कोर्सेस विभाजन न करता एकत्रित करुन त्यांचे 'भारतीय कोर्सेस बोर्ड' स्थापन करुन काही कॉमन गोष्टींचे कोर्सेस येथे अंतर्गत (under) करुन त्यांची माहिती, त्यांच्या नोकऱ्या हे सर्व त्यांच्याच शहरात, गावात आणि राज्यांत मिळावे त्यासाठी फिरण्याची त्यांना गरज नाही.

लोक काही ना काही कारणाने एकडून तिकडे स्थलांतर होत असतात. अशांसाठी 'भारतीय प्रवासी बोर्ड' स्थापन करुन तो व्यक्ती ज्या राज्यातून – ज्या राज्यात जाणार आहे त्या व्यक्तीच्या तिकीटाचे सर्व पैसे हे तो ज्या राज्यात जाणार आहे तेथील बोर्डाला द्यावेत आणि येताना ज्या राज्यातून येणार त्या राज्यांतील बोर्डाच्या ऑफीसमध्ये त्याचे तिकीट काढून त्याचे पैसे तो जाणाऱ्या राज्याच्या बोर्डाच्या शाखेत ते जमा करावेत जेणेकरुन भा. प्र. बोर्डाचा जनहित (जनतेकडून – जनतेसाठी) चा निधी वाढेल.

भारतीय खेळ हे भरपूर आहेत त्या सर्वांच्या सर्व समित्या बरखास्त करुन 'भारतीय खेल (खेळ) बोर्ड' स्थापन करावे. आत्ताचा महाराष्ट्र संघ, पोलीस बोर्ड संघ, सेनादल, रेल्वे, इ. पेक्षा 'भा. खे. बोर्ड' म्हणून जर खेळले गेले तर भरपूर फायदाच आहे. यात स्पर्धा ठेवाव्यात पण देशातल्या राज्यांसाठी नव्हे तर विलिनीकरणीत देश VS परकीय देश. प्रत्येक खेळासाठी असेच करावे. त्यामुळे जगाबरोबर स्पर्धा करण्याची ताकद दुपटीने वाढेल.

भारतात पर्यटन स्थळे भरपूर आहेत. प्रत्येक राज्याचे पर्यटन विभाग आहे. त्याऐवजी 'भारतीय पर्यटन विभाग अथवा बोर्ड' स्थापन करुन देशातील सर्व पर्यटन स्थळे हे एकमेकांना जोडण्यास मदत होईल. या सर्वांसाठी निधी हा केंद्र सरकारने पुरवाराचं असे नाही. या देशाचा All tax भरुन बाकीचा निधी यासाठीच वापरता येईल त्यात कर्मचाऱ्यांचा पगार, त्यांचा विमा इ. गोष्टी येतील. भारत हा युवकांचा देश आहे. त्याने मतदान करुन पर्यटन विभागाच्या बदलाबरोबर इतरही गोष्टीचे विलिनीकरण करण्यास तो मदत करेल त्यामुळे जरुर मतदान करा.

■ **जाता जाता आणि हे लिखाण संपण्यापूर्वी :-**

१) या लिखाणाचा उद्देश हा फक्त नागरिकांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आणि विकास करणारा आहे.

२) यातून आम्ही या देशाचे नागरिक आहोत आणि आमच्या देशात भरपूर बदल घडवू शकतो हेच यातून स्पष्ट होते.

३) हे करावे की करु नये हे फक्त येथील नागरिकांच्या आणि शासकीय यंत्रणांच्या निर्णयावर अवलंबून आहे.

४) आमचे भाग्य असे की राज्यस्तरावरील 'केशवसुत करंडक' १०-११ फेब्रुवारी २०१७ सालात सादर होत आहे. आमचे नशीब चांगले आहे की आम्ही सरस्वती मंदिर नाईट कॉलेज येथे शिकत असून आम्हाला भरपूर नवीन गोष्टी कळण्यास मदत झाली. आम्ही प्रयत्न करुच की या वर्षी संस्थेचा प्रथम क्रमांक कसा येईल याच्यासाठी भरपूर परिश्रम घेईन.

५) हे लेखन फक्त लोकांना सेवा हा उद्दिष्ट ठरवून असणाऱ्या भारत देशातील यंत्रणेसाठी आहे.

**श्रीपाद कुलकर्णी**

**एफ. वाय. बी. कॉम**

# सोनपरी



जन्मले जेंव्हा मी होते इवलुशी
नाक ते कसले तरी, डोळे ते कसलेतरी
तरी ती मला म्हणे माझी सोनपरी

काय तिची ती वेडी माया
आळशी, अधाशी, तापट अशी मी
तरी ती सगळ्यांस म्हणे ही आमच्या घरची छाया!

किती तिला तो माझा हेवा,
आणि मी काही काम नाही कलं तर म्हणे,
कारटी अशी-कशी रे देवा!

किती ती बाई कणखर - करारी
पण जेंव्हा होई आम्हा भावंडांची हाणामारी
तेंव्हा ती कणखर - करारी होई संतापित बिचारी!

शाळेत जात नाही म्हणून,
शाळेपर्यंत मारत मारत न्यायची आणि
शाळेतून मी परत आले की मुके घेऊन घेऊन गोंजारायची
ती नेहमी असचं करायची
शाळेत जाताना तर एकच रुपया द्यायची!

होती ती चौथी पास अडाणी तरी
मला म्हणायची अभ्यास कर
कर एवढी माझ्यावर मेहेरबानी!

मी जर कोपऱ्यात बसून मुळू मुळू रडले तर,
जवळ घेऊन लाड करायची, आणि भोकाड पसरुन रडले,
तर अजून मारायची! खरं ती असचं करायची!

मी चार चौघात उगाच हसले की,
मुलीच्या जातीने जरा लाज बाळग असं म्हणायची,
आणि चार चौघात उगाच हसले की
मुलीच्या जातीने जरा लाज बाळग असं म्हणायची,
आणि चार - चौघे विनाकारण मला हसले तर
त्यांची खैर नसायची!

किती ती माझ्यावर प्रेम करायची
मी काही खोडी केली तर भिती दाखवायची पप्पांची,
आणि पप्पा चिडले की, पाठीमागे स्वतःच लपवायची!

कधी कधी वैतागून म्हणायची,
कधी जाईल ही कारटी लग्न करुन, आणि
चाले कुठं चार दिवस मग स्वतःच
रडू लागे पदर धरुन!

ती स्वतः कमी जगली पण मला मात्र
मरेपर्यंत हसत जगायला शिकवून गेली!
स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी,
मग तिची ही सोनपरी,
आज किती बिचारी? आज किती बिचारी.....

**रुपाली इंगळे**
**एफ. वाय. बी. कॉम.**

# नाती हरवत चाललेला समाज

आपल्या भारतात पूर्वीपासून ही एक सामाजिक बांधिलकी आहे. आपण सर्वजण प्राचीन काळापासून ते आजच्या युगापर्यंत आपण सर्व लोक एकत्रितपणे राहात आहोत. आपला भारत देश हा विविधतेने नटलेला देश आहे. भारत देशात, असंख्य जाती आहेत. असंख्य भाषा बोलणारे वेगवेगळी संस्कृती असणारे लोक आहेत. पण आजच्या घडीला आपला भारत देश हा समाजा समाजामध्ये भांडताना आपल्याला दिसत आहे. भारत देशात अनेक प्रकारचे सांस्कृतिक, पारंपारिक सण साजरे होतात. समाज म्हणजे काय हे आपल्या भारतातल्या लोकांना अजून पुर्णपणे समजलेलं नाही, कारण मला असे वाटते की भारत हा पुर्णपणे या भूतलावावर वेगळा देश आहे. भारत देशात असंख्य महापुरुष, महामानव, राष्ट्रसंत, संत, महंत होऊन गेले. त्या महापुरुषांनी आपले विचार हे आजच्या व पूर्वीच्या लोकांना आपल्या विचारातून व आपल्या अभंगातून, प्रबोधनातून समाजाला चांगला संदेश दिला आहे.

पण आज भारत देशात हे लोक आपल्या आपल्या मध्ये भांडत आहे. समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. समाजामध्ये राहाणारे असंख्य जाती धर्माचे व प्रातांचे लोक गुण्यागोविंदाने नांदत आहेत. पण काही समाजकंटक लोक हे त्यांना पाहावे वाटत नाही. त्यामुळे त्यांना करावे वाटते आज आपल्या समाजामध्ये थोर महापुरुष होऊन गेले त्यामध्ये प्रामुख्याने तथागत गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, सम्राट अशोक, महात्मा फुले, महात्मा गांधी, सावरकर, लोकमान्य टिळक, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सर्व महापुरुषांनी पूर्ण भारतातल्या समाजाला म्हणजे सर्व जातीला असे ठणकावून सांगितले की जातीपाती धर्म हे काहीही नसून 'मानवजात' ही एक फक्त जात आहे. आजचा समाज हा ह्या थोर महापुरुषाचे विचार डावलून आपले घाणेरडे विचार समाजामध्ये पेरण्याचा ह्यांचा प्रयत्न चालू आहे.

स्वतंत्रपूर्व काळात भारतात सर्व समाज एकत्रितपणे राहात होता. आणि कोणत्याही संकटांना सर्व समाज धावून जात होता. तेंव्हा ते लोक आपली जात पाहात नव्हते आणि तेंव्हा विचारपण करत नव्हते की जाऊ का नको, जाऊ का नको. मात्र आजचा समाज हा जाती धर्मांमध्ये विभागलेला आहे. आणि जाती – धर्मांमध्येच भांडणे करत आहे. पण त्यांना हे माहित कसे नाही की आपण सर्वजण 'भारतीय' आहोत. आणि आपली पहिली जात ही 'मानवता' आहे. म्हणून आजच्या समाजामध्ये खूप मोठा बदल

झालेला आपल्या नजरेस आपल्याला दिसून येतो. आजचा आपला समाज बांधव हा आपल्या आपल्यामध्ये युद्ध करण्याच्या तयारीत आहे. समाज हा जाती - जाती मध्ये लढत आहे. काही लोक समाजामध्ये चांगल्याप्रकारे राहात असलेल्या लोकांच्या डोक्यात जातीचे खूळ भरून समाजामध्ये तेढ निर्माण करतात. आणि भांडण लावून देतात. आजच्या घडीला आपल्या देशात भारतात मुख्य व प्रामुख्याने हिंदू - मुस्लीम या दोन धर्मामध्ये काही समाजकंटक मोठी भांडणे लावण्याचा त्यांचा कट आहे. आपल्या भारताच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिकतेला तडा देण्याचा प्रयत्न काही समाजकंटक करत आहे. पण तो तडा आपल्याला जाऊ द्यायचा नाही. आपण सर्व जणांनी तथागत बुद्धाचा, छत्रपती शिवाजी महाराजांचा, लोकमान्य टिळकांचा, मौलाना आझादांचा, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा, वि. दा. सावरकरांचा आदर्श व विचार हे आजच्या समाजामध्ये रुजवणे ही एक प्राथमिक व गरजेची गोष्ट बनत चाललेली आहे.

आपल्या भारतातल्या सर्व समाज बांधवांनी भारताला उच्चतेच्या शिखरावर पोहचवायला मदत केली पाहिजे. हे एक प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य असले पाहिजे. मी तर म्हणतो हे आपले कर्तव्य नसून आपले ध्येय व स्वप्न असले पाहिजे. भारतातील प्रत्येक व्यक्ती शिकली तर हे साकार करायला जास्त वेळ लागणार नाही. आणि भारतामध्ये आपला समाज पूर्वी सारखा गुण्यागोविंदाने नांदला पाहिजे. समाजामध्ये छोटे मोठे, गरीब - श्रीमंत, महाराष्ट्राचा बिहारचा असे करणे चुकीचे आहे. आपल्या भारताची राज्यघटना त्यांचेच एक प्रतिक आहे. की त्या राज्यघटनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाती - धर्माला थारा दिलेला नाही. आणि सामाजिक, आर्थिक, राजकीय, न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. भारतात माझ्या वैयक्तिक मताप्रमाणे जर आजचा युवक हा जर आपली जात आपल्या घरातून बाहेर पडताना घरात सोडून आला पाहिजे. आणि बाहेर 'भारतीय' म्हणून जगला पाहिजे. व सर्व जातीच्या लोकांच्या लोकांबाबत चांगले वागले पाहिजे. हे माझे वैयक्तिक मत आहे.

जय महाराष्ट्र जय भारत!!

आजचा हरवत चाललेला समाज हा पुढील काळात एक होईल व सौख्य सामावून राहील ही माझी इच्छा व स्वप्न आहे. जय हिंद!!

**विकी कांबळे**

**एस. वाय. बी. कॉम**

# नोटाबंदी - योग्य की अयोग्य?




आपण नोटाबंदी का याचे पहिले कारण पाहुया. नोटाबंदी कशासाठी, नोटबंदीमुळे काय साध्य होणार आहे हे आपण खालीलप्रमाणे पाहुया.

नोटाबंदी हा अतिशय महत्त्वाचा मुद्दा आहे. देशातील अर्थव्यवस्थेला नोटाबंदी हा महत्त्वाचा मुद्दा आहे. नोटाबंदी कशासाठी करावी, नोटबंदी केल्यामुळे काय साध्य होणार आहे व भविष्यात लोकांना चांगल्या प्रकारच्या सेवा, चांगल्या प्रकारच्या वस्तू, भ्रष्टाचार, थांबवावा यासाठी नोटाबंदी करावी हा मुद्दा महत्त्वाचा ठरतो. नोटबंदी ही आतंकवादविरोधी अतिशय महत्त्वाचा निर्णय आहे आणि तो योग्यही आहे. कारण जे कमवतो व त्याचा कर भरत नाहीत आणि तो पैसा लपवून ठेवतो सरकारपासून त्याला आपण ब्लॅकमनी असे म्हणतो.

- **नोटाबंदी समस्येला तरुणाकडून उत्तर**

नोटाबंदी हा अतिशय विचारपूर्वक व योग्य निर्णय आहे. आपण पाहतो आपल्या आजूबाजूचे देश किती प्रगती करत आहेत. त्यांच्या देशांमध्ये वेळोवेळी भूकंप येऊनही त्यांची प्रगती सर्वाधिक आहे. कारण त्यांच्याकडे भ्रष्टाचारविरोधी कडक कायदे आहेत. त्यांच्याकडे रोख रकमेऐवजी कॅशलेस व्यवहार चालतात. कुठेही ब्लॅक मनीचा काळा व्यवहार होत नाही. त्यामुळे त्यांची प्रगती होते. पण आपल्या देशामध्ये सर्वत्र भ्रष्टाचार चालू आहे. जिथे - तिथे लोक काळा व्यवहार करीत आहेत. आपल्या देशामध्ये विविध गैरव्यवहार करुन पैसा लपवून ठेवून व आतंकवादासाठी पैसा पूरवून सर्वत्र देशाची लूट चालू आहे. आणि आम्हाला असे वाटते की नोटाबंदी हा अतिशय योग्य निर्णय आहे. यामुळे देशातील अनेक उद्योजकांना, नेत्यांना प्रत्येक काळा व्यवहार करणाऱ्या व्यक्तीला फटका बसला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बऱ्याच वर्षापूर्वी सांगतिले होते की, देशाच्या प्रगतीसाठी, विकासासाठी, भ्रष्टाचार मुक्तीसाठी दर १५ वर्षांनी जर नोटाबंदी केली तर भारत या देशाला प्रगतीपासून कोणीही रोखू शकत नाही व भ्रष्टाचारही होऊ शकत नाही. नोटाबंदी ही दर १५ वर्षामध्ये एकदा केली तेंव्हा आपला देशाचा विकास होईल.

सध्याच्या झालेल्या नोटाबंदीमुळे अनेक गैरव्यवहार करणाऱ्या नेत्यांना व उद्योजकांना मोठा फटका बसला आहे. नोटाबंदीमुळे जनतेला थोडा त्रास होईल पण उद्याच्या चांगल्या भविष्यासाठी तो अतिशय योग्य निर्णय ठरेल. मी नोटाबंदीला सहमत आहे.

- **नोटाबंदी हा आतंकवादविरोधी योग्य निर्णय**

नोटाबंदी हा आतंकवादविरोधी अतिशय योग्य निर्णय ठरेल. आपण पाहतो जिथे – तिथे आतंकवाद चालू आहे. ह्या आतंकवाद्यांना आतंकवाद करण्यासाठी पैसा येतो कोठून? तो पैसा आपल्याच देशातील काही गद्दार लोक पुरवतात. त्या पैशाच्या जोरावर आतंकवादी जागोजागी हल्ले करुन लोकांना मृत्यूमुखी पाडून देशात आतंकवाद पसरवत असतात. आतंकवाद्यांना रोखण्यासाठी व त्यांना आळा घालण्यासाठी नोटाबंदी हा अतिशय योग्य निर्णय ठरेल. आतंकवाद्यांना पैसाच पुरवला नाही व वेळोवेळी नोटाबंदी व कॅशलेस व्यवहार केला तर आतंकवाद हा नष्ट होईल व देशात सुखशांती लाभेल. त्यामुळे नोटाबंदी हा आतंकवादविरोधी योग्य निर्णय असणार आहे. दर १५ वर्षांनी जर नोटाबंदी केली व नवीन नोटा चलनात आणल्या तर आतंकवाद काय तर सगळ्या गैर प्रकाराचे व्यवहार, ब्लॅकमनी यांना कुठेही जागा राहाणार नाही व देशाला प्रगतीकडे व विकासाकडे जाण्याची संधी मिळेल.

- **नोटाबंदीमुळे सामान्य जनतेला होणारा त्रास**

नोटाबंदी हा अतिशय योग्य निर्णय आहे पण सर्वसामान्य जनतेला त्याचा थोडा त्रास होईल. वेळोवेळी त्यांना पैसे बदलण्यासाठी तासन्तास बँकेच्या रांगेत उभे राहावे लागते. सध्याची परिस्थिती अशी आहे की, नरेंद्र मोदींनी घेतलेला नोटाबंदीच्या निर्णयामुळे लोकांना त्रास सहन करावा लागत आहे. एखादा सर्वसामान्य माणूस बँकेच्या रांगेत उभा आहे. त्याला होणारा त्रास व सुट्टे पैसे मिळत नाही ही एक समस्या त्याच्यासमोर उभी आहे. तरीही ती व्यक्ती नोटाबंदीचा हा निर्णय चांगला आहे व योग्य आहे असे सांगते आहे. म्हणजेच त्यालासुद्धा माहिती आहे की नोटाबंदी केल्यामुळे देशात होणारा भ्रष्टाचार थांबेल व देशात ब्लॅकमनीला अस्तित्व राहाणार नाही. त्यामुळे माझेही असेच मत आहे की नोटाबंदी हा अतिशय योग्य निर्णय आहे.

नोटाबंदी हा निर्णय अतिशय योग्य आहे. मी या निर्णयाशी सहमत आहे. देशाला भ्रष्टाचारमुक्त व आतंकवादमुक्त होण्यासाठी माझे मत आहे की, नोटाबंदी करावी.

**नितीन मुळे**

**एफ. वाय. बी. कॉम.**

# नोटाबंदी - एक समस्या

नोटाबंदी योग्य नाही कारण सामान्य जनतेला याचा खूप त्रास होत आहे. पैसा, पैसा म्हणून माणसे आपले प्राण सोडत आहेत. नोटाबंदीमुळे समाजात धोकादायक वातावरण सुरु झाले आहे. नोटाबंदीमुळे सामान्य जनतेचे खूप हाल होत आहेत. त्यांचे आर्थिक व्यवहार बंद झाले आहेत. कारण आर्थिक व्यवहार करण्यासाठी लागणारा पैसा सामान्य जनतेकडे नाहीये. श्रीमंत आणखी श्रीमंत होत चालले आहेत आणि गरीब आणखी गरीब होत आहेत. नोटाबंदी करण्याच्या अगोदर नियोजन करणे हे खूप महत्त्वाचे आहे. गरीब माणसाने स्वतः कष्ट करुन कमावलेला पैसा हा त्याचा स्वतःचा असूनही, त्याला बँकेतून काढता येत नाही. त्यासाठी रात्रंदिवस (लायनीत) रांगेत उभे राहावे लागत आहे. त्याने स्वतःने कमवलेला पैसा ही त्याला मिळत नाहीये. म्हणून सामान्य जनता पैसा, पैसा म्हणून फार ग्रासलेली आहे आणि निरक्षर लोक हे बँकेत पैसा काढायला गेल्यावर त्यांना बँकेतील लोक नीट, सविस्तर माहिती सांगत नाहीत. जनतेचा बँकेवरील विश्वास कमी होऊ लागला आहे.

नोटाबंदीमुळे माणसे आपले काम सोडून पैसे काढण्यासाठी रांगेत उभे आहेत. त्यामुळे त्यांचे कौटुंबिक व्यवहार करणे खूप कठीण झाले आहे. जर नोटाबंदी करायची होती तर, आधी नियोजन करणे आवश्यक आहे. आधीच नवीन नोटांची छपाई लवकर करण्यात यावी किंवा केली पाहिजे होती. त्यामुळे सामान्य जनतेला थोडी मदत झाली असती. एवढेच नाही तर ए. टी. एम. हे सुद्धा बंद आहेत कारण त्यांच्या मध्ये नवीन नोटांचा साठाच नाही. या सर्वांमुळे सामान्य जनतेला खूप त्रास होत आहे. प्रत्येक माणसाला कशाला ना कशाला पैसा लागत असतो. आणि तो आता नाही. कोणी आजारी असते, तर कोणाचे लग्न असते. त्यामुळे नोटाबंदी ही अयोग्य आहे. नोटाबंदी अचानक झाल्यामुळे समाजात धोकादायक वातावरण निर्माण झाले आहे. खरे तर नोटाबंदी योग्य की अयोग्य या दोन बाजू आहेत. आपण ज्या दृष्टीकोनातून पाहतो ते गरजेचे आहे. नोटाबंदीमुळे शेतकऱ्यांचे हाल होत आहेत. त्यांना बी-बियाणे खरेदी करण्यासाठी सुद्धा पैसा नाही. त्यामुळे ते शेतात काम करु शकत नाही. समाजात धोकादायक वातावरण आहे. नोटाबंदीमुळे समाजात लोकांमध्ये पैशामुळे भांडणे होत आहेत. बँकेच्या मॅनेजरला मारहाण होत आहे. नोटाबंदी वर उपाय म्हणजे लवकरात लवकर नवीन नोटांचा जास्तीत जास्त पुरवठा करावा आणि हा पुरवठा बँकेमध्ये करावा. म्हणजे सामान्य जनतेला त्यांच्या आर्थिक गरजा भागवता

येतील. नोटाबंदीमुळे श्रीमंत माणसे आपले व्यवहार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड आणि चेक याद्वारे करतात. त्यांना रांगेत उभे रहावे लागत नाही. पण सामान्य जनतेला गरीब माणसाला मात्र चोवीस तास रांगेत उभे राहावे लागत आहे आणि ते ही कष्ट करुन कमवलेल्या पैशांसाठी असे का? श्रीमंत लोक का रांगेत उभे राहात नाहीत आणि ते रांगेत उभे दिसतही नाहीत. पण गरीब माणसे रांगेत चोवीस तास उभे राहतात. सकाळी ८ वाजल्यापासून ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत उभे राहातात. आणि शेवटी काय होते. कॅश, रोख रक्कम संपलेली आहे असे सांगण्यात येते. बिचारी माणसे जोपर्यंत तात्पुरते तरी आपली आर्थिक गरज भागवण्यासाठी ती परत रांगेत उभे राहातात जोपर्यंत पैसे हातात येत नाहीत. यामुळे गरीबांकडे होते ते पैसे राहीलेच नाहीत. एकतर गरीब आधीच गरीब असतात आणि नोटाबंदीमुळे आणखी गरीब होत चालले आहेत.

नोटाबंदी जरी योग्य आहे असे आपण एका बाजूने मांडले तरी जास्तीत जास्त त्रास हा फक्त सामान्य जनतेला होत आहे. नोटाबंदी योग्य आहे कारण काळा पैसा पांढरा करण्यासाठीच नोटाबंदी केलेली आहे. आणि यामुळे काळा पैसा हा खूप ठिकाणी परत केलेला आहे, सापडलेला आहे. काही लोक इतके श्रीमंत आहेत की, त्यांनी जाळला, काहींनी कचरापेटीत टाकला, तर काहींनी नदीत फेकून दिला. इतका काळा पैसा आहे. श्रीमंत हे फक्त आपला काळा पैसा फेकून देतात किंवा आपल्या कामगारांना पगार म्हणून देतात आणि या नोटाबंदीमुळे खूप नवीन अटी व नियम लागू केले आहेत. सर्व व्यवहार हे इंटरनेट म्हणजेच ऑनलाईन झाले पाहिजेत मग ते कोणतेही असो, जसे की एखादा व्यापारी माल खरेदी करताना आपले पेमेंट कॅशलेस द्वारे करतो, करावे. मोबाईलद्वारे करावे पण अजूनही खूप निरक्षर लोक आहेत की ज्यांना याचे अजिबात ज्ञान नाही. मग निरक्षर लोकांनी काय करावे? आणि गरीब लोकांकडे एवढे महागाचे मोबाईल नसतात आणि त्याला नेटही जास्त लागते. म्हणून नोटाबंदी अयोग्य पण आहे.

**मंजू कदम**

**एफ. वाय. बी. कॉम.**

# चातकमन

वसंत ऋतू बहरुन येती
दोन मनांना घेऊन येती
हसत खेळत दोन मने एकत्र येती
जगण्याची नवी उमेद घेऊन येती
वसंत ऋतू बहरुन येती

गुण्या गोविंदाने नांदती
मन आनंदुनी जाती
लागता चाहुल नव्या मनाची
वसंत ऋतू बहरुन येती

क्षणाचा हा आनंद
आडवे येती अर्थकारण
उडती खटक्यावरती खटके
नव्या मनाला न कळती
वसंत ऋतू बहरुन येती

न्याय देवता ती धावून येती
सांगड घालण्या जुन्या मनाची
वेळ ती निघून जाती
विभक्त होणे आम्हाशी
वसंत ऋतू बहरुन येती

न्याय देवता करती विभक्त दोघाशी
मातृत्त्व पाहते नव्या मनाकडे
स्वतःस आधार देई दहा हत्तीच्या बळाशी
वसंत ऋतू बहरुन येती



वसंत ऋतू आल्यावरी मन येते गहिवरुनी
आदळते मन समुद्राच्या लाटेवरी
वाट पाहते चातकाप्रमाणे जुन्या मनाच्या भेटीची
वसंत ऋतू बहरुन येती

मन असूनी पोरके आयुष्य काढती
पाहता पाहता दिस निघून जाती
नवे मन फुलपाखराप्रमाणे उडून जातो
वसंत ऋतू बहरुन येती

झाल्या डोळ्याच्या कडा ओल्याजरी
जगापुढे खोटे स्मित हास्य करी
कधी आले मन गहिवरुन जराशी
इकडे तिकडे मन रमवशी
दोष देती वसंत ऋतूशी
वसंत ऋतू बहरुन येती

काढिले आयुष्य एकटिने
सागराच्या लाटेवर होवून स्वार
वाट पाहते वसंत ऋतूची
जुन्या मनाची नाती
वसंत ऋतू बहरुन येती.

**उमेश दारवटकर**
**एफ. वाय. बी. कॉम**

# नाती हरवत चाललेला समाज



'आई, ही ओल्ड लेडी कोण गं?' असं म्हणणारी चिमुकली स्नेहा, माझ्या डोळ्यासमोरुन जातच नाही. गावाकडून आलेल्या आपल्या आजीला या चिमुरडीने अगदी ओल्ड लेडीच करुन टाकले. अर्थात यामध्ये चुकी तिची का? का तिच्या वयाची? का तिला संस्कार देणाऱ्या आई वडिलांची? लहानपणीच अगदी बोलायला लागल्यापासूनच आपण प्रत्येकाशी नात बनवतो. दादा, मामा, काका या शब्दांचा, या नात्यांचा अर्थ माहित नसतानाही आपल्याला ती हवीशी वाटतात, आवडतात. पूर्वी लहान मुलं खेळण्यासाठी आपल्या दादाकडे, ताईकडे हट्ट करत. पण आता मात्र हा हट्ट पूर्ण करण्याची गरजच आपल्याला उरली नाही. का? हा प्रश्न मला नेहमीच पडायला लागलाय. जी ओढ आम्हाला आजी - आजोबा, काका - काकू, दादा - ताई, मामा - मामी यांच्यामध्ये वाटत होती, ती ओढ कुठे हरवली?

विज्ञानाकडे आपण वाटचाल करतोय. खरचं हे कौतुकास्पद आहे. पण याचा विज्ञानातून हातात आलेली उपकरणे मोबाईल, व्हिडीओ गेम यामुळे नकळत बाहेर मोकळ्या निसर्गात खेळले जाणारे खेळ बंदिस्त झाले. तिथे मग ना दादाची आवश्यकता होती ना ताईची! तिथे फक्त आपली बोटं त्या यंत्रावरुन फिरवून समोरील चित्रांना मात देण्याची कला.... मोबाईलवर आम्ही सगळ्यांच्या टच मध्ये आहे! हे वाक्य सहज आपण बोलतो. पण, हा टच कोणत्या प्रकारचा आहे. GM, GN, TC या संक्षिप्त रुपात दिवसाची सुरवात व दिवसाचा शेवटही होतो. मुलांना त्यांचे आजी आजोबा गावी आहेत. ते किती छान शेती करतात, आपलं टुमदार गावाकडे घर आहे. अशा खऱ्या गोष्टी सांगण्यासाठी खरचं आपल्याकडे वेळ उरला नाहीये. अर्थातच मग 'ही ओल्ड लेडी कोण गं? असं विचारणारी चिमुरडी स्नेहा चुकीची नाहीये ना? आपणच मुलांना नात्यांची ओळख जर याच यांत्रिक उपकरणांमधून करुन दिली तर?

नाती ही वेळ दिला की फुलतात आणि न बोलल्यामुळे कोमेजतात. धावपळीच्या जीवनात आपण ना मुलांशी संवाद साधू शकतो ना मुलांचं ऐकून घेवू शकतो. मोबाईलवरुन व्हिडीओ कॉलिंगद्वारे जर मित्रांशी बोलता येत असेल तर आपल्या नात्यांनाही व्हिडीओ कॉमिंगचा टच का देता येऊ नये? मुळातच पैसा हा महत्त्वाचा, अविभाज्य घटक असला तरी ज्यांच्यासाठी आपण हा कमवतोय त्यांना आपला वेळ कधी देणार आपण? मुलगा जेव्हा रस्त्याने चालताना एखाद्या म्हाताऱ्या आजीला रस्ता ओलांडून देतो तिथे आपसूकच नातं जोडलं जातं. समाजाला नातं जोडावं लागू नये तर ते आपसूनकच जोडलं जावं यासाठी आपण नेहमीच प्रयत्नरत असणं गरजेच आहे.

घरामध्ये जर हसण्याचा आवज येत असेल तर तिथे जिवंतपणा नांदत आहे, असं आपसूकच वाटून जातं. कारण आपापसातला संवाद, नातेवाईकांशी केलेले हितगुज आपल्याला खऱ्या टचमध्ये ठेवते. वेळात वेळ काढून जेव्हा तुम्ही ट्रिपला न जाता आडवळणी राहात असलेल्या आजीला भेटायला जाता, तेव्हा तिच्या चेहऱ्यावरचा आनंद, डोळ्यातील अश्रू हे कोणत्याही आनंदापेक्षा अनमोल वाटतात.

नात्यांनी गोडी आयुष्यात आली तर नक्कीच साखर न खाताही त्या मधुमेह असणाऱ्या आजोबांना सर्वेच गोष्टी गोड लागतील. आपुलकीचे चार शब्द धकाधकीच्या धुळीत विरुन जातात आणि समाजाला कोणत्या नात्याचा आधारच नाही का? असं सहज वाटून जातं.

म्हणूनच दिवसातील काही वेळ तरी आपल्या जवळच्या व्यक्तींसाठी व्यतीत करा. लहानांना त्यांची नाती पुस्तकातून कळण्यापेक्षा प्रत्यक्षात कळली तर ती त्यांच्या आयुष्यभर लक्षात राहतील. नाही का? मग कोणतीच आजी 'ओल्ड लेडी' नाही राहाणार आणि प्रत्येक घरात नाती ही ना तिला अनोळखी असतील आणि ना त्याला.......

'जुळून येती नाती, डोळे सुखावती,
नकळतच आयुष्याची जुळून येते, रंगसंगती।'

**बबिता रजपूत**
**टि. वाय. बी. ए.**

# आजचे - समाजवास्तव

**'लेक लाडकी या घरची, होणार सून मी त्या घरची'**

हे गाणं सतत म्हणत, गुणगुणत आमच्या शेजारची ताई दिवसभर आनंदात घरात फिरत होती. बाईसाहेबांच लग्न होत ना दोन दिवसांनी. खूप खूष होती.

लग्न उत्तम प्रकारे पार पडलं. सुमारे एका आठवड्याने ताई घरी आली होती. पण तेंव्हा ती आनंदात नव्हती, रडतं होती. लग्नात तिच्या वडिलांनी सुई पासून ते दिवाणापर्यंत सर्व रुखवत दिला होता. तिच्या नवऱ्याला अंगठी, घड्याळ, चेन पण दिली होती. तिच्यापण अंगावर बरेच दागिने घातले होते. जवळपास काकांनी त्यांच्या ऐपती पेक्षा जास्तच मोठ लग्न करुन दिलं होतं. त्यांनी कर्ज काढलं होत! पण आता म्हणे नवऱ्या मुलाला गाडी हवी होती आणि त्यासाठी ते ताईला गाडी मागण्यासाठी भरीस पाडत होते.

आपली मुलगी सुखाने नांदावी म्हणून वडील ती मागणी पूर्ण करतील पण नवर देवाच्या व त्याच्या घरच्यांच्या मागण्या संपतील? आणि मागण्या पूर्ण केल्या नाहीत तर मग त्या ताईचं भविष्य काय? या आणि अशा बऱ्याच प्रश्नांनी डोक भंडावून सोडलं. हुंडा मागणे किंवा देणे हा कायद्यान गुन्हा आहे. ह्या हुंड्यामुळे किती तरी स्त्रियांचे आयुष्य उध्वस्थ झाले आहे. अजूनही होत आहे. रोज पेपरमध्ये हुंड्यामुळे एका तरी स्त्रीचा बळी गेलेला असतोच. अरे हे दुष्टचक्र कधी थांबणार?

पूर्वीच्या काळी राजे स्वखुषीने आपल्या मुलींना नोकर, दासी, राज्य, दागदागिने देत असत. काही लोक आपल्या मुलीचं वैगुण (कुरुप, जाड, बुटकी इ.) दोष लपववण्यासाठी जो तिच्याशी लग्न करेल त्याला पैसा, घर, दागिने, जमीन असं बरच काही देत. पूर्वी स्त्रिया शिकलेल्या नव्हत्या. मग कठीण प्रसंगी त्यांना हा पैसा उपयोगी पडे. मग हळूहळू ही प्रथाचं पडू लागली. छोट्याशा सापाच्या पिल्लाच्या रुपातील हुंड्याचा कधी भयानक अजगर झाला व त्याने किती स्त्रियांना गिळलं. त्यांच्या आयुष्याची राखरांगोळी केली हे आपण पाहिलं आहे.

**'अरे माणसा माणसा, कधी होशील तू माणूस'**

खरचं आपण माणूसकी विसरत चाललोय. सर्वांना श्रीमंत व्हायचं आहे आणि ते पण कष्ट न करता आणि ह्याच हव्यासे पोटी अनेक सासवा हे विसरतात की ज्या सुनेला आपण छळतोय ती कोणाची तरी मुलगी आहे आणि जर आपल्या मुलीचा पण जर असा छळ झाला तर आपल्याला किती दुःख होईल तेच दुःख आज सुनेच्या आई वडिलांना होत आहे. प्रत्येक मुलाने आपली बायको ही पैसे देणारी मशीन नाही तर आपली सहधर्मचारिणी आहे असा विचार केला पाहिजे.

जर त्या सुनेला न छळता, सुखाने नांदवलं तर उद्या आपल्या उतारवयात ती आपल्याला सांभाळणारे, आपल्या पडत्या काळात आपल्याला साथ देणारे असा विचार प्रत्येक सासू ने मुलाने केला तर किती तरी संसार सुखाने नांदतील. कितीतरी लोक आजही एकवीसाव्या शतकातही मुलगा पाहिजे म्हणून आग्रह धरतात, का? तर हुंडा मिळेल आणि मुलगी नको, का? तर हुंडा द्यावा लागेल. मुलाला खूप शिकवायचं, का? तर लग्नाच्या बाजारात जास्त हुंडा मिळेल.

अरे काय हि विचारसरणी, सुनीता विल्यम्स, किरण बेदी, प्रतिभा पाटील, सुधा मूर्ती यांच्या सारख्या कर्तबगार स्त्रिया आजच्या काळात आपल्या समोर आहेत. ह्यांचे व्यक्तिमत्त्व समोर ठेवून मुलीच्या वडिलांनी मुलींना खूप शिकवलं पाहिजे. आपल्या पायावर उभं केलं पाहिजे. लग्न म्हणजे दोन कुटुंब आणि दोन जीवांचं मिलन. ह्या सुंदर संस्कारात कोणी हुंड्याचं विष कालवत असेल तर त्याला वेळीच शासन करायला हवं.

हुंडा निर्मूलन कायदे आहेत, विविध संस्था सामाजिक स्तरावर कार्यरत आहेत ह्या सर्वांच्या मदतीने ह्या घाणेरड्या परंपरेला तोडलं पाहिजे. लग्नाच्या बोहल्यावर उभं राहिलेल्या मुलाने स्वतःच्या आई, वडिलांना निक्षून अथवा ठामपणे सांगायला पाहिजे, की मी स्वतःला विकत नाही किंवा जिच्याशी लग्न करते आहे ती बाहुली नाही माझ्या जीवनाचा जोडीदार आहे.

असं जर झालं तर हुंड्यामुळे जाणारे कितीतरी जीव वाचतील. फुकट मिळणाऱ्या पैशावर ऐश करण्याऐवजी मुलांनी कर्तृत्ववान व्हांव, तरच ते टाटा, बिर्ला, अंबानी, डि. एस. कुलकर्णी, सचिन तेंडुलकर आणि असे बरेच कर्तृत्ववान पुरुष ह्यांच्या सारख नावलौकिक मिळवतील नाहीतर सिंधूताई सपकाळ यांच्या नवऱ्यासारखी अन्न अन्न दशा होईल हे सर्व तरुणांनी लक्षात ठेवलं पाहिजे.

जगात दहशतवाद, गरिबी, नैसर्गिक आपत्ती, महिला अत्याचार, त्यातच हुंडा ही पण एक समस्या आहे. बाकीच्या समस्या सोडवण आपल्या हातात नाही. पण हुंडा न देणं किंवा हुंडा न घेणं हे आपल्या हातात आहे.

'अरे थम जारे बंदे..... अरे रुक जा रे बंदे....... ये कुदरत हस पडेगी'

कुदरत म्हणजे निसर्ग आणि हसेल म्हणजे कोपेल. आणि माणूस हा निसर्गाचाच एक भाग आहे. माणुसकी न विसरता ह्या हुंड्याच्या मुळांना उखडून टाकून ह्या सामाजिक समस्येवर मात करायला हवी.

ही समस्या आजच्या तरुण मुलामुलींनीच जाणीवपूर्वक संपवायला हवी.

**शेवटी 'तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार.'**

**प्राची मोरे**
**एफ. वाय. बी. कॉम.**

# वरिष्ठ महाविद्यालय माझा पहिला दिवस



कितीती रम्य ते दिवस. कॉलेजचा पहिला दिवस आजही जसाच्या तसा आठवतोय, आमचे कॉलेज पुण्यातील बाजीराव रोडवर होते. कॉलेजचे नाव सरस्वती मंदिर नाईट कॉलेज ऑफ कॉमर्स अ‍ॅण्ड आर्ट्स, पुणे F.Y.B.Com मध्ये म्हटले की नवीन मित्र, नवीन वर्ग, नवीन शिक्षिका, शिक्षक असे अनेक चांगले मित्र भेटतात. मी जेंव्हा पहिल्या दिवशी कॉलेज मध्ये गेलो तेंव्हा मला माहित नव्हते की कोणता वर्ग आहे. आमचे कॉलेज १ जुलै २०१६ रोजी सुरु झाले. मी माझ्या एका मित्राला फोन केला की तो म्हटला की इंग्लिश चे लेक्चर चालू आहे. मी गेलो तेंव्हा इंग्लिशच्या मॅडमचे लेक्चर चालू होते. मी गेलो तेंव्हा माझा फक्त एकच मित्र होता तेंव्हा अनेक मित्रांबरोबर ओळख झाली.

ते लेक्चर चालू होते, मग माझे लिस्ट मध्ये नाव नव्हते. मी माझे नाव मॅडमला सांगितले. कॉलेज जीवनात मुलांच्या मनात सर्व चांगल्या गोष्टींविषयी आदर निर्माण झाला पाहिजे. सर्व प्रकारच्या भ्रमांविषयी त्यांना आपुलकी वाटेल याची काळजी घेतली पाहिजे. पुढच्या आयुष्यात कोणतेही काम करण्यात त्यांना कमीपणा वाटणार नाही.

कॉलेज नियम असावेत, शिस्त असावी पण कॉलेज हा मुलांना तुरुंग वाटू नये. तर ती बाग वाटावी, कॉलेजमध्ये हसतखेळत शिक्षण व्हावे. कॉलेजमध्ये एखादा विद्यार्थी अभ्यासात मागे पडत असेल तर त्याला हिणवू नये. उलट त्याला सतत उत्तेजन देऊन अभ्यासास प्रवृत्त करावे. प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या अंगभूत गुणांचा विकास करण्याची संधी मिळाली पाहिजे.

कॉलेजमध्ये दुसरे लेक्चर Banking चे होते. त्यानंतर ते खरं झाले त्यांनी अभ्यासक्रम सांगितला आणि पहिला धडा शिकवायला सुरुवात केली व त्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास साधणे. त्यानंतर Maths च्या मॅडमचे लेक्चर झाले त्यांनी पण सुरुवातीला आपले नाव, आमची सर्वांची नावे विचारली. त्यानंतर Account च्या मॅडमनी सुरुवात केली आणि चांगले मार्गदर्शन केले. ते आमचे

मराठीच्या सरांचे लेक्चर चालू झाले त्यांनी आपल्या लेक्चरमध्ये सांगितले की तुम्ही महाविद्यालयात वेळेत उपस्थित राहून अभ्यास करा त्यासोबत शिस्तपालन सांगितले. मला या कॉलेजची शिस्त आवडली. हे या कॉलेजचे ब्रीदवाक्य आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याचे स्वप्न असते. मी या कॉलेजचा विद्यार्थी आहे याचा मला अभिमान वाटतो.

मला पहिल्या दिवशी भरपूर मजा आली व कॉलेजमध्ये सर्व लेक्चरला बसलो आणि चांगले नवीन मित्र मिळाले. मी वर्गामध्ये चौथ्या बेंचवर बसलो होतो व मला पहिल्या दिवशी भरपूर मजा आली. असा हा माझा कॉलेजचा पहिला दिवस चांगला गेला. मला माझे कॉलेज खूप आवडले.

**गणेश थेरडे**

**एफ. वाय. बी. कॉम.**

# ती.....

ती सध्या काय करते
एक सिनेमा आला
सगळ्यांच्या मनात प्रश्न
निर्माण करुन गेला

ज्यांना ती होती
त्यांच्या मनात
प्रश्न निर्माण केला

ज्यांना ती नव्हती
त्यांनी, ती होती का?
स्वतःच्या मनाला
चाचपण्याचा प्रयत्न केला

तिने मात्र
सगळ्यांच्या मनाला
विचार करायला लावला

व्हॉटसप, फेसबुक
सगळ्यांवर विचारांचा
भडिमार करायला लावला

आता सध्या ती काय करते
ती विचार करायला लावते
ती तिच्याबद्दल लिखाण
करायला लावते
ती तिच्याबद्दल
इतरांना जागं करते

म्हणून तर ती
ती असते
तुमच्या आमच्यात
प्रत्येकीत नव्या रुपात
ती भेटत असते.

**प्रा. डॉ. गीता अ. राशिनकर**

# झेप

''राणी चल लवकर आवर, ये पटकन आवरायचंय अजून'', आईच्या हाका चालू होत्या, ''आले गं'' म्हणत म्हणत बाईसाहेब आईजवळ आल्या, राणी सातवीत शिकत होती. घरापासून शाळा फारशी दूर नव्हती, म्हटलं तर जवळही नव्हती. आईबाबांनी राणीला शाळेत येण्याजाण्यासाठी सायकल घेऊन दिली होती. ''राणी, आवरुन शाळेत जायचंय, वेळ लागतो ना?'' ''अगं सायकलवरुनच तर जाते ना. मायलेकीतला संवाद चालू होता. आई पटापट आवरत होती. दप्तर, शाळेचा जेवणाचा डबा, वॉटरबॅग. सगळं आईनं आवरुन ठेवलं. राणीही पायात शुज घालून तयार झाली. राणीनं दप्तर घेतलं, ती अंगणात आली. सायकल पुसून तिनं दप्तर सायकलला अडकवले. सायकलवर टांग मारुन आईला टाटा बायबाय केले, येते गं! म्हणत स्वारी शाळेला निघाली. आई सायकलवरुन जाणाऱ्या आपल्या पोरीकडे बघतच होती. राणी नेहमीसारखी निघाली होती.

राणीने काही अंतर पार केले आणि काय झाले राणीला समजलेच नाही. राणीच्या डोळ्यासमोर अंधार दाटला. ती दुरवर खोल खोल अंधारात लोटली गेली. सगळं कसं सुन्न झाले. अस्पष्ट असे आवाज कानावर पडत होते. नंतर मात्र काय झाले हे कळले नाही. शुद्धीवर येताना आपण दवाखान्यात आहोत आणि आपल्या भोवती आईबाबा, दादावहिनी आहेत. आई रडत होती. सगळ्यांचे चेहरे उदास दिसत होते, तिला हळूहळू शुद्ध येत होती, पाय दुखत होते. आपल्याला बऱ्याच ठिकाणी पट्ट्या लावल्याचे तिला जाणवले. हळूहळू आठवू लागले, आपण शाळेत जात असताना मागून येणाऱ्या सुसाट ट्रकने आपल्याला उडवले होते. ती त्या वेगाने येणाऱ्या ट्रकखाली आली होती. अन् गर्दी जमली, पुढचे मात्र आठवेना. कारण नंतर त्या जमावाने तिला हॉस्पीटलमध्ये ॲडमीट केले. आयकार्डवरुन घरी फोन केला होता. अन, आता समोर सगळेजण दिसत होते. पाय मात्र फारच दुखत होते, अंग ठणकत होते. तिने पाय उचलण्याचा प्रयत्न केला, पण पाय उचलेना. आईला हुंदुका आवरता येईना. ती ओक्साबोक्शी रडू लागली. राणीचा पाय हलेना, तशी राणी जोरात किंचाळली. तिला समजेना आपल्या पायाला काय झालंय, मी हॉस्पीटल मध्ये का आहे, माझ्या पायाला काहीतरी पण काय झालंय, आई-बाबा का रडतायेत? तिने आई तू का रडतेस, बाबा माझ्या पायाला काय झालंय, बाबा सांगा ना. कधीही न रडणाऱ्या बाबांना रडू कोसळले.

दादा-वहिनींनी तिच्या डोक्यावरुन हात फिरवला तिला अलगद थोपटले, काही नाही बेटा, शांत झोप पाहू, तेवढ्यात नर्स आली, तिने इंजेक्शन दिले, अन ती पुन्हा ह्या गुंगीत झोपी गेली.

हळूहळू नंतर तिला जाग आली. आता तिला बरेच आठवू लागले. तिने पुन्हा पाय हलवण्याचा प्रयत्न केला. पण तो असफल झाला अन् आपल्याला पाय नाहीत असे तिला जाणवू लागले. आई सांग ना, मला पायाला काय झाले आणि ती रडू लागली, आईपण रडू लागली, आईनं राणीला अलगद थोपटले, आईचा स्पर्श न बोलताही बरेच काही सांगत होता. अन् चेहरा न बोलताही बरेच काही बोलत होता. आपले दोंन्ही पाय कापले गेलेत हे अवघड, कटू सत्य तिला कळून चुकले होते. जणू उडणाऱ्या पाखराचे पंख छाटले होते. राणी हळूहळू बरी होऊ लागली, डिस्चार्ज मिळून ती घरी आली. तिच्याबरोबर व्हीलचेअर घरी आली. तिची कायम सोबत करणारी तिची ती सखी होती. तिला शेवटपर्यंत साथ देणार होती.

बडबडी, हसरी राणी शांत झाली होती, अबोल झाली होती. घरातील सगळ्यांनाच दुःख झाले होते.

एके दिवशी आईनं सगळ्यांना बजावलं, राणीसमोर कोणीही रडायचं नाही. आईनं निश्चय केला. ती खंबीर बनली. राणीची काळजी घेता घेता तिला ती समजावत होती. राणी हसू बोलू लागली. आई राणीला म्हणाली, ''राणी आपण आज एका डॉक्टरांकडे जाणार आहोत. ते तुला नवीन पाय बसवणार आहेत आणि त्या पायांनी तू पुन्हा सगळीकडे हिंडू फिरु शकशील, शाळेत, कॉलेजमध्ये जाशील, खूप शिकशील, शहाणी माझी राणी असे रोज सांगून आईनं तिचं मन बदलण्याचा खरा प्रयत्न केला. त्या प्रयत्नाला यश आले. राणी व आईबाबा डॉक्टरकडे गेले. पूर्ण चेकअप होऊन डॉक्टरांनी पायाचे माप घेतले. राणीला नवीन पाय बसवले डॉक्टरांच्या देखरेखीखाली राणी हिंडू फिरु लागली. सुरुवातीला थोडा त्रास झाला. पण राणीच्या मनात आईने जिद्द निर्माण केली होती. राणी त्या पायाने शाळेत जावू लागली. तिच्याबरोबर सगळेजण होते. आईबाबांनी सत्य स्वीकारुन तिला तिच्या पायावर उभे केले होते. मनाने खंबीर केले होते. राणी पदवीधर झाली. जात्याच्याच हुशार राणीने नेट ची परीक्षा दिली. ती पास झाली. एका कॉलेजमध्ये मुलाखत दिली. तिला कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून नोकरी मिळाली. राणीने पुढे एम. फिल्. पीएच.डी. पूर्ण केले. राणीने जिद्दीने यश मिळवले होते. तिच्या जिद्दीच्या पंखांनी आकाशात झेप घेतली होती. आई-बाबा, दादा-वहिनी सगळे आनंदी होते. तिच्या यशाचं पाखरु जिद्दीच्या पंखांनी आकाशात भिरभिरु लागले.

**प्रा. डॉ. गीता अ. राशिनकर**
**वाणिज्य विभाग**

# राजर्षी शाहू महाराज जीवन व कार्य

**जीवन ज्यांचे प्रेरणादायी, बहुजनांची जाहले आई,**
**चरणी शाहूच्या प्रीतीफुले वाहू, धन्य विश्वात ते थोर राजे शाहू ।।**

सन २०१४-१५ मध्ये छत्रपती राजर्षी शाहू महाराजांची १४० वी जयंती, जयंती म्हणजे जन्मदिवस. आपण आपला जन्मदिवस खूप आनंदाने साजरा करतो. तसेच महापुरुषांच्या जयंती सुद्धा साजऱ्या केल्या पाहिजेत आणि त्या दिवशी तरी निदान त्यांच्या विचारांचे स्मरण केले पाहिजे.

शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कोल्हापूर येथील राजवाड्यात घाटगे कुळात झाला. त्यांच्या आईचे नाव राधाबाई व वडिलांचे नाव जयसिंगराव होते. शाहू महाराजांचे नाव यशवंतराव ठेवले होते. कोल्हापूरच्या महाराणी व चौथे शिवाजीराजे यांची पत्नी आनंदीबाई यांनी यशवंतरावांना १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतले तेव्हा यशवंतराव पावणेदहा वर्षांचे होते. सकाळी ७ वाजता धार्मिक विधी सुरु झाले. पवित्र होमहवन झाले. महाराणी आनंदीबाई व राजघराण्यातील इतर स्त्रिया ह्यांनी यशवंतरावांच्या हातावर साखर ठेवून त्यांचे नांव शाहू महाराज असे ठेवले. कुलदेवता महालक्ष्मीचे दर्शन घेतल्यावर शाहू महाराजांना गादीवर बसवून त्यांना १९ तोफांची मानवंदना देण्यात आली. ज्याचे क्षेत्रफळ जहागिरीसुद्धा अवघे ३,२१,७०१ चौरस मैल होते, त्या कोल्हापूर संस्थानाचे शाहू अधिपती झाले.

**हा जीवनपट एका राजाचा, आटपाट नगराचा, दलितांचा कैवारी, कलावतांना उद्धारी ।।**

तसा तो तुमचा आमचा व आपल्या सर्वांचा राजा छत्रपती राजर्षी शाहू महाराज.

शाहू महाराजांच्या देहाचा थाटमाट बजरंगास शोभेल असा होता. त्यांची उंची सहा फूट चार इंच होती. बुरुजबंद छाती, हृदयाचा वेध घेणारे पाणीदार डोळे, पहाडी आवाज, सिंहासारखा जबडा, ऐरावतासारखी शक्ती, भृगेंद्रासारखा डौलदार, धिप्पाड बांधा व चेहऱ्यावर तेज.

समाजातील उच्चनीचता, जातीभेद यांचे उच्चाटन करण्याचा विडा म. फुले यांनी उचलला होता. त्यांचे कार्य छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या कारकीर्दीत पुढे नेले. त्या काळात देशात प्रचंड प्रमाणात जातीभेद व विषमता होती. विषमता म्हणजे तरी काय? तर अभिनेते, व्यापारी कमी वयात कोटी रुपये कमावतात पण त्याच समाजासाठी काय व किती योगदान आहे याचा विचार आपण केला पाहिजे. बंगल्यात, चांगल्या वास्तूत राहणारी व्यक्ती चांगले वस्त्र नेसते, चांगली पक्वान्न खाते तर शेतात राबणारी

बाई ठिगळ लावलेलं लुगडं नेसते, वेळी चटणी भाकरी खाते. असे समाजात अनेक दुर्बल घटक, दुर्लक्षित घटक होते. या प्रकारची विषमता नष्ट करण्याचा शाहू महाराजांनी भरपूर प्रयत्न केला.

**मानव ही एकच जात। खरी जगतात, उच्चनीच भेद नाही कसला। शाहू महाराजांचा विचार असला।।**

यातच शाहू महाराजांचे प्रारंभीचे शिक्षण फिटझिराल्ड या ब्रिटीश आधिकाऱ्याच्या देखरेखीखाली सुरु झाले. त्यांच्यावर शिक्षक म्हणून कृष्णाजी गोखले व हरिपंत गोखले यांची नेमणूक केली गेली. १८८६ च्या जानेवारीत शाहू महाराजांना त्यांच्या सोबत्यांसह राजकोटला राजकुमार कॉलेजमध्ये पाठविले गेले. त्यांच्यासोबत त्यांचे शिक्षक गोखले व बुवासाहेब इंगळे यांना पाठविले गेले.

अभ्यासाव्यतिरिक्त नेमबाजी, कुस्ती, अश्वारोहण इ. खेळांचे त्यांना प्रशिक्षण दिले जात असे. खेळांत ते प्रविण झाले. धारवाड मुक्कामी शिक्षण सुरु झाले असताना देशी शिक्षक म्हणून केशवराव गोखले व इंगळे नावाच्या चारित्र्यवान व ध्येयवादी शिक्षकाची नेमणूक झाली. त्यांनी शाहू महाराजांना घोडेस्वारी व शिकार या कलांमध्ये तरबेज बनवले. शाहू महाराजांनी हिंदुस्थानचा इतिहास व भूगोल अभ्यासला होता पण प्रत्यक्ष इतिहास जेथे घडला ती ठिकाणे व प्रदेश त्यांनी नजरेखालून घातल्यावर त्यांना या विषयाची खरी जाण येणार होती. त्यानुसार नोव्हें १८९० पासून ते १८९२ पर्यंत खूप अभ्यासदौरे त्यांनी फ्रेझरांच्या मार्गदर्शनाखाली केले.

त्याच दरम्यान १ एप्रिल १८९१ रोजी बडोद्याचे सरदार गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या कन्येशी त्यांचा विवाहसोहळा साजरा झाला. १५ नोव्हें. १८९३ रोजी त्यांच्या अभ्यासक्रमाची समाप्ती झाली. केवळ शिक्षणानेच त्यांचे व्यक्तिमत्त्व घडवले असे नाही, माता, पिता, गुरुजन, समाज, घराण्याच्या परंपरा, देशाची स्थिती अशा अनेक गोष्टी माणसांवर संस्कार घडवत असतात. त्यास शाहू महाराजही अपवाद नव्हते. शाहू महाराजांच्या राज्यारोहणाचा दिवस २ एप्रिल १८९४ असा ठरवला त्या प्रसंगी आपल्या प्रजेच्या सुखासाठी, कल्याणासाठी प्रजेला उद्देशून एक जाहिरनामा काढला.

१८९६-९७ मध्ये देशात अनेक ठिकाणी दुष्काळ पडला. म्हैसूर राज्यातून धान्य मागवून गावागावात धान्याची दुकाने काढली. दुष्काळ निवारण खाते निर्माण केले व उपाययोजना कार्यान्वित केल्या जाऊ लागल्या. दुष्काळाशी झगडत असतानाच शाहू महाराजांना प्लेगसारख्या अत्यंत घातकी साथीशी सामना करावा लागला. मुंबईत १८९६ साली प्रथम प्लेगची साथ सुरु झाली व लवकरच कराची, भिवंडी, पुणे इ. ठिकाणीही प्लेग पसरला. प्लेगला प्रतिबंध करणारी मोर्चेबांधणी करण्यास महाराजांनी सुरुवात केली व अनेक उपाययोजना केल्या गेल्या. याच सुमारास कोल्हापूर-पन्हाळा ही ठिकाणे प्रथमच टेलिफोनच्या तारांनी जोडली गेली त्यामुळे प्लेगच्या दिवसांत अत्यंत महत्वाची अशी वेळ वाचली गेली. परंतु एका मागे एका संकटाशी सामना करावा लागतच होता.

शाहूंच्या जीवनकार्यात वेदोक्त प्रकरणास फार महत्त्व आले. वेदोक्त याचा शब्दशः अर्थ वेदांत सांगितल्याप्रमाणे, तथापि हिंदू धर्मातील सोळा संस्कार व इतर धर्मकृत्ये वैदिक मंत्रानी करण्याचा अधिकार म्हणजे वेदोक्त असा त्याचा अर्थ समाजात रुढ झाला होता. हा अधिकार प्राचीन काळी त्रेवर्णांना होता. कालांतराने क्षत्रिय व वैश्य यांना शूद्रात ढकलून उच्चवर्णीयांनी तो अधिकार फक्त आपलाच असे सांगितले. वेदातील मंत्र प्रथम दर्जाचे ते उच्चवर्णीयांसाठी व पुराणातील मंत्र दुय्यम दर्जाचे ते शूद्रांसाठी वेदोक्तातील स्वानुभवामुळेच सर्व हिंदूंना वेदाधिकार देणाऱ्या आर्य समाजाकडे व उच्चवर्णीयांच्या मक्तेदारीविरुद्ध लढणाऱ्या सत्यशोधक समाजाकडे महाराज आकृष्ट झाले ही वेदोक्ताची सर्वात मोठी फलनिष्पत्ती मानायला हवी.

वेदोक्ताच्या भडक्याच्या पार्श्वभूमीवर १९०२ मध्ये शाहू महाराजांनी एक महत्त्वपूर्ण जाहीरनामा काढला. मागासवर्गीय लोकांकरीता सरकारी नोकरीत ५०% नोकऱ्या यांना मिळाव्यात. त्यांच्या सर्व प्रकारच्या कार्यांचा आढावा घेणारच आहोत. १८९४ ते १९२२ पर्यंत सतत २८ वर्षे त्यांनी शिक्षण प्रसाराचा पाठपुरावा केला. या अनेक कार्यांमुळे २१ एप्रिल १९१९ मध्ये राजर्षी ही मानाची पदवी त्यांना मिळाली. जाहीरनामा कृतीत उतरवण्यासाठी शिक्षणाची गरज आहे हे ओळखून १८ एप्रिल १९०१ रोजी ''व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग'' या कोल्हापूरातील पहिल्या वसतिगृहाची स्थापना करण्यात आली. पी. सी. पाटील हे पहिले विद्यार्थी होते. अनुदाने देऊन मराठा वसतिगृहाचा पाया मजबूत केला. याच साली १९०१ मध्ये ''जैन बोर्डिंग'' ची स्थापना केली. त्यानंतर ''मुस्लिम बोर्डिंग'' ची स्थापना केली. विविध जातीधर्मांची २० वसतिगृहे स्थापन केली.

शेकडो वर्षे भक्कम पायावर उभी असलेली जातीव्यवस्थेची उतरंड महाराज एका रात्रीत उध्वस्त करु शकत नव्हते अशा कठोर सामाजिक पार्श्वभूमीवर महाराजांनी सर्व जातीधर्मांसाठी म्हणून एक मोठे वसतिगृह स्थापन केले. कुटुंबापेक्षा जात मोठी व जातीपेक्षा समाज मोठा ही जाणीव निर्माण होण्यासाठी शिक्षणाच्या प्रसाराची गरज आहे शाहू महाराजांनी आपल्या हयातभर जातिभेद व अपृश्यता या दोन सामाजिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. अपृश्यता हे जातीभेदाचेच विकृत स्वरुप असल्याचे त्यांनी अनेकदा जाहीर केले होते. महाराजांची कृती काळाला धरुन होती.

स्वराज्याच्या हक्कांकरिता पात्रता प्राप्त करण्यासाठी राजर्षी शाहू महाराज आणखी एक अट पुढे मांडतात ती म्हणजे शिक्षण. समाजातील बहुसंख्य लोकांना किमान प्राथमिक शिक्षण मिळाले पाहिजे त्यांना अज्ञानी व निरक्षर राखून स्वराज्याचे हक्क राबविता येणार नाहीत, असे त्यांचे ठाम मत होते. या मताचा विपर्यास करुन महाराजांना आपल्या प्रजाजनांस स्वराज्याचे हक्कच द्यायचे नाहीत असा आरोप

विरोधकांनी त्यांच्यावर केला. स्वराज्याच्या पात्रतेसाठी शिक्षणाची केवळ अट घालून महाराज थांबले नाहीत तर ती अट पूरी करण्यासाठी त्यांनी आपल्या संस्थानापासून सुरुवात केली होती. म. फुल्यांप्रमाणे त्यांनी प्राथमिक शिक्षण शक्तीचे करण्याचा आग्रह ब्रिटीश सरकारकडे धरला. प्राथमिक शिक्षणाचा कायदा करुन खेड्यापाड्यांतून शेकडो प्राथमिक शाळा उघडल्या व त्यावर आपल्या खजिन्यातील लाखो रुपये खर्ची घातले. कोल्हापूर संस्थानात गोरगरीब रयतेस शिक्षणाचे अमृत पाजण्याचे कार्य चालू असताना स्वराज्य चळवळ चालविणाऱ्या नेत्यांचा शक्तीचा प्राथमिक शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टीकोन कसा होता हे पाहणे महत्त्वाचे ठरते पण येथे ९०% लोक उपाशी आहेत व १०% लोक खात आहेत. उपाशी लोकांना कोंड्याच्या भाकरीची तरी सोय करण्याअगोदर या दहांच्या पोळीवर साजूक तूप वाढा असा ओरडा करणाऱ्यांना रयतेची कितपत कळकळ आहे हे उघड होते. म्हणूनच आपल्या संस्थानातील रयत आणि दलित वर्गांच्या अभ्युदयासाठी राजर्षी शाहू महाराजांनी आपली सर्व शक्ती पणास लावली होती. प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करुन बहुजन समाजास 'मती' आणि 'गती' देण्याचे कार्य त्यांनी जोमाने सुरु केले होते.

१९ व्या शतकातील बहुजन समाजाला लागलेले दोन मोठे रोग म्हणजे अज्ञान व दारिद्र्य. याचे मूळ कारण म्हणजे शिक्षणाचा अभाव. म. फुले यांनी शूद्रातिशूद्रांना जागे करुन मुलामुलींसाठी शाळा काढल्या. शक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा आग्रह धरला. त्यांचे हेच कार्य पुढे शाहू महाराजांनी चालू ठेवले. शिक्षणाची महती सांगताना शाहू महाराज सांगतात खालच्या वर्गाच्या लोकांच्या बुद्धीवर व ज्ञानावर हे जड व जुलमी ज्यू लादले गेले आहे ते झुगारून देण्याची शक्ती बहुजन समाजाच्या अंगी येण्यास शक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची फार जरुरी आहे आणि लवकरच २१ सप्टेंबर १९१७ रोजी शिक्षण तज्ज्ञांच्या समितीने तयार केलेल्या नियमावलीवर आधारित असा शक्तीच्या शिक्षणाचा कायदा खास जाहीरनामा काढून प्रसिद्ध करण्यात आला.

१९१७ – १८ सालात शक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना कार्यान्वित झाली त्या योजनेखाली २० शाळा व १२९६ मुले होती. १९२१–२२ सालापर्यंत ही संख्या शाळा ४२० व मुले २२००७ अशी झाली. याचबरोबर प्रौढ स्त्रीयांच्या शिक्षणाच्या बाबतीतही शाहू महाराजांनी विशेष लक्ष घातले. या सर्व प्रगतीचे मूळे म. फुले व शाहू महाराज यांच्या विचारांत व कृतीत आहे.

समाजात अनेक दुर्लक्षित घटक काही लोक शिक्षित असूनही दुसऱ्यांच्या हाती सत्ता असल्याने नोकऱ्या नव्हत्या, ही परिस्थिती लक्षात घेऊन त्यांनी २६ जुलै १९०२ रोजी मागासवर्गीय लोकांकरीता सरकारी नोकरीत ५०% नोकऱ्या यांना मिळाव्यात असा जाहिरनामा काढला. हा क्रांतीकारी जाहिरनामा म्हणजेच भारताच्या इतिहासात एक सुवर्णपानच होते म्हणून त्यांना 'आरक्षणाचे जनक' असे म्हटले जाते. सांगलीचे

प्रसिद्ध वकील गणपतराव अभ्यंकर यांनी एकदा महाराजांच्या भेटीत त्यांना प्रश्न विचारला ''महाराज आपण जात पाहून स्कॉलरशीप व नोकऱ्या देतो हे चुकीचे आहे, लायकी पाहूनच त्या दिल्या पाहिजेत.'' यावर महाराजांनी त्यांना काहीही न बोलता घोड्यांच्या तबेल्याकडे नेले. त्यांनी आपल्या नोकरांना हरभरे आणायला सांगितले. एका सतरंजीवर ते टाकले. त्याबरोबर सर्व घोडे धावत आले. त्यापैकी जी सशक्त होती त्यांनी लहान शिंगरे, म्हातारी तसेच अशक्त घोड्यांना मागे टाकले, त्यामुळे अशक्त, म्हाताऱ्या घोड्यांना काहीच मिळाले नाही ते दाखवून महाराज म्हणाले तल्लख व सशक्त घोड्यांनी सारे हरभरे फस्त केलेत म्हणून त्यापैकी जे अशक्त आहेत त्यांना तोबऱ्यात भरुन हरभरे द्यावे लागतात. मागासलेल्या व अस्पृश्य लोकांना पुढे आणण्यासाठी सवलती द्याव्या लागतात. आता सशक्तांनीच बहुजन अशक्तांचे शोषण थांबवावे त्यांचे संरक्षण करावे.

महाराजांच्या अनुभवातून अस्पृश्यतेचे चटके आपण समजू शकतो. फासेपारधी, बंजारा, डोंबारी इ. अनेक भटक्या जमातींना इंग्रजांनी गुन्हेगार जमाती म्हणून नोंदवले आहे. या जमातीचे दुःख हेरुन त्यांच्यावरील गुन्हेगारीचा डाग धुवून काढण्यासाठी उपाययोजना केल्या. त्यांना रोजगाराची साधने उपलब्ध करुन दिली. रस्ते, विहीरी, खोदाई, घरबांधणी इ. कामांवर त्यांना नेमले. फासेपारध्यांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय महाराजांनी केली. नोव्हेंबर १९१२ च्या आदेशानुसार घरबांधणीसाठी निधी उपलब्ध करुन दिला.

स्त्रियांच्या हक्कांचे संरक्षण करणारे अनेक कायदेही अंमलात आणून तिची समाजाकडून आणि कुटुंबाकडून होणारी पिळवणूक थांबवण्याचे अनेक प्रयत्न केले. जुलै १९१७ मध्ये आपल्या संस्थानात विधवांच्या पुर्नविवाहास कायदेशीर मान्यता देणारा कायदा संमत केला. विधवा पुर्नविवाहाच्या बाबतीतील अडचणी दूर करण्यात आल्या.

२ ऑगस्ट १९१९ रोजी क्रूरपणाच्या वर्तनास प्रतिबंध करणारा कायदा केला. १९२० च्या जानेवारीत घटस्फोटाचा व जनकल्याणाच्या मिळकतीत वारसाहक्क दिला गेला. १७ जानेवारी १९२० रोजी देवीदासी प्रतिबंध कायदा केला.

युरोप दौऱ्यावर असताना रोमनगरीतील कुस्त्यांचा आखाडा पाहून आपल्या कोल्हापूरला तसा बांधायचा निश्चय करुन १९१२ साली आखाड्याचे काम पूर्णत्वास नेले. शाहू खासबाग मैदान या नावाने आखाडा प्रसिद्ध पावला. त्याचप्रमाणे ललित कलांमधील संगीत, नाट्य, चित्रकलांना राजाश्रय देऊन त्यांचे महाराष्ट्रात सुवर्णयुग निर्माण केले. नवरात्र, रामनवमी अशा उत्सवात लोकसंगीत व शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम आयोजित केले जात. सन १८९२ साली कोल्हापुरात देवल क्लब या संगीत संस्थेची स्थापना झाली. शाहू महाराजांनी संगीतकलेबरोबरच नाट्यकलेलाही राजाश्रय दिला. रोममधील प्रशस्त नाट्यगृहाप्रमाणे आपल्या

राजधानीतही तसे नाट्यगृह उभारण्याचे स्वप्न १९१५ साली साकार केले. कोल्हापूरास चित्रपटसृष्टीच माहेरघर बनवण्यास शाहू महाराजांचा मोलाचा वाटा होता. मल्लविधी ही शाहू महाराजांची सर्वात आवडती कला होती. सव्वा सहा फूट उंचीचा जबर ताकदीचा हा राजा स्वतः मल्ल तर होताच पण मल्लविद्या विशारद होता. मल्लविद्येच्या आवडीने महाराजांनी आपल्या राज्यातीलच नव्हे तर सर्व देशांतील अनेक नामांकित मल्लांना उदार राजाश्रय दिला होता. महाराष्ट्रात मल्लविद्येची उज्वल परंपरा निर्माण करुन या क्षेत्रातील उत्तर हिंदुस्थानी मल्लांचे वर्चस्व मोडून तिथे मराठी मल्लांना मानाचे स्थान शाहू महारांनी मिळवून दिले.

या कार्याबरोबरच आर्थिक प्रगती ही सुद्धा महाराजांच्या राज्यकारभाराचे वैशिष्ट्य होते. श्री शाहू मिलची स्थापना, गुळासाठी शाहुपुरी बाजारपेठेची स्थापना, शेतकऱ्यांसाठी सहकारी संस्थांची निर्मिती, राधानगरी धरणाची उभारणी यातून त्यांनी आर्थिक प्रगतीचा मोठा पाया रचला. शांतता आणि युद्धकाळ यांमध्ये शासनाचा हेतू राज्यकर्त्यांचे किंवा त्यांच्या प्रजातींचे वैभव नसून सामान्य माणसाचे सुख असते हे त्यांनी दाखवून दिले. आज कोल्हापूर जिल्हा शेती, सहकार व उद्योगधंदे या क्षेत्रात सर्व महाराष्ट्रात अग्रेसर आहे याचे श्रेय शाहू महाराजांच्या कल्पक दूरदृष्टीस व लोककल्याणी राज्यकारभारास आहे. सह्याद्रीत उगम पावणाऱ्या अनेक नद्या करवीर राज्यातून वाहतात त्यापैकी भोगावती नदीवर एक प्रचंड धरण आहे, राधानगरीचे धरण शाहू महाराजांनी बांधले आणि कोल्हापूर परिसराचा कायापालटच करुन टाकला. आपले महाराष्ट्र सरकार हरितक्रांतीच्या योजना आजही आखते आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात अशा योजना आखून आपल्या राज्यात पहिली हरितक्रांती घडवून आणणारा हा शेतकऱ्यांचा राजा आजही आदर्शभूत ठरावा. महाराजांच्या प्रयत्नामुळेच पुढे हजारो एकर बागायती शेती तयार होऊन कोल्हापूरचा परिसर ऊस मळ्यांनी फुलून गेला. त्यातून तयार होणाऱ्या उत्तम प्रतीच्या गुळाने हिंदुस्थानभर नाव कमावले. सप्टेंबर १९०६ मध्ये महाराजांनी हिंदुस्थानातील सहकारी क्षेत्रातील पहिली सुताची व कापडाची गिरणी 'श्री शाहू स्पिनिंग ॲन्ड विव्हिंग मिल' स्थापन केली.

असा हा आर्थिक प्रगती सांधणारा सामाजिक कार्य करणारा, दीनदुबळ्या दलितपतित अशा उपेक्षित वर्गाचा उद्धार करणारा राजा म्हणून शाहू महारांजांची थोरव सांगितली जाते. पण त्यापुढे जाऊन केवळ उपेक्षितच नव्हे तर समाजाकडून तिरस्कृत झालेल्या कुष्ठरोग्यांचाही उद्धार केल्याचे पाहून त्यांच्याविषयीचा आदरभाव जागृत झाल्याशिवाय रहात नाही. राज्यारोहणानंतरच्या काळात हा तरुण राजा नरसिंहवाडीस दत्ताच्या दर्शनास गेला असताना तिथे भिक मागत बसलेल्या कुष्ठरोग्यांच्या रांगा पाहिल्या व त्यांच्या ह्दयातील करुणेस पाझर फुटला. किती दुर्दैवी जीव हे! यांच्या हालअपेष्टा आपणांस दूर करता येतील का? हा विचार महाराजांच्या डोक्यात थैमान घालू लागला.

आपण लोकशाहीचे भोक्ते असूनही अशोकाचा, शिवरायांचा अथवा शाहू छत्रपतींचा जयजयकार करतो याचे कारण त्यांनी आपल्या राजेशाहीत 'राजा'ला म्हणजे स्वतःला महत्त्व न देता लोकांना महत्त्व दिले त्यांना मिळालेला राज्याधिकार राज्यसंपदा त्यांनी जनतेच्या उद्धारासाठी, कल्याणासाठी वापरील. शाहू छत्रपतींच्या चरित्राकडे पाहिले की आम्हांस उमजते की, त्यांनी आपली सर्व राजसत्ता, राजवैभव लोकांच्या, रयतेच्या, उन्नतीसाठी खर्ची घातले म्हणूनच त्यांना आपण 'लोकराजा' असे म्हणून गौरवतो.

म्हणूनच समाजात स्वतःला उच्चवर्णीय समजणाऱ्या लोकांनी आपली मानसिकता २१ व्या शतकांत तरी बदलावयास हवी मनुष्य हा सुद्धा प्राणीच आहे व त्याची एकच जात म्हणजे त्याचे मनुष्यत्व ते सोडून बाकीच्या सर्व जातीपाती सर्व भेद हे मानवनिर्मित आहेत हे खरे नाहीत ही शाहू महाराजांची भूमिका आम्ही जेवढ्या लवकर स्विकारू तेवढ्या लवकर आमच्या देशाची राष्ट्रीय एकात्मता बळकट होणार आहे व देश बळकट होणार आहे.

यावरच आपण समाधान मानायला नको. आजमितीस देशात अनेक कुटुंबातील असहाय्य स्त्रिया अत्याचाराच्या वरवंट्याखाली चिरडल्या जात आहेत. अनेक जणींना जाळून मुक्ती दिली जात आहे. हे सर्व सुसंस्कृत समाजाला कलंकित करणारे आहे, याची जाणीव स्त्री वर्गात करण्याची नैतिक जबाबदारी सामाजिक कार्यकर्त्यांची व स्त्री संघटनांची अहे. ती त्यांनी पार पाडली तर शाहू छत्रपतींचे कार्य आपण पार पाडत आहोत यात धन्य वाटेल.

परंतु तरीही आज स्वातंत्र्य मिळून ६० वर्षापेक्षा अधिक काळ लोटला तरी शाहूंच्या विचारांची अंमलबजावणी जशी व्हायला हवी तशी होत नाही ही शोकांतिका आहे. समाजाकडील प्रश्नांकडे डोळसपणे पाहिल्यास या विचारांची लढाई आणखी बराच काळ करावी लागेल तोपर्यंत शाहू महाराजांचा विचार सतत आम्हां सर्व भारतवासीयांना प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरणार आहे. म्हणूनच म्हणावेसे वाटते.

**''भारतीय इतिहासातील, हा एक राजा महान**
**जगभर किर्ती गाजेत्यांची, भारताची शान**
**विनम्र अभिवादन करु, त्यांच्या जयंतीदिनी आज।।''**

**डॉ. विक्रम जाधव**
**मराठी विभाग**

# सखी...

जगाकडे रोज नव्याने
बघणं विसरु नकोस
सखे तू मुक्तपणे तुझं
जगणं विसरु नकोस

तुला निराश करणारे
अनेक क्षण येतील
पाय घालून पाडणारे
अनेक जण येतील

त्यांना घाबरुन तुझं तू
चालणं विसरु नकोस
अन् सखे तू मुक्तपणे तुझं
जगणं विसरु नकोस

तुझं कौतुक प्रत्येकाला इथं
रुचेलच असे नाही
कौतुकासाठी तुझं नाव
सुचेलच असं नाही

कौतुक मिळण्यासाठी काम मात्र
करणं विसरु नकोस
अन् सखे तू मुक्तपणे तुझं
जगणं विसरु नकोस

तुला सुद्धा मन आहे
याचा विचार कर
बदलणाऱ्या मानसिकतेचा
जोरात प्रचार कर

काळजापासून माया तुझी
झुरणं विसरु नकोस
अन् सखे तू मुक्तपणे
जगणं तुझं विसरु नकोस

रडावसं वाटेल तेव्हा
रडून मोकळी हो
लढावसं वाटेल तेव्हा
लढून मोकळी हो

रडण्यामध्ये तुझं तू
लढणं विसरु नकोस
अन् सखे, तू मुक्तपणे तुझं
जगणं विसरु नकोस

तुला कुणाला पुरावे
द्यायची गरज नाही
कुणासाठी तुला परतुन
यायची गरज नाही

ध्येयासाठी पुढे पुढे
चालणं विसरु नकोस
अन् सखे तू मुक्तपणे तुझं
जगणं विसरु नकोस

खरचं सखे मनापासून सांगते
तुझं जगणं तू विसरु नकोस ।।

**लक्ष्मी वेळेकर**
**एफ. वाय. बी. ए.**

# बोधकथा



१४ वर्षे वनवास करणाऱ्या राम लक्ष्मणांना पंपा सरोवरात स्नान करायचे होते. म्हणून त्यांनी आपली धनुष्य ओल्या जमिनीत रोवून ठेवली.

स्नान आटोपल्यावर लक्ष्मणाने धनुष्य वर काढली असता रामाच्या धनुष्याच्या टोकाला रक्त लागलेले दिसले, लक्ष्मण म्हणाला, 'अरेरे.. जमिनीतील कोण्यातरी प्राण्याची आपल्याकडून अजाणत्या हत्या झालेली दिसते.'

राम म्हणाले, 'बघ जरा उकरुन कळेल काय ते. लक्ष्मणाने जमीन उकरली असता त्यातून एक रक्तबंबाळ झालेला बेडूक निघाला.

राम म्हणाले, 'अरे धनुष्य तुला बोचले तेव्हा ओरडायचे नाहीस का...!

सापाच्या तोंडात जेंव्हा तू सापडतोस तेव्हा किती आर्ततेने ओरडतोस.

त्यावर बेडूक म्हणाला, 'रामा साप जेंव्हा मला ग्रास करु पाहतो तेंव्हा हे रामा धाव या प्राणसंकटातून वाचव अशी आर्त हाक मी मारतो.

पण आता प्रत्यक्ष रामाच्याच धनुष्याने मरण्याची पाळी आली तर कोणाला हाक मारु? तारणारा आणि मारणारा तूच तर एक आहेस म्हणून मी थोडेदेखील दुःख व्यक्त न करता निवांत राहिलो.

**संकलन – तुकाराम पुरी**

**एफ. वाय. बी. ए.**

# My Favourite Hobby Gardening

Hobbies are activities which help us escape the daily grind of life and work and give us pleasure and peace of mind. Because we are not being ordered to perform certain jobs which we may not be fond of, hobbies help to inculcate an appreciation for work rather than driving us away from it.

The interesting thing about hobbies is that they dramatically improve our own personalities and character traits, therefore improving our performances better on the whole. They help us discover talents and ablities which we may never have known ourselves to posses also giving us an insight of all the elements around us, making us learn new things each day. For instance, hobbies like stamp collecting, bird watching, photography, sports and music make our time worthwhile and giving us information about different things.

My hobby is gardening. The joy of witnessing blooming flowers and leaves fills my heart with a sense of achievement and realizing the fact that the work of my own hands is bearing fruit definitely gives me pleasure.

Gardening also helps to keep me fit, strong and healthy for working away in my garden results in the beneficial kind of exercise that is good for both mind and body. I inherited the love for gardening from my mother and now with her help and interest; I have prepared a small garden in front of our porch. It is a thing of beauty with a grassy carpet & trimmed hedges.



I grow several variety of plants. It includes china rose, hibiscus, lily and many flower. plants. The garden has to be kept under strict check, mowed punctually as the grass grows in a speedy rate during the rainy season. However during autumn due to the shedding of the leaves, I have to clean it daily while always

adding manure and plant medicine for the protection of these wonderful creation of god.

It is always a great feeling to have my garden admired and appreciated by other people and it helps me feel like I have accomplished a great goal.

**Samruddhi Vipradas**
**F. Y. B. Com**

# आई जपतेस मज ......



''आई जपतेस मज, मी का अजुन लहान ?
माया किती गं आंधळी, कळु नये वयमानं !
नाही सोसायची थंडी, अजुन तु सांगतेस !
तुझी चौघडी उबेची, अंगावर घालतेस !
पडसे ना, यायचेच, त्याची चिंता कशासाठी ?
सुंठसाखर तुपात, देतेस अनोशा पोटी !
माझं रोडावलं बाळ, किती दिवस म्हणाले !
वृद्ध होई तो मी का गं, तान्ह्यापरिस जपावं ।
चाललेलाच प्रवास, शीण यायचाच थोडा ।
जीव का गं वरखाली, तुझा स्वभावच वेडा ।
वेडी मीच, न समजे, मज माऊलीचे मन ।
मृदू नवनीतापरी, आणि उंच नभाहून'' !

**पुजा देसुरकर**
**एफ. वाय. बी. ए.**

# My Hobby

My hobby is listening to music and my hobby are watching T.V. surfing or in my free time I like to play games on the computer and I like to collect coins. I have coins from 1981 until 2008.

My Favorite hobby is reading. I read story book and rare books. magazines, newspapers and any kind of material that I find interesting. This hobby started when I was a little girl. I always wanted my parents to read fairy tales and other stories to me. soon they got fed up and tired of having to read to me continuously reading for me. So I started reading myself as soon as I was able to do so. So as soon as I could, I caned to read. I started with simple abc books. I could simple fairy tales and other stories. Now I read just about anything that is available. I learned about the wonders of the world, space travel, human achievements, gigantic wales, tiny viruses and other fascinating thing of our world.

The wonderful thing about reading is that I do not have to learning things were never the hard and also I do not have to go deep into jungle learned about tigers. I can read all about it in a book.


Books provide the reader with so much informations and facts. they have certainly helped me in my daily life. I am better equipped to cope with living. I also like drawing. I mostly draw pictures of people, animals and birds. I use crayons, pencil, colourpencil, water colour etc. to draw pictures. I love drawing girls with I gift my best drawing to them my parent, sister and friends. I got first prize in my school for the drawing competition. I like to other hobbies.

**Rupali Shinde**

**F.Y.B com.**

# भाग २

# • परीक्षा विभाग अहवाल



शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये महाविद्यालयाच्या परीक्षा समितीमध्ये खालील सदस्यांचा समावेश होता.

१) श्री. विनय श्रीपाद बोडस- महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी

२) श्रीमती जया बदी

३) श्रीमती सविता थोरात

४) श्रीमती स्नेहल शेंडे

५) श्री. रविंद्र साळवे

६) श्री. प्रशांत मालपुरे

मागील शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मार्च - एप्रिल २०१६ मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे. परीक्षेचा निकाल खालीलप्रमाणे -

**(प्रथम तीन क्रमांक)**

■ **तृतीय वर्ष वाणिज्य**

| | | |
|---|---|---|
| १) | कु. कवडे पुजा शांताराम | ६७% |
| २) | कु. वर्मा योगिनी रामनिरंजन | ६६% |
| ३) | कु. फुटक दिपीका दत्ताराम | ६२% |

■ **तृतीय वर्ष कला**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. कदम प्रशांत लक्ष्मण | ७१% |
| २) | श्री. कदम नितीन सिद्धार्थ | ६७% |
| ३) | श्री. महांगरे प्रदीप एकनाथ | ६४% |

■ **वाणिज्य पदव्युत्तर (M.com)**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. चंदनशिवे राम | ७३% |
| २) | श्री. क्षिरसागर आकाश | ७१% |
| ३) | श्री. वरघंटे अजिंक्य | ७०% |

■ **कला पदव्युत्तर (M.A.)**

१) श्रीमती पंधे सुनिता राजीव ७५%

२) श्रीमती रामटेके वैशाली अशोक ७३%

३) श्रीमती गुप्ते नुतन सुमंत ७३%

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये महाविद्यालयात घेण्यात येणाऱ्या विविध परीक्षांचे नियोजन करण्याच्या दृष्टिकोनातून परीक्षा समितीची प्रथम सभा जुलै २०१६ मध्ये घेण्यात आली व त्याप्रमाणे विविध परीक्षांचा कालावधी निश्चित करण्यात आला. सभेमध्ये ठरविल्याप्रमाणे ६ सप्टेंबर ते १९ सप्टेंबर २०१६ या कालावधीमध्ये रिपीटर्स विद्यार्थ्यांसाठीची परीक्षा घेण्यात आली. त्यानंतर ऑक्टोबर महिन्यामध्ये पुणे विद्यापीठाच्या कला व वाणिज्य शाखेच्या पदवी परीक्षांचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले. नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात कला व वाणिज्य पदव्युत्तर वर्गांच्या अंतर्गत परीक्षा घेण्यात आल्या व त्यानंतर डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कला व वाणिज्य शाखेच्या पदव्युत्तर परीक्षांचे आयोजन करण्यात आले. दरम्यानच्या कालावधीत म्हणजेच द्वितीय सत्राची सुरवात होताच दिनांक २२ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०१६ या कालावधीत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सत्रान्त परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. या परीक्षेचा निकाल नोटीस बोर्डवर जानेवारी २०१७ च्या दुसऱ्या आठवड्यात लावण्यात आला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार महाविद्यालयाचा द्वितीय पदवी प्रदान समारंभ बुधवार दिनांक १ फेब्रुवारी २०१७ रोजी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी श्री विजय करमकर अध्यक्षस्थानी तर डॉ. प्रा. अनिल कुलकर्णी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये पदवीसाठी अर्ज केलेल्या ३७ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र सन्मानपूर्वक देण्यात आले. (सोबत फोटो). उत्तरोत्तर रंगतदार ठरलेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयातील परीक्षा अधिकारी विनय बोडस यांनी केले तर आभार श्रीमती जया बदी यांनी मानले.

मार्च, एप्रिल या दोन महिन्यांमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य व कला या पदवी वर्गांच्या परीक्षेचे नियोजन करण्यात आले.

**प्रा. विनय बोडस**

**महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी**

# समित्यांचे अहवाल

## ■ केशवसुत स्मृतिकरंडक स्वरचित काव्यस्पर्धा व काव्यकार्यशाळा समिती अहवाल शैक्षणिक वर्ष २०१६-१७

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ आणि सरस्वती मंदिर नाईट कॉलेज, पुणे यांच्या संयुक्तविद्यमाने ''केशवसुत स्मृतिकरंडक स्वरचित काव्यस्पर्धा व काव्यकार्यशाळेचे'' आयोजन दिनांक १० व ११ फेब्रुवारी २०१७ या कालावधीत करण्यात आले होते.

स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ दिनांक ११ फेब्रुवारी २०१७ रोजी मा. श्री. प्रसेनजीत फडणवीस आणि श्री. राजन लाखे यांच्या शुभहस्ते पार पडला. या स्पर्धातील प्रथम क्रमांकाचे सांघिक पारितोषिक रोख रक्कम चार हजार व फिरत्या करंडकासह मोरे विनायक कांतीलाल आणि शार्दुल विजय कोंडाजी के. के. वाघ महाविद्यालय, नाशिक यांनी पटकाविले, द्वितीय क्रमांकाचे सांघिक पारितोषिक रोख रक्कम तीन हजार व करंडकासह पवार उद्देश कृष्णा आणि आलासे हेमश्री किशोर, स. प. महाविद्यालय, पुणे यांनी मिळविले तर तृतीय क्रमांकाचे सांघिक पारितोषिक रोख रक्कम दोन हजार व करंडकासह कडू स्वाती सदाशिव आणि साळवे रितेश राजेंद्र, टि.सी. महाविद्यालय, बारामती यांना मिळाले. याशिवाय या स्पर्धेत वैयक्तिक खालीलप्रमाणे बक्षीसे देण्यात आली.

४. आरेकर अंकुश रामदास, मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे
   प्रथम क्रमांक रोख रुपये २०००/-

५. सुर्यवंशी पल्लवी नाथराम, स.प. महाविद्यालय, पुणे
   द्वितीय क्रमांक रोख रुपये १५००/-

६. काकडे शुभम औदुंबर, सोमेश्वर महाविद्यालय, सोमेश्वरनगर, बारामती
   तृतीय क्रमांक रोख रुपये १०००/-

सरस्वती मंदिर नाईट कॉलेज हे महाराष्ट्रातील एकमेव नाईट महाविद्यालय आहे, की जे गेली बारा वर्षे कवीवर्य केशवसुत यांच्या नावे राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन करीत आहे. या स्पर्धेमध्ये काव्यकार्यशाळेचे देखील दोन सत्रांत आयोजन करण्यात आले होते. शाहिर सुरेशकुमार वैराळकर आणि श्री श्याम भुर्के यांची

मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. तर परीक्षक म्हणून श्री. निशिकांत देशपांडे, श्री. रघुनाथ पाटील आणि श्री. श्रीकांत वाघ यांनी कामकाज पाहीले.

महाराष्ट्रातील वेगवेगळ्या महाविद्यालयातून तरुण विद्यार्थ्यांनी आपल्या कविता सादर केल्या. समारोप समारंभाच्या प्रसंगी प्रसिद्ध साहित्यिक श्री. राजनजी लाखे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी संस्थेचे व्हा. चेअरमन प्रसनेजीत फडणवीस अध्यक्ष म्हणून उपस्थित होते तर केशवसुतांची नात कुंदा दामले-प्रधान ह्या देखील उपस्थित होत्या. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्र प्राचार्य श्रीराम देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले. स्पर्धेचे समन्वयक, प्रा. श्यामराव कांबळे यांनी प्रास्ताविक व समारोप केला तर सुत्रसंचालन डॉ. दिपक वेडे यांनी केले.

या उपक्रमासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून महाविद्यालयास रु १,२०,०००.००/- आर्थिक सहाय्य प्राप्त झाले.

## ■ विशेष मार्गदर्शन योजना अहवाल २०१६-१७

आमच्या महाविद्यालयात विद्यार्थी कल्याण मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे विशेष मार्गदर्शन योजनेतंर्गत प्रथम वर्ष वाणिज्य व कला या वर्गांसाठी द्वितीय सत्रान्तामध्ये अकौन्टस, बँकिंग, गणित, अर्थशास्त्र, इंग्रजी व भूगोल इत्यादी विषयांचे विशेष मार्गदर्शनाचे वर्ग आयोजित करण्यात आले होते. यामध्ये प्रा. विनय बोडस, प्रा. अयोध्या जाधव, प्रा. सविता थोरात, डॉ. गीता राशिनकर, प्रा. पियुष जाधव, प्रा. पंकज शिंपी, प्रा. नंदिनी भावे, प्रा. ऐश्वर्या इनामदार, प्रा. स्फुर्ती देशपांडे, प्रा. मंजुषा जोशी, डॉ. दिपक वेडे, प्रा. पदमनाभ गायकवाड, प्रा. जया बदी, डॉ. विक्रम जाधव, डॉ. सुमन जाधव या तज्ज्ञ प्राध्यापकांनी या वर्गासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या योजनेमध्ये महाविद्यालयातील प्रथम वर्ष कला व वाणिज्य वर्गांतील विद्यार्थी सहभागी झाले होते.

या उपक्रमासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून महाविद्यालयास रु ९०००/- आर्थिक सहाय्य प्राप्त झाले.

सदर उपक्रमाला अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला.

## ■ विद्यार्थिनी व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा

**अहवाल २०१६-१७** आमच्या महाविद्यालयामध्ये दि. ०६ जानेवारी २०१७ रोजी विद्यार्थी कल्याण मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि सरस्वती मंदिर नाईट कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने

**विद्यार्थिनी व्यक्क्तिमत्त्व विकास** कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्‌घाटन श्रीमती सुषमा कापरे यांच्या शुभहस्ते झाले. त्यांनी योग ही **''जीवन शैली''** या विषयावर आपले विचार मांडले. डॉ. भारती यादव यांनी **''चला निर्भय बनूया''** या विषयावर तर ॲड्. अमृता देशपांडे यांनी **''स्त्री आणि कायदा''** या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र प्राचार्य प्रा. श्रीराम देशमुख हे होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक विद्यार्थी कल्याण मंडळ अधिकारी प्रा. श्यामराव कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. नंदिनी भावे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. ऐश्वर्या इनामदार यांनी केले. कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील अनेक विद्यार्थीनींनी सहभाग घेतला.

या उपक्रमासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून महाविद्यालयास रु ९९२०/- आर्थिक सहाय्य प्राप्त झाले.

■ **कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना अहवाल**

**२०१६-१७** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाच्या आर्थिक सहाय्यातून आमच्या महाविद्यालयात गरजू विद्यार्थ्यांसाठी **'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना'** शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये यशस्वीपणे राबविण्यात आली. या योजनेत **एकूण ०३** विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी या योजनेअंतर्गत महाविद्यालयातील कार्यालय व ग्रंथालयातील सहायक म्हणून काम केले. त्यामध्ये त्यांना टायपिंग, संगणक व इतर कार्यालयीन कौशल्य वाढविण्याच्या दृष्टीने वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात आले. त्याचे दर महिन्यांचे वेतन नियमितपणे त्याच्या खात्यावर जमा करण्यात आले. ही योजना राबविण्यासाठी आपण ॲडव्हान्स रु. ३०,५००/- आम्हास दिले होते. आपल्या विभागाने अर्थसहाय्य पुरवले याबद्दल मनःपुर्वक धन्यवाद. कळावे.

या उपक्रमासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून महाविद्यालयास रु २४,७५५/- आर्थिक सहाय्य प्राप्त झाले.

**प्रा. श्यामराव कांबळे**
**विद्यार्थी कल्याण अधिकारी**

■ **गुणवत्ता सुधार योजना समिती**

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये महाविद्यालयातील गुणवत्ता सुधार योजना समितीच्या वतीने १. शैक्षणिक उपकरण खरेदी २. पार्किंग शेड बांधकाम हे दोन प्रस्ताव ऑनलाईन पद्धतीने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडे सादर करण्यात आले. या दोन्ही प्रस्तावास विद्यापीठाची मान्यता मिळाली. त्याप्रमाणे शैक्षणिक उपकरण खरेदी करण्यासाठी विद्यापीठाकडून महाविद्यालयास रुपये एक लाख निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच पार्किंग शेड बांधकाम करण्यासाठी विद्यापीठाकडून महाविद्यालयास पाच लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे.

■ **प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि आपले महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये खालीलप्रमाणे विविध उपक्रमांचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले.

■ **युवा शिक्षण व्याख्यानमाला**

| दिनांक | वक्ते | विषय |
|---|---|---|
| २० जानेवारी २०१७ | प्रा. सुधीर गाडे | समर्थ भारत अभियान |
| | प्रा. यशोधन महाजन | राष्ट्रासाठी युवक |

या उपक्रमात महाविद्यालयातील १०० विद्यार्थी युवक सहभागी झाले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून रुपये ५०००/- निधी मंजूर झाला.

■ **महिला सबलीकरण कार्यशाळा**

| दिनांक | वक्ते | विषय |
|---|---|---|
| २१ जानेवारी २०१७ | श्रीमती रेणू गावसकर | आम्ही महिला |
| | प्रा. मिनल परांजपे | शिक्षण आणि महिला सबलीकरण |

या उपक्रमात महाविद्यालयातील १०० विद्यार्थी सहभागी झाले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांकडून रुपये ५०००/- निधी मंजूर झाला.

■ **विवाहपूर्व समुपदेशन कार्यशाळा**

| दिनांक | वक्ते | विषय |
|---|---|---|
| ३० जाने. २०१७ | प्रा. अश्विनी तांबे | स्वः ओळख |
| | प्रा. आरती पेंडसे | जोडीदाराची निवड |

| | |
|---|---|
| प्रा. अपर्णा ठकार | बदलाचा स्वीकार |
| अॅड्. माधुरी फडके | विवाहविषयक कायदे |

या उपक्रमात महाविद्यालयातील ५० विद्यार्थी सहभागी झाले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून रुपये ८०००/- निधी मंजूर झाला.

## ■ बाल हक्क संरक्षणविषयक चर्चासत्र

| दिनांक | वक्ते | विषय |
|---|---|---|
| ८ फेब्रुवारी २०१७ | प्रा. शमसुद्दीन तांबोळी | बाल हक्क संरक्षणः वास्तव आणि अपेक्षा |
| | डॉ. दत्तात्रय तापकीर | बाल हक्क संरक्षण मानसशास्त्रीय उद्बोधन |
| | श्री. नितीन पवार | बालकामगार |
| | श्रीमती लता सोनावणे | वंचित बालकाचा प्रश्न आणि उपाय |

वरील उपक्रमास सावित्रीबाई फुले विद्यापीठाकडून रुपये १५०००/- निधी मंजूर झाला. महाविद्यालयातील ५० विद्यार्थी या चर्चासत्रात सहभागी झाले.

## ■ शैक्षणिक वर्ष वार्षिक नियोजन समिती

शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ साठी शैक्षणिक वर्ष वार्षिक नियोजन समितीने वार्षिक नियोजन पुस्तिका तयार केली. या नियोजनाप्रमाणे महाविद्यालयाचे शैक्षणिक कामकाज पार पडत आहे.

## ■ वेळापत्रक समिती

शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ साठी वेळापत्रक समितीच्या वतीने महाविद्यालयातील सर्व वर्गांचे वेळापत्रक तयार करण्यात आले. त्याप्रमाणे सर्व वर्गांच्या तासिका पार पडत आहे.

## ■ वैयक्तिक

१) सी.टी. बोरा महाविद्यालय शिरुर, पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय चर्चासत्रात निबंधवाचन

२) बी.जे. रास कॉलेज वाघोली, पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय चर्चासत्रात निबंधवाचन

३) इंदापूर महाविद्यालयाने आयोजित केलेल्या 'श्रीमंत मालोजीराजे भोसले इतिहास परिषद' प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती.

**डॉ. दिपक वेडे**

**इतिहास विभाग प्रमुख**

■ **'सौर ऊर्जा प्रकल्प'**

महाविद्यालयाच्या छतावर दहा किलोवॅटचे २८ पॅनेल बसविले आहेत. त्याद्वारे दरमहा एक हजार किलोवॉट वीजनिर्मिती होईल. ही निर्मिती झालेली सौरऊर्जा नेटमीटरिंगच्या माध्यमातून वीज महामंडळाकडे जमा करण्याचा प्रकल्प उभा केला आहे. या प्रकल्पाचे उद्घाटन दिनांक ०९.१२.२०१६ रोजी संपन्न झाले. उद्घाटन मा. श्री. एस. एस. लपपटे (अधीक्षक अभियंता, रास्ता पेठ) व मा. श्री. प्रसेनजीत फडणवीस (व्हा. चेअरमन, सरस्वती मंदिर संस्था, पुणे) यांच्या हस्ते झाले.

**जया बदी**
**निमंत्रक**

■ **सांस्कृतिक समिती**

- दिनांक १५.१०.२०१६ रोजी विद्यार्थ्यांसाठी भोंडल्याचा कार्यक्रम साजरा केला.
- दिनांक २४.१२.२०१६ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. प्रसेनजीत फडणवीस (व्हाईस चेअरमन, स. मं. संस्था, पुणे) आणि डॉ. नरेंद्रजी कडू (कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे) म्हणून उपस्थित होते.
- स्नेहसंमेलनानिमित्त महाविद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला.
- दिनांक १४.०१.२०१७ रोजी विवेकानंद जयंती आणि राष्ट्रीय युवा दिन- स्वामी विवेकानंदांचे विचार विद्यार्थ्यांपर्यत पोहचवावे यासाठी स्वामींच्या साहित्याचे वाचन विद्यार्थ्यांकडून प्रत्येक वर्ग सर्व प्राध्यापकांनी करुन घेतले.
- दिनांक १३ जाने व १४ जाने २०१७ रोजी जानेवारीला विविध 'डेज' साजरे केले.
- दिनांक १५ जानेवारी २०१७ रोजी सर्व विद्यार्थ्यांना तिळगुळाच्या वड्यांचे वाटप केले.

■ **आरोग्य समिती**

- प्रथम सत्रात प्रथम वर्ष कला व वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासणी विद्यापीठाच्या नियमानुसार झाली.

- दिनांक २०.०१.२०१७ रोजी राष्ट्रीय रुग्णवाहिका सेवा, (महाराष्ट्र शासन) या सेवे बद्दलची माहिती विद्यार्थ्यांना रुग्णवाहिका दाखवून सविस्तरपणे दिली. विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. चर्चा केली गेली.

**जया बदी**

**निमंत्रक**

## ■ वादविवाद/ वक्तृत्व समिती

शै. वर्ष २०१६ - १७ मध्ये महाविद्यालयीन पातळीवर वाद-विवाद, वक्तृत्व स्पर्धेची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत वेळोवेळी सूचनांद्वारे पोहचविली जाते. त्यामुळे महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या उत्साहाने विविध स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवितात.

१) दि. २४/१२/२०१६ रोजी शै. वर्ष २०१६-१७ चे स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते. या निमित्ताने दि. २१/१२/१६, बुधवार रोजी 'वक्तृत्व स्पर्धा' आयोजित करण्यात आली.

२) दि. १५ डिसेंबर २०१६ रोजी आय्एल्एस् विधी महाविद्यालय, पुणे येथे राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा (वर्ष ८ वे) आयोजित करण्यात आली होती. कु. श्लाका अनिल वऱ्हाडकर, तृतीय वर्ष वाणिज्य शाखेच्या विद्यार्थीनीने सहभाग घेतला.

३) दि. १ सप्टेंबर २०१६ रोजी द्वितीय कला शाखेच्या दत्तात्रय आलमले या विद्यार्थ्याने राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत (महाराष्ट्र टाइम्स ॲण्ड फेडरल बँक आयोजित) सहभाग घेतला.

४) कुमारी श्लाका अनिल वऱ्हाडकर व अंकुश हि. पारठे (तृतीय वर्ष वाणिज्य) या विद्यार्थ्यांनी दि. २७ व २८ डिसेंबर २०१६ रोजी पद्‌श्री विखे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, प्रवरानगर, मु. पो. लोणी, ता. राहाता, जि. अ. नगर द्वारा आयोजित सहकार महर्षी डॉ. विठ्ठलराव विखे पाटील राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन रौप्य करंडक वादविवाद स्पर्धेमध्ये सहभाग घेतला. वादविवादाचा प्रस्तावः- ''नोटाबंदीमुळे देशातील काळापैसा नष्ट होईल!''

५) दि. ३/१/२०१७ रोजी अलमाले दत्तात्रय (एस. वाय. बी. ए.) यांनी आबासाहेब गरवारे महाविद्यालय व विद्यार्थी कल्याण मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ द्वारा आयोजित सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत सहभाग घेतला.

■ **प्राध्यापक प्रबोधिनी समिती अहवाल**

१) शैक्षणिक वर्ष २०१६-१७ प्रथम सत्राची सत्रारंभ सभा २९/०७/२०१६ रोजी घेण्यात आली व प्रथम सत्रांत सभा २२/१०/२०१६ रोजी घेण्यात आली. तसेच ०५ डिसेंबर २०१६ रोजी दुसऱ्या सत्राची सत्रारंभ सभा मा. प्र. प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

२) दि. ०६.०२. २०१७ रोजी सायं. ५.०० वाजता प्रा. विनय बोडस यांचे ''अर्थसंकल्प २०१७ मधील आयकरातील बदल'' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

३) दि. २३/०२/२०१७ रोजी सायं. ५.०० वाजता प्रा. डॉ. शालिनी बरबडे, सचिव महाराष्ट्र क्रीडा विभाग पुणे यांचे 'आरोग्य व योगा' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

**प्रा. अयोध्या जाधव**

**इंग्रजी विभाग**

■ **वाङ्मय मंडळ**

दि. ३० डिसेंबर २०१६ रोजी महाविद्यालयात वाङ्मय मंडळाचे उद्घाटन झाले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे येथील कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी उपस्थित होते. याप्रसंगी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य श्रीराम देशमुख उपस्थित होते. प्रा. मिलिंद जोशी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना स्वतःचे व्यक्तीमत्त्व घडविण्यासाठी वाङ्मयाचे महत्त्व सांगितले. आपण महाविद्यालयीन जीवनाची वाटचाल करीताना, साहित्याशी आपली नाळ जोडली पाहिजे हे नमूद केले. अध्यक्षांनी आपल्या मनोगतात महाविद्यालयीन युवकांना साहित्याची जाणीव करुन दिली. त्याचबरोबर इतर उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविण्यास सांगून, प्रेरणादायी विचार व्यक्त केले.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उत्स्फूर्त सहभागी झाले होते.

■ **मराठी भाषा दिन**

सरस्वती मंदिर नाईट कॉलेज सोमवार दि. २७ फेब्रुवारी २०१७ रोजी मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाला प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर दिवशी डॉ. वर्षा तोडमल सहा. प्राध्यापक गरवारे महाविद्यालयाच्या मराठी विभाग यांचे 'मराठी भाषेची सद्यःस्थिती' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. आपल्या व्याख्यानात त्यांनी जगातील भाषा या कशाप्रकारे बदलत चालल्या आहेत, तसेच महाराष्ट्रात मराठी माध्यमांच्या शाळा बंद पडून त्यांची

जागा इंग्रजी माध्यमांनी कशी घेतली आहे याबाबत माहिती दिली. भाषा ही आपल्या जगण्याचा मूळ आधार असताना आज आपल्याला मराठी भाषादिन साजरा करावा लागत आहे अशी खंत व्यक्त करुन मराठी भाषेच्या वैभव संपन्नतेची अनेक उदाहरणे देऊन त्यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विक्रम जाधव यांनी केले. भाषेचे संरक्षण, संवर्धनाची जबाबदारी हे प्रत्येक मातृभाषिकाची असून ती आपण आस्थेने स्वीकारली पाहिजे असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मंजुषा जोशी यांनी केले. प्रा. अयोध्या जाधव यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. आभार प्रदर्शनाचे काम डॉ. सुमन जाधव यांनी केले.

**डॉ. विक्रम जाधव**

**मराठी विभाग**

## ■ भित्तीपत्रक समिती

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही विविध विषयांची भित्तीपत्रके तयार करण्यासाठी नियोजन करण्यात आले. यामध्ये इंग्रजी, मराठी व राज्यशास्त्र विषयांचे भित्तीपत्रक विद्यार्थ्यांनी प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली तयार केले व काचफलकात प्रदर्शित करण्यात आले.

शै. वर्ष २०१६ – १७ मध्ये महाविद्यालयात अनेकविध विषयांवर नियोजनपूर्वक भित्तीपत्रके लावण्यात आली. सालाबादप्रमाणे यावर्षीही सर्व प्राध्यापकांनी आपल्या विषयांची भित्तीपत्रके विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन तयार केली.

दि. १५ ऑक्टोबर डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन 'वाचन प्रेरणा दिवस' म्हणून साजरा करण्यात आला. या प्रसंगी डॉ. ए. पी. जे. कलाम यांचा जीवनपट व्याख्यानाच्या माध्यमातून सांगण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांनी कथा, कविता, कादंबरी मधील काही भागाचे वाचन केले.

| **अ. क्र.** | **माहे** | **विषय** |
|---|---|---|
| १. | जुलै | मराठी |
| २. | ऑगस्ट | कॉस्टींग, मानसशास्त्र |
| ३. | सप्टेंबर | बँकिंग, पी. ए. |
| ४. | ऑक्टोबर | एम. लॉ, इंग्रजी |
| ५. | नोव्हेंबर | अर्थशास्त्र |

| | | |
|---|---|---|
| ६. | डिसेंबर | भूगोल, गणित |
| ७. | जानेवारी | कॉम्प्युटर, अकौंटन्सी |
| ८. | फेब्रुवारी | इतिहास, राज्यशास्त्र |

**डॉ. विक्रम जाधव**
**मराठी विभाग**

■ **क्रीडा समिती**

१) शै. वर्ष २०१६ – १७ मध्ये सी. डी. जैन महाविद्यालय श्रीरामपूर येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पुणे सीटी झोनलच्या स्पर्धेत श्री. श्रीकांत राऊत हा विद्यार्थी पॉवर लिफ्टींग या स्पर्धेत द्वितीय क्रमांकाने यशस्वी झाला.

२) शै. वर्ष २०१६ – १७ मध्ये ओमशिव फाऊंडेशन रात्र महाविद्यालय विश्रांतवाडी पुणे येथे आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत दि. २२.९.१६ रोजी कबड्डी स्पर्धेसाठी संघ सहभागी झाला.

३) शै. वर्ष २०१६ – १७ मधील महाविद्यालयातील वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्ताने डिसेंबर २०१६ या महिन्यामध्ये पर्वती चढणे – उतरणे इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

४) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नियमानुसार मार्च २०१७ या कालावधीमध्ये शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमाची परीक्षा घेण्यात आली. यावेळी बहिस्थ परीक्षक म्हणून प्रा. अभिजीत परसे, संस्कार मंदिर संस्थेचे कला वाणिज्य महाविद्यालय वारजे–माळवाडी पुणे यांनी काम पाहिले.

**डॉ. विक्रम जाधव**
**निमंत्रक**

# ग्रंथालय अहवाल
## सन २०१६-२०१७



महाविद्यालय ग्रंथालयात आजपर्यंत अनुदानित विभागात ६८८५ इतकी ग्रंथसंपदा आहे. महाविद्यालयाच्या अंदाजपत्रकातील पुस्तक खरेदी तरतुदीनुसार रु ११,०३६/- ची पुस्तके ग्रंथालयासाठी खरेदी केलेली आहेत. स्पर्धा परीक्षेची ५२ संदर्भ पुस्तके ग्रंथालयात आहेत. व विनाअनुदानित विभागात १२० इतकी ग्रंथसंपदा आहे. महाविद्यालयाच्या अंदाजपत्रकातील पुस्तक खरेदी तरतुदीनुसार रु २,९८४/- ची पुस्तके ग्रंथालयासाठी खरेदी केलेली आहेत. ग्रंथालयात जर्नल्स विद्यार्थी व प्राध्यापकांना वाचनासाठी उपलब्ध आहेत. त्यामध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्सचा समावेश आहे. वर्तमानपत्र ग्रंथालयात येत असतात.

शब्दकोश, ज्ञानकोश, विश्वकोश, इयरबुक व इनसायक्लोपीडीया इ. संदर्भसंच ग्रंथालयात आहेत. त्याचप्रमाणे कथा, कादंबऱ्या, कविता, नाटक, प्रवास वर्णन, चरित्रे व आत्मचरित्रे इ. ललित वाङ्मयपर पुस्तके ग्रंथालयातून वाचकांसाठी उपलब्ध करुन दिली जातात. अभ्यासक्रम, प्रश्नपत्रिकासंच इ. ग्रंथेतर साहित्य विद्यार्थी व प्राध्यापकांना उपलब्ध करुन दिले जाते.

ग्रंथालयासाठी मार्गदर्शन व सल्ला देण्यासाठी ०२ सभासदांची ग्रथांलय समिती आहे. ग्रंथालय समितीची सभा वर्षातून किमान दोन वेळा घेतली जाते या सभेमध्ये ग्रंथालयाचे अंदाजपत्रक, ग्रंथ निवड, ग्रंथ खरेदी इ. विषयावर चर्चा केली जाते व निर्णय घेतले जातात. शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ मध्ये अनुदानित व विनाअनुदानित ग्रंथालय अंदाजपत्रक प्रत्येकी एकूण रु १,३०,०००/- इतके होते.

ग्रंथालयात विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अभ्यासिकेची सोय आहे. दु. ३.०० ते रात्री १०.०० या वेळेत अभ्यासिका उघडी असते. तसेच परीक्षा काळात सकाळी १०.०० ते ६.०० पर्यंत अभ्यासिका उघडी ठेवली जाते. ब्रिटीश लायब्ररी, पुणे व जयकर ग्रंथालय, पुणे विद्यापीठ यांचे आंतरग्रंथालय देवघेवीसाठी सभासदत्व घेण्याबाबतचे प्रयत्न चालू आहेत.

विद्यार्थी व प्राध्यापकांसाठी Syllabus इंटरनेटवरुन डाऊनलोड करुन संगणकावर ठेवण्यात आलेले आहेत. सदर अभ्यासक्रमांची छायांकित प्रत देण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

इंटरनेटद्वारे जर्नल्स व डेटाबेस संगणकावर डाऊनलोड करुन ते प्राध्यापकांसाठी उपलब्ध करुन देण्याचा ग्रंथालयाचा मानस आहे.

ग्रंथालयासाठी ग्रंथालय समिती सभासद यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभत असते. मा. प्रभारी प्राचार्य श्रीराम देशमुख यांचे आम्हास विशेष मार्गदर्शन लाभत असते.

**राजेश बाळासाहेब अगावणे**

**ग्रंथपाल**

# वाणिज्य विभाग




१) दि. १५-०२-२०१७ रोजी बँकिंग अॅण्ड फायनान्स I द्वितीय वर्ष वाणिज्य- प्रा. ज्योती माने यांचे ७.३० ते ८.३० रिझर्व्ह बँकेची कार्ये या विषयावर व्याख्यान आयोजित केले.

२) दि. १५-०२-२०१७ रोजी बँकिंग अँण्ड फायनान्स III तृतीय वर्ष वाणिज्य- प्रकल्प मूल्यमापन या विषयावर डॉ. रुपाली शेठ यांचे व्याख्यान ८.३० ते ९.३० या वेळेत आयोजित केले.

३) दि. २७-०२-२०१७ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व सरस्वती मंदिर नाईट कॉलेज ऑफ कॉमर्स अॅण्ड आर्टस, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ''कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ संरक्षण अधिनियम- २०१३ या विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले.

१) दि. २२-०२-२०१७ रोजी हुजूरपागा महिला वाणिज्य महाविद्यालय येथे तृतीय वर्ष वाणिज्य- बँकिंग III प्रकल्पमूल्य मापन या विषयावर व्याख्यान दिले.

२) दि. २२-०२-२०१७ रोजी हुजुरपागा महिला वाणिज्य महाविद्यालय येथे द्वितीय वर्ष वाणिज्य बँकिंग I स्टेट बँक व तिची कार्ये या विषयावर व्याख्यान दिले.

३) तृतीय वर्ष वाणिज्य बँकिंग II २७.०२.१७ रोजी प्रतिभूत अग्रिमे या विषयावर व्याख्यान दिले.

४) २५-०२-२०१७ रोजी Research Methodology & Project Work या विषयावर एम.कॉम II विद्यार्थ्यांना व्याख्यान दिले.

१) सेमीनार दि. ९.०२.२०१७ व १०.०२.२०१७ दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात IT in Banking या विषयावर डॉ. सुधाकरराव जाधवर आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स या महाविद्यालयात सादर केला.

२) दि. १७ व १८ फेब्रुवारी २०१७ दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात पेपर सादर केला. संगमनेर नगरपालिका आर्ट्स डी. जे मालपानी कॉमर्स ॲण्ड बी. एन. सारडा सायन्स कॉलेज, संगमनेर या महाविद्यालयात Role of Banking in Indian Economy या विषयावर पेपर सादर केला.

३) ०७-०२-२०१७

Sahakarbhushan S.K. Patil College, Kurundwad Tal. Shirol, Dist. Kholapur या महाविद्यालयातील एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात Role of Co-operative in rural development या विषयावर पेपर सादर केला.

१) केशवसुत करंडक स्पर्धेचे सरस्वती मंदीर नाईट कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड आर्ट्स पुणे दोन दिवसांचे सूत्रसंचालन केले.

२) एम.कॉम पेपर सेटिंग (SPPU) केले.

**डॉ. गीता अविनाश राशिनकर**

**वाणिज्य विभाग**

■ **वाणिज्य मंडळ समिती**

आपल्या महाविद्यालयातील वाणिज्य मंडळाचे उद्घाटन दि. २७ ऑगस्ट २०१६ रोजी सायंकाळी ७.०० वाजता स्कीलींग इंडियाच्या संचालिका सौ. सुवर्णा भरेकर यांच्या हस्ते झाले. त्यांनी विद्यार्थ्यांना उद्योजकतेविषयी शासनाच्या असणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली तसेच वर्षभर विविध तज्ज्ञ व्याख्यात्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

आपल्या महाविद्यालयातील पदव्युत्तर विभाग व वाणिज्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ३-३-१७ रोजी संशोधन पद्धती या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्या कार्यशाळेला डॉ. अनिता साठे, डॉ. वाय. आर. थोरात आणि डॉ. गीता राशीनकर यांनी पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यांना प्रकल्प अहवाल तयार करण्याबाबत मार्गदर्शन केले.

**डॉ. सविता थोरात**

**समन्वयक**

**२) माजी विद्यार्थी संघटना व संपर्क समिती**

या वर्षी २६ जानेवारी २०१७ रोजी संस्थेच्या वतीने ''माजी विद्यार्थी मेळावा'' आयोजित केला होता. त्या मेळाव्याला आपल्या महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. तसेच दि. २२.३.२०१७ रोजी महाविद्यालयात शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांसाठी 'निरोप समारंभ कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्या कार्यक्रमात अनेक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाप्रती आपली कृतज्ञता व्यक्त केली.

**फोटो – श्री. प्रशांत मालपुरे**

**समन्वयक**

# Dept. of English

1) Displayed Wall-Poster on "Articles" by the students of F.Y.B.A. in the month of August 2016

2) Dept. of English has made Memorandum of Understanding Between Cognitive Exchange (E), Folsom, California , U.S.A. and Saraswati Mandir Night College of Commerce & Arts, Pune for Application to Speech and Debate Programme.

   This is the second year of the Programme. This online programme helps the students to develop key life skills like leadership and communication. The six students have completed the course successfully from July-16 to Feb-2017.

3) Participated in the 1st National Teacher's Congress held in Pune India from September 23rd to 25th 2016.

4) Presented a research paper entitled 'Using Articles in English Language Teaching' in One Day National Seminar on 'Teaching of English Language and literature at Under Graduate level on 7th January 2017 at Ardhanari Nateshwar Mahavidyalaya , Velapur, Tal. Malshiras, Dist. Solapur.

5) Presented a research paper entitled "Women Characters in the Selected Plays of Mahesh Dattani" in One Day Interdisciplinary International International?? Conference on "Mainstreaming the Marginalized: Perspectives in Humanities, Commerce and Science Jointly Organized by Loknete Gopinathji Munde Arts, Commerce and Science College Mandangad, Dist. Ratanagiri (Affiliated to University of Mumbai and M.G. E.W. Society's Centre For Humanities & Cultural Studies Kalyan (w), Dist. Thane on 28 January 2017.

6) Published an article on "Major Thernes in Vijay Tendulkar's Plays" in Lang Lit, An International Peer Reviewed Open Access Journal, ISSN 2349-5189, Impact Factor 4.23, Vol.3, Issue 3 on 28 February 2017, P. 387-390.
7) Presented a research paper entitled "Exploring ICT Tools for Teaching & Learning Process" in one day State Level Conference on "Use of ICT in Teaching Literature and Social Sciences" at Haribhai V. Desai College Arts, Science and Commerce, Pune on 04th March 2017.
8) Completed 'ICT Integration in Higher Education' Mooc (A Massive Open Online Course) of Two Months
9) Completed the "Summar Programme from 2-06-2016 to 22-06-2016 with 'A' Grade at University Grants Commission Human Resources Development Centre , Guru Nanak Dev University', Amritsar, UGC- Sponsored Summer Programme which is Equivalent to one Refresher Course.
10) Worked as the subject expert for the teacher's selection at Pratibha College of Commerce & Computer Studies, Chinchwad, Pune on 19th November 2016.
11) Delivered a guest lecture on "Contribution to the Literature by eminent personalities" at Dr. Sudhakar Jadhavar Arts, Commerce & Science College, Narhe- Dhayari on Thursday, 22nd September 2016 for the inauguration of Vangrnay Mandal.
12) Worked as an Internal Senior Supervisor for M.A., M.Com. SPPU. Exams in our college from 17/11/16 to 09/12/2016.
13) Worked as an External Senior Supervisor from 04/10/2016 to 27/10/2016 at Jedhe College, Pune
14) Worked as an Examiner and Moderator in the Subject Compulsory English at Central Assessment Programme (CAP), S.P.College, Pune from 18/11/2016 to 11/12/2016.
15) Worked as an external for re-evaluation of F.Y.B.A. and F.Y.B.Com (Comp. English) at Dr. Ambedkar College of Arts & Commerce, Yerawada, Pune on 15/08/2016.
16) Worked as an external for Vixa Examination of Savitribai Phule Pune University for F.Y.B.Com at P. Jog College of Science & Commerce, Mayur Colony, Kothrud, Pune from 1st to 3rd March 2017.
17) Delivered a guest lecture on "Creative Writing" on 19th November 2016 for the students of F.Y.B.Com at Pratibha College of Commerce & Computer Studies, Chinchwad, Pune.
18) Published a book on 'Collected Essays on English Language Teaching and learning by Success Publications Pune on 14 Feb 2017- ISBN NO.- 978-93-24457-16-1.
19) Received ' Best Teacher Award' by the Rotary Club of Pune, Shaniwar wada on 7 Sept 2016.

## भावपूर्ण श्रद्धांजली

या शैक्षणिक वर्षात संस्थेतील कार्मचारी आजी - माजी विद्यार्थी, हितचिंतक त्याचप्रमाणे भारतातील शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, सहकार, कला क्रीडा, साहित्य, विज्ञानक्षेत्र, देशासाठी लढणारे जवान या सर्वांना महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांची विनम्र श्रद्धांजली.